

चित्र उरले, चरित्र संपले

# माणूस

१८ नोव्हेंबर १९६७
चाळीस पैसे



# फॉस्फोमिन -




## अधिक उत्साह देते.



## भूक वाढविते. जोम वृद्धिंगत करते.



## शरीराची रोग-प्रतिकार-क्षमता वाढविते.




खरोखर!...
फॉस्फोमिन म्हणजे
घरकुलांतील
आरोग्याचे कारंजे!

व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि विविध ग्लिसरोफॉस्फेटस्‌युक्त उत्तम फलास्वाद असलेले हिरव्या रंगाचे टॉनिक — फॉस्फोमिन

SQUIBB

®हा ई. आर. स्क्विब ॲण्ड सन्स इन्कॉर्पोरेटेड यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे व करमचन्द प्रेमचन्द प्रायवेट लि. यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे

SARABHAI CHEMICALS

Shilpi SC 50A/67 Mar

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : पंचविसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## पत्रमैत्री

स. न. नोव्हें. ३

'माणूस'चा दिवाळी अंक विकत घेतला. मुखपृष्ठ आवडले आणि त्याखालील 'केशवसुतांच्या काव्यपंक्ती', 'भारतीय बुद्धिवंतांची निर्यात' ही गंभीर समस्या सुंदर वाटली. काश्मिर वार्तापत्रे मनाला चटका लावून गेली. बाबासाहेब पुरंदरे आणि गो. नी. दांडेकर यांच्या-बद्दल काय लिहावे–त्यांचे सर्वच सुंदर असते ! कथा-मध्ये जयवंत दळवींची 'सगळा सवयीचा प्रश्न' ही विशेष आवडली. कारण त्यात वास्तवता आहे. ग्यानबांचे 'काही और' छान वाटले. माणूसचा 'साप्ताहिक' अंक १८ ला निघणार म्हणून बराच काळ बेचैनी वाटणार.

अशोक गोखले
नवीन पुसद, यवतमाळ

मूल्य ४० पसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

स. न. ऑक्टो. १९

आपल्या साप्तहिकात चालू असलेल्या 'व्होलगा जेव्हा लाल होते' या लेखमालेत एक–दोनदा व विशेषत: दि. १४ ऑक्टोबरच्या अंकात पार्व्हस (मूळ नाव अलेक्झँडर हेल्पहँड) या क्रांतिकारकाचा उल्लेख आला आहे. परंतु तो अपुरा व थोडाफार चुकीच्या माहितीवर आधारलेला असावा असे वाटते म्हणून खालील खुलासा.

अलेक्झँडर हेल्पहँड ऊर्फ पार्व्हस हा क्रिमियातील ओडेसा येथील रशियन ज्यू. रशियन समाजवादी चळवळीतील पाश्चिमात्त्य विचारसरणीचा अधिक प्रभाव पडलेल्या सात विचारवंतांपैकी दुसरा ट्रॉटस्की– हा एक. रशियातून १९ व्या शतकाच्या अखेरीस परागंदा झाल्यावर हा जर्मनीत म्युनिच येथे स्थायिक झाला व लौकरच त्याने रोझा लुक्झेंबर्ग वगैरे डाव्या जर्मन समाजवाद्यांबरोबरीने प्रथम फेरविचारवादी बर्नस्टाईन व नंतर पोथीनिष्ठ ट्रॉटस्की यांच्याशी झालेल्या वादात भाग घेतला. याचे ट्रॉटस्की, तसेच रोझा लुक्झेबर्गप्रमाणेच हुकूमशाही प्रवृत्तींच्या पुरस्कर्त्या लेनिनशी जमले नाही. जनतेच्या स्वयंस्फूर्त उठावावरच या दोघांप्रमाणे त्याची श्रद्धा होती.

पुढे ट्रॉटस्कीने मांडलेला 'अखंड क्रांती'चा (Permanent Revolution) सिद्धांत पार्व्हसच्या मार्गदर्शनाखाली विकसित केला. याचे वर्णन स्वत: ट्रॉटस्कीने आपल्या पुस्तकात केले आहे. सिद्धांत थोडक्यात असा : मार्क्सवादाप्रमाणे समाजवादी क्रांती पूर्ण विकसित भांडवलशाही राष्ट्रांत शक्य असल्यामुळे रशियाची त्या वेळची समाजस्थिती लक्षात घेता तेथे प्रथम भांडवलशाही लोकशाही क्रांतिसाठी लढणे कामगारवर्गास प्राप्त आहे. भांडवलशाहीचा पूर्ण विकास झाल्यावरच पुन: कामगारवर्गास समाजवादी क्रांतीसाठी लढा द्यावा लागेल. अर्थात् तोपर्यंत पश्चिम युरोपात समाजवादी क्रांती झालेली असेल असेच प्लेखानोव्ह, सर्व मेन्शेव्हिक आणि स्वत: लेनिनचेही मत होते. परंतु पार्व्हसने व ट्रॉटस्कीने असे मत मांडले की, या दोन्ही क्रांत्या घडविण्याचे कार्य सातत्याने रशियन कामगारवर्गास आपल्या नेतृत्वाखाली करावे लागेल. स्वत: लढून मग भांडवलशाही प्रस्थापित करून आपली पिळवणूक करावयास देण्याचे कार्य कामगारांनी करणे मूर्खपणा ठरेल व त्यासाठीच कामगारवर्गाची हुकूमशाही (म्हणजेच बहुसंख्यांची अल्पसंख्य पिळवणूक करणाऱ्या वर्गावरील हुकूमशाही) काही काळ स्थापावी लागेल. मात्र ही क्रांती चिरस्थायी होण्यासाठी पश्चिम युरोपात, विशेषत: जर्मनीत, समाजवादी क्रांतीचे प्रयत्न करावे लागतील. या रशियन क्रांतीचा स्थायीभाव जनतेचा स्वयंस्फूर्त उठाव हाच असेल.

१९०५ च्या क्रांतीत पार्व्हस व ट्रॉटस्की यांनी पीटर्सबर्गच्या सोव्हिएटमार्फत प्रमुख भाग घेऊन आपले सिद्धांत अधिक पारखून घेतले. १९०६ मध्ये सैबेरियात हद्दपार झाल्यावर

पार्व्हस तेथून जर्मनीत परत आला व त्याने राजकारणातून अंग काढले व उद्योगधंद्यात लक्ष घातले. लौकरच त्याचा जर्मन वरिष्ठ वर्तुळातही प्रभाव पडू लागला. १९१४ मध्ये त्याने कैसरला पाठिंबा देऊन सर्व रशियन समाजवाद्यांची नाराजी ओढवून घेतली. याबाबत त्याचे असे मत होते की, जर्मन लष्कराकडून रशियाचा पराभव झाल्यास रशियात क्रांती होऊन युरोपीय क्रांतीचा मार्ग सुकर होईल म्हणून जर्मनीस पाठिंबा देणे अवश्य आहे. याचसाठी लेनिनने रशियात जाऊन रशियाला युद्धातून बाहेर काढावे म्हणून त्याने लेनिनला रशियात जाण्यास मदत केली.

शेवटी हे नमूद करावेसे वाटते की १९०५ साली ट्रॉटस्कीने मांडलेले विचार आपल्यापरीने फिरवून लेनिनने प्रत्यक्षात आणण्याचे कार्य १९१७ मध्ये केले व म्हणूनच लेनिनशी १९१७ त ट्रॉटस्कीचे जमू शकले. अर्थात लेनिनमधील सुप्त हुकूमशाही प्रवृत्तींनी ट्रॉटस्की, रोझा लुक्झेंबर्ग यांनी जोपासलेल्या जनतेच्या स्वयंस्फूर्त उठावाच्या प्रवृत्तीवर अखेरीस मातच केली.

**भालचंद्र राजे**, कल्याण.

**स. न.** ऑक्टो. २७

'माणूस' चा मी नित्य वाचक आहे. भारताच्या समस्या अन् त्याचा वैद्य फक्त माणूसच असे मी मानतो. हे प्रत्यक्षात सांगणारा 'दिवाळी अंक' पाहून माझा अंदाज साफ खोटा ठरला. त्यात माझी अन् इतर वाचकांची खासच दिशाभूल झाली. वाचकांच्या समस्या गुंडाळून त्यांना मेंडी बाजारातील पुरचुंडी हातांत मिळाली.

**राजा हर्षे**, पुणे ४

**स. न.** ऑक्टो. १७

दि. १४-१०-६७ च्या 'माणूस' च्या चित्रपट परीक्षणात 'सांगू कशी मी' या बोलपटाच्या संदर्भात पुढील वाक्ये आहेत— ..." अहिल्येची कथा अनंत माने यांनी पडद्यावर आणली आहे. पटकथा संवादही त्यांचेच असल्याने कथानकातील ठिसूळ मालमसाल्याचा मोठा वाटा स्वाभाविकपणेच त्यांच्याकडे जातो.'

या संदर्भातील वस्तुस्थिती अशी आहे:– (१) "सांगू कशी मी" या बोलपटाची चित्रकथा व संवाद माझे आहेत. (२) ही चित्रकथा माझ्या 'वाकडे वळण' या पूर्वीच प्रसिद्ध झालेल्या व 'रंगमंच' या माझ्या कथासंग्रहात संकलित झालेल्या गोष्टीवर आधारलेली आहे. अर्थात् मूळची कथाकल्पना व तिचा बोलपटासाठी केलेला विस्तारही बव्हंशी माझाच आहे. (३) बव्हंशी म्हणण्याचे कारण इतकेच की बोलपटाचा प्रारंभीचा भाग बराच बदलण्यात आलेला आहे. तो माझा किंवा मी लिहिला तसा नाही. (४) ह्या प्रकारचे बदल दिग्दर्शक, व निर्माते बोलपटाचे बरे व्हावे, म्हणून त्यांच्या कल्पनेप्रमाणे करीत असतात. ह्या बोलपटाचे निर्माते व दिग्दर्शक श्री. अनंत माने यांची धडपड एक चांगला, वेगळा व यशस्वी चित्रपट काढण्याची होती. त्यात पुष्कळ अंशी ते यशस्वी झाले आहेत.

**पु. भा. भावे**, डोंबिवली

# यांचा चेहेरा दुर्मुखला कशामुळे ?



यांनी पाठविलेली तार वेळेवर पोहोचली नाही. त्याचा दोष टपाल व तार खात्याकडे आहे असं यांना वाटत असावं. पण कदाचित यांनी दिलेला पत्ताच पूर्ण नसेल.

● तार महत्त्वाची असते व ती तातडीने पोहोचायला हवी असते हे खरं. नाहीतर तार करण्याचा उद्देशच नाहीसा होतो.

● तारा जलदीने पोहोचविण्यासाठी तार खाते सर्व प्रकारे काळजी घेते. पण त्यासाठी पत्ता बिनचूक व संपूर्ण असणे तितकेच आवश्यक असते.

● नेहमी संपूर्ण पत्ता लिहीत चला.—पोस्टाचा विभाग क्रमांकही त्यात लिहीत जा. त्यामुळे इष्ट स्थळ चटकन सापडते. विभाग क्रमांक लिहिल्यास जादा पैसे द्यावे लागत नाहीत.

**आपली अधिक चांगली सेवा करण्यास आम्हांला सहाय्य करा**

भारतीय टपाल व तार खाते

67/105 MR

# संमिश्र सरकारांनी घडविलेले दर्शन

हरियाना, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या तीन राज्यांमध्ये गेल्या दोन-तीन आठवड्यांमध्ये ज्या काही राजकीय घडामोडी झाल्या त्यांचा विचार करू लागले की मन विषण्ण होते. आपल्या सांसदीय राजकारणाने कोणती पातळी गाठली आहे याचे हे एक बोलके चित्रच म्हटले पाहिजे. हाती आलेली सत्ता टिकविण्यासाठी राजकारणात वावरणारी आणि वावरताना उच्च तत्त्वांचा उद्घोष करणारी मंडळी आपली सद्सदविवेकबुद्धी गुंडाळून ठेवून कसे स्वैर वर्तन करतात याची उदाहरणे दररोज पाहावयास व वाचावयास मिळत आहेत.

गेल्या मार्चमध्ये राव बीरेंद्रसिगांनी भागवतदयाल शर्मा यांना बाजूस सारून हरियानाची राज्यसूत्रे आपल्याकडे घेतली. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर निवासस्थानी परततात्च ते मला भेटले होते. शर्मा यांचे राजकारण कसे सत्ताबाज आहे याचे त्या वेळी त्यांनी मोठ्या चवीने वर्णन केले होते. मुख्यमंत्रिपद शर्मांकडे यापुढेही राहिले तर हरियानाचा जणू काही सारा विकासच थांबेल या जाणीवेने आपल्याला निरुपायाने त्यांच्याकडून सत्ता हिसकावून घ्यावी लागली असे त्यांनी सांगितले होते. वस्तुतः शर्मा यांच्याशी त्यांचे कोणतेही वैचारिक मतभेद नव्हते. शर्मांजींनी बीरेंद्रसिगांना एखादी खुर्ची दिली असती तर त्यांनी हा बंडाचा झेंडा उभारला असता का, असा एक प्रश्न त्या वेळी माझ्या मनात येऊन गेला. परंतु त्या वेळी असला प्रश्न उपस्थित करणे अनुचित ठरले असते आणि म्हणून मी गप्प बसलो. त्या वेळी काँग्रेसेतर पक्षांच्या मंत्रिमंडळांनी देशातले सारे वातावरण इतके भारून गेले होते की त्यांच्या स्वरूपाविषयी वा भवितव्याविषयी विचार करण्याचे कोणालाच भान उरले नव्हते.

या चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या सुमारास 'लंडन टाईम्स'च्या दिल्लीतील वार्ताहराने भारतीय लोकशाहीचे विश्लेषण करणारे वार्तापत्र लिहिले होते. त्यात त्याने भारतात पक्ष नसून तट आहेत आणि त्यांचे स्वरूप सरंजामशाही समाजव्यवस्थेला शोभेसे आहे असे म्हटले होते. टाईम्समध्ये हे वार्तापत्र प्रसिद्ध होताच 'हा बघा भारतद्वेष्टया ब्रिटिश पत्रकाराचा कांगावा' अशाच शब्दांत त्याची आपल्या येथे

वासलात लावण्यात आली होती. परंतु पक्षीय निष्ठा अशी आपल्या अंगी फारशी उरलेली नाही. राजकीय पक्षांमध्ये वावरणारी मंडळी गटागटानेच राहत असतात आणि गटांच्या निष्ठाच काय त्या तेवढ्या पाळत असतात असे आपल्याला गेल्या आठ-दहा महिन्यांत दिसून आले असताना एका परदेशी पत्रकाराच्या विश्लेषणाची दखल घेण्याऐवजी त्याच्याविरुद्ध गहजब करण्याची काहीच जरुरी नव्हती.

आज हरियानामध्ये अशी परिस्थिती आहे की, कोण कोणत्या पक्षाचा ( नव्हे गटाचा ) आहे हेच कळत नाही. त्या विधानसभेतल्या काही सदस्यांनी तर गेल्या आठ-दहा महिन्यांत चार वेळा पक्षांतर केलेले आहे. भागवतदयाल शर्मा यांनी आपल्या मंत्रिमंडळामध्ये चार सदस्यांची वाढ करण्याचे ठरविताच बीरेंद्रसिगांनी केवढा आरडाओरडा केला होता. नंतर त्यांनी स्वतःच्या होयबांचा विशाल हरियाना पक्ष या नावाचा वेगळा गट स्थापन केला आणि विधानसभेत या गटाचे जे एकतीस सदस्य आहेत त्यांपैकी तेवीस जणांना मंत्रिपदाची खिरापत वाटण्यात आली आहे.

## पोकळ डोलारा

नुकताच राजेंद्रसिंग नावाचा कॉंग्रेस सदस्य या गटात सामील झाला, तो मंत्रिपद मिळणार आहे या आश्वासनामुळेच. हरियाना विधानसभेचे अधिवेशन सुरू झाल्यानंतर बीरेंद्रसिगांच्या वैयक्तिक सामर्थ्याची कसोटी लागणार आहे. त्या वेळी आपण या कसोटीस उतरले पाहिजे या जिद्दीने बीरेंद्रसिगांनी मंत्रिपदाची आमिषे दाखवून विरोधी पक्षांतील सदस्य फोडण्याचे सत्र पद्धतशीरपणे चालू ठेवले आहे.

हरियानामध्ये बीरेंद्रसिगांच्या या लीला चालू आहेत तर बंगालमध्ये अजयबाबूंची परिस्थिती अतिशय चमत्कारिक झालेली आहे. डाव्या कम्युनिस्टांच्या अरेरावीला कंटाळून त्यांनी काही दिवसांपूर्वी स्वतःच राजीनामा देण्याची तयारी केली होती. खरे म्हणजे, त्या वेळीच बंगालमध्ये संमिश्र सरकार कोसळणार होते. परंतु नमते घेण्याचा तात्पुरता देखावा करून डाव्या कम्युनिस्टांनी ते गंडांतर टाळले. त्यानंतर सारे काही शांत झाल्यासारखे वाटत होते. परंतु डॉ. प्रफुल्लचंद्र घोष यांच्या राजीनाम्यामुळे पुन्हा एकदा अजयबाबूंची नौका हेलकावे खाऊ लागली असून ती सावरली जाण्याची शक्यता बरीच कमी आहे. बंगालमधील संमिश्र मंत्रिमंडळ अंतर्गत मतभेदांनी आणि डावपेचांनी इतके पोखरले गेले की तेथे सध्या कोणाचे प्रशासन आहे असा प्रश्न विचारला गेला तर त्याचे नेमके उत्तर देणे कठीण आहे. अजयबाबूंची वैयक्तिक लोकप्रियता दांडगी आहे. ते स्वतः निस्पृह आहेत. परंतु कम्युनिस्टांशी संगत केल्यानंतर आपण स्वतः होऊनच आपली कशी दमछाक करून घेतो याचा अजयबाबू अनुभव घेत आहेत. त्यांच्या या असहाय्य स्थितीला कंटाळूनच डॉ. घोष यांनी मंत्रिमंडळातून बाहेर पडण्याचे ठरविले. घोष यांच्या निर्गमनापुढे अजयबाबूंची मंत्रिमंडळातील बाजू लंगडी पडली असून त्यांना आता ज्योति बसूंशी सामना करणेही जड जाणार आहे.

उत्तर प्रदेशातल्या चरणसिगांची परिस्थितीही यापेक्षा वेगळी नाही. मध्यंतरी त्यांच्याविरुद्धही संयुक्त समाजवाद्यांनी व उजव्या कम्युनिस्टांनी असहकाराचा झेंडा उभारला होता. चंद्रभानु गुप्ता यांच्याविरुद्ध समर्थ झुंज देण्यासाठी या डाव्या पक्षांनी चरणसिगांना कॉंग्रेस पक्षातून बाहेर पडण्याचे आवाहन केले व ते त्यांनी मानले याचे पारितोषिक म्हणून संयुक्त दलातील त्यांच्या गटाची सदस्यसंख्या नगण्य असतानाही त्यांना फरक मंत्रिपद बहाल करण्यात आले. आपल्या मेहेरबानीमुळे चरणसिग मुख्यमंत्री झाले असल्यामुळे आपण सांगू तसे त्यांनी वागले पाहिजे अशी या डाव्या पक्षांची अपेक्षा आहे. राज्यकारभार करताना केवळ सिद्धान्तवादी राहून चालत नाही. व्यावहारिक भूमिकेवरूनच अनेक प्रश्न हाताळावे लागतात हा चरणसिगांचा दावा केवळ असंतोषावर स्वार होणाऱ्या डाव्या पक्षांना रुचला नाही आणि म्हणून त्यांनी प्रत्येक वेळी चरणसिगांना कोंडीत पकडण्याचे तंत्र अवलंबले. परंतु एवढे करूनही चरणसिग ऐकत नाहीत असे आढळून आल्यानंतर आम्ही तुमची साथ सोडतो अशी या पक्षांनी दमदाटी करण्यास प्रारंभ केला. प्रकरण एवढ्या टोकापर्यंत गेल्यानंतर चरणसिगांनाही निरुपायाने त्यांची मागणी मान्य करावी लागली.

हरियाना, बंगाल आणि उत्तर प्रदेश या तीन राज्यांतील या घटना पाहता केवळ कॉंग्रेसविरोध या नकारार्थी भूमिकेवरून एकत्र आलेल्या राजकीय पक्षांचा डोलारा किती पोकळ आणि कॉंग्रेसइतकाच किती सत्तांध आहे याची कल्पना येते. मंत्रीपदांची खिरापत वाटून जनतेच्या पैशाची अशी उधळपट्टी करण्याचा या पक्षांना कोणता अधिकार आहे हा प्रश्न मतदारांनी विचारलाच पाहिजे आणि या प्रश्नांचे रोखठोक उत्तर मिळाल्याशिवाय त्यांच्या घोषणांनी फसून न जाण्याची सावधगिरी बाळगलीच पाहिजे. त्यातून या अंतर्गत कटकटीमुळे या मंत्रिमंडळांनी प्रशासनकार्याकडे जे दुर्लक्ष केले आहे ते तर सर्वस्वी अक्षम्य आहे. आपल्याला मान्य असलेला कार्यक्रम कार्यवाहीत आणण्यासाठी सत्तास्वीकार करणे हे कोणत्याही राजकीय पक्षाचे उद्दिष्ट समजण्यासारखे आहे. परंतु केवळ सत्तास्वीकार हेच ज्यांचे ध्येय आणि कार्यक्रम झाला आहे ते राजकीय पक्ष जनतेचा उद्धार करू शकतील अशी आशा बाळगणे सर्वथैव वेडगळपणाचे ठरते. लोकांना कॉंग्रेसच्या भ्रष्टाचारी राजवटीचा वीट आला म्हणून त्यांनी निरुपायाने या पक्षांकडे सत्ता दिली. परंतु सत्तांध राजकारणाच्या खेळात आपण कॉंग्रेसइतक्याच खालच्या पातळीवर जाऊ शकतो एवढंच या पक्षांनी गेल्या काही दिवसांत दाखवून दिले आहे. असे असताना एखाद्या परदेशी वार्ताहराने त्यासंबंधी लिहिले, तर आम्ही काय म्हणून गहजब करावा ?

सदाशिव पेठकर

# मुक्ताफळे

## □ स्वेटलाना काय म्हणते ?

सांगु कशी मी ?... वगैरे नाही. स्वेटलानाने सांगून टाकले. अगदी नको ते सांगून टाकले. महत्त्वाचे सांगून टाकले. बापाची पापे सांगितली. बेरियाची पापे सांगितली. स्टॅलिन मेला कसा तेही सांगितले. शहाजहान बादशहा मेला तसा बिचारीचा बाप मेला.

" आजार वाढत चालला होता. अंग सुजत चाललं होतं. जीभ सुजली. दारा व विश्वासातले तीन-चार दरबारीच त्याच्यापर्यंत जात. प्रत्यक्ष मरण्यापूर्वी कितीतरी दिवस बादशहा मेल्यासारखाच होता ! परंतु झरोक्यातून आपला चेहरा जनतेला दाखवण्याचे त्याला बंद करता आले नाही. रयतेला बरे वाटे. झरोक्यात अजून बादशहा आहे ! "

शहाजहान असा मेला. मोगली सल्तनत बदलायचा प्रसंग आला की, राजवाड्यात खून, मारामाऱ्या होत असत. बादशहा मुलाचा खून करतो की आधी मुलगाच बादशहाला उडवतो एवढाच काय तो सवाल असे.

The man who is a murderer in many cases desires to be murdered – असे सुप्रसिद्ध अश्लील लेखक डी. एच. लॉरेन्स म्हणतो. अनेक जणांच्या हत्येचे धनी होण्याचे दोन प्रकार आहेत. अती चांगुलपणामुळे माणूस अनेकांची हत्या घडवून आणतो. ही माणसे मरणाला भीत नाहीत. ती मारली गेली तर हुतात्मे ठरतात. केवळ आपल्या आकांक्षेआड येतात म्हणून अनेकांचे खून जेव्हा सत्ताधीश घडवतात तेव्हा मरणापूर्वी मरूनही मरणकाळी त्यांना खुनाच्या भीतीने झरोक्यातून बसावे लागते. अर्थात जी निरपराध माणसे हत्याकांडात नाहीशी होतात त्यांच्या दृष्टीने आपल्याला मारणारा हुतात्मा झाला की झरोक्यात गेला याला फारसे महत्त्व असू शकत नाही. ती माणसे विचारी महत्प्रयासाने लाभलेला मानवदेह गमावतात. बकरीने कोवळे गवत खावे तशी त्यांची आयुष्ये संपतात.

स्टॅलिन झरोक्यात मेला असाच सर्व प्रामाणिक माणसांचा अंदाज होता. मिलोवन जिलासने 'कॉन्व्हरसेशन्स वुइथ स्टॅलिन' या पुस्तकात दर्शन घडविलेला लाल हुकूमशहा मोकळ्या हवेत मरू शकणार नाही असाच सर्वांचा अंदाज होता. स्वेट-

लानाने सांगून टाकले– होय हो होय– माझा बाप असाच एका अंधाऱ्या खोलीत मेला. आपला खून होईल या भीतीने तो पछाडलेला होता. संशयाने तो ग्रासलेला होता.

स्टॅलिन असाच मरणार होता; कारण आत्मा हरवलेल्या राजवटीचा तो पापी सत्ताधीश होता. डॉ. लोहिया अमेरिकेत गेले तेव्हा अलाबामा येथील सभेत त्यांनी एक हकीकत सांगितली–

डॉ. राधाकृष्णन भारताचे रशियात दूत असताना स्टॅलिनने विचारले– "आत्मा ही काय वस्तू आहे!"

राधाकृष्णन म्हणाले– "जी तुमच्याजवळ नाही– ती!"

अशा या स्टॅलिनशहाने अंत जवळ आला तेव्हा क्रेमलिन सोडले. चौफेर भला मोठा पहारा बसवलेल्या एका खेड्यातील निवासात स्टॅलिन राहायला गेला. या खेड्यातून त्या खेड्यात असा तो सारखा मुक्काम हलवीत असे. आसपास घोटाळणाऱ्या यच्चयावत व्यक्तींचा त्याला संशय असे. त्याच्या या वागण्याने त्याने निर्माण केलेली प्रचंड औद्योगिक यंत्रणा कोलमडण्याच्या अवस्थेला येऊ लागली होती. त्याच्या खासगी जीवनाची पार राखरांगोळी झालेली होती.

स्वेटलानाची कहाणी चार अंकी आहे. पहिला अंक उघडतो तो मॉस्कोजवळच्या एका खेड्यात छोटी स्वेटलाना घरात मोकळेपणाने फिरत असते. पाव्हलुशा व अलियोशा हे दोन काका, सावत्र भाऊ याया व धाकटा भाऊ वास्या यांच्या आठवणी सांगते. १९३२ साली तिची आई आत्महत्या करते! इथे पहिला अंक संपतो. दुसऱ्या अंकात घर मोडू लागते. भांडणे सुरू होतात. तिसऱ्या अंकात बापाचा द्वेष करणारा तिचा भाऊ वास्या हा दारू पिऊन पिऊन वयाच्या ४१ व्या वर्षीच निधन पावतो. यायाला महायुद्धात जर्मनांनी पकडलेले असते. त्याला सोडण्यासाठी रशियन प्रयत्न करतात. परंतु स्टॅलिनला लढाईतले हे धर्मयुद्धाचे नाटक नको असते. यायाला जर्मन गोळ्या घालतात. जवळचे नातेवाईक असे संपतात. बायकोची बहीण, तिचा नवरा, आत्या, आत्याचा नवरा, काका या सगळ्यांची स्टॅलिन वासलात लावतो. इथे तिसरा अंक संपतो. चौथ्या अंकात हुकूमशहा म्हातारा झालेला आहे. संशयाने त्याला पछाडलेले आहे. भुतासारखा तो एकलकोंडा राहतो. कधी कुणावर खेकसेल त्याचा नेम राहत नाही. बेरिया विकलांग हुकूमशहाच्या आशीर्वादाने गोळ्या घालून माणसे मारण्याचे काम इमानेइतबारे करीत राहतो. आपला खून होईल या भीतीने दिवाभीताप्रमाणे कोंडलेले आयुष्य जगणाऱ्या आपल्या बापाचे चित्रणच केवळ स्वेटलानाने केले असते तर ते एक मामुली चित्रण झाले असते.

परंतु स्वेटलानाने प्रत्येक पापाबरोबर त्याच्या मानसिक अवस्थेत झालेला बदल जो ठिकठिकाणी सूचित केला आहे तो महत्त्वाचा आहे.

स्वेटलानाची आई ही साधीसुधी स्त्री–हृदयाची होती. स्टॅलिन सामुदायिक शेतीच्या विरोधकांच्या ज्या कत्तली घडवून आणून नामानिराळा राहत होता त्याच्या त्या ढोंगीपणाचा तिला उबग आला होता. अशा माणसावर पत्नी म्हणून प्रेम करणे तर तिला शक्यच होत नव्हते. घरात रोज भांडणे व वादावादी होत असे. अखेर तिने नवऱ्याला एक पत्र लिहिले आणि स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. हे पत्र काहीसे राजकीय स्वरूपाचे होते, असे स्वेटलाना म्हणते. हे पत्रे स्टॅलिनने दाबून टाकले. आपल्यावर शिंतोडे उडविण्याकरताच स्वेटलानाच्या आईने आत्महत्या केली असे तो सांगत असे. स्टॅलिन मुळातच क्रूर व भावनाशून्य होता, त्यात बायकोने घेतलेला हा विचित्र सूड पाहताच त्याचे माथे फिरले. कुणी तिला हे करायला उद्युक्त केले ? हा कट कुणी रचला ? केव्हा रचला ? याचा तो वेध घेऊ लागला. बायकोची आत्महत्या हा आपल्या पाठीत विरोधकांनी खुपसलेला खंजीर होय अशी त्याची भावना झाली. रक्ताच्या नात्याचा त्याचा विश्वासही उडाला.

बापाविषयी त्याची मुलगी लिहीत आहे ही गोष्ट स्वेटलाना आपल्या निवेदनात कधीही विसरत नाही. सगळ्या स्वजनांच्या हत्येच्या मागे बेरिया होता असे तिचे आग्रहपूर्वक सांगणे असले तरी एका ठिकाणी ती सांगून टाकते–

" बेरिया आणि माझे वडील यांचे आंतरिक ऐक्य होते यात संशय नाही. दोघांनी मिळून हजारो माणसे गोळ्या घालून मारली, लाखो लोक मरेपर्यंत तुरुंगात डांबले व लाखोंचा अनन्वित छळ केला ! " स्वेटलाना आग्रहपूर्वक इतकेच सांगते–

" बेरिया हा अधिक पाताळयंत्री, कृतघ्न व लुच्चा होता ! पुरुष–प्रकृती अशी ही जोडी असली तरी माझा बाप हा बेरियाची प्रकृति होता असेच म्हटले पाहिजे. माझा बाप आतून मोडलेला आहे हे बेरियाने ओळखले होते. त्याच्या स्वभावातील कमकुवत बाजू बेरियाला माहीत होती. तो माझ्या बापाची स्तुती करी. आगीत तेल ओती–"

प्रत्यक्ष मुलगी बापाच्या कृष्णकृत्यांविषयी यापेक्षा जास्त स्पष्ट कसे सांगणार ? परंतु बेरिया मॉस्कोला दाखल झाला त्यापूर्वी स्टॅलिनचे हात अनेकांच्या कत्तलीत रंगलेले होते त्याचे काय ? १ डिसेंबर १९३४ या दिवशी लेनिनग्राडचा पक्षनेता किरॉन्ह याचा खून स्टॅलिनने घडवून आणला आणि 'शुद्धीकरणा'ला सुरुवात झाली ! याच महिन्यात मॅक्झिम गॉर्की व त्याचा मुलगा यांचाही खून करण्याचा प्रयत्न स्टॅलिनने केला. परंतु तो फसला असे म्हणतात. सत्ताधीश असूनही प्रयत्न फसला. कारण पडद्याआड राहून स्टॅलिन मारेकरी घालीत होता.

१९३० साली सतराव्या सोविएत कांग्रेसला जे १९६६ प्रतिनिधी हजर होते त्यातले ११०८ प्रतिनिधी या शुद्धीकरणात शुद्ध झाले. याबरून पापस्तानातील हुकूम-

शाहीची कल्पना येईल. दुसऱ्या महायुद्धातील रशियन सेनानी मार्शल बुडेनी हा आता ८६ वर्षांचा आहे. तो सांगतो की, लाल सैन्यातील ७५,००० अधिकाऱ्यांपैकी १/३ ते १/२ एवढे अधिकारी १९३४ ते ३९ या कालखंडात निजधामास पाठवले गेले ! लाल सैन्य असे पंगू न होते तर हिटलरची सैन्ये मॉस्कोच्या उपनगरापर्यंत धडक मारू शकली नसती !

"क्रेमलिन सोडल्यानंतर लाल हुकूमशहा एका खोलीत एकटा राहत असे. खोलीला कपाटे नसावी, फारसे सामान तिथे नसावे, असा त्याचा आग्रह असे घरातल्या सगळ्या खोल्या इतक्या आणि अशाच ठेवण्यात येत. एका सोफ्यावर तो दिवसा बसे. रात्री त्याच सोफ्याचा पलंग करून त्यावर तो निजत असे. जेवणाच्या टेबलावर तो एकटाच जेवत असे.

बापाची ही दिनचर्या सांगितल्यानंतर स्वेटलाना सांगते की, पहारा करणाऱ्या रक्षकांवर तो कधी संतापेल याचा नेम नसे. एकदा एक रक्षक त्याच्यामागून येत असताना त्याने त्याच्या मुस्कटात भडकावली व रक्षक पळाले ! भेटायला आलेल्या किंवा भेटलेल्या लष्करी वा मुलकी अधिकाऱ्यांना तो म्हणे–

"तुम्ही सर्व बांडगुळे आहात. तुम्ही इथे पैसा करता हे मला माहीत आहे. तुमच्या बोटांतून किती पैसा वाहतो आहे हे मला समजत नाही असे मानू नका !"

स्टॅलिनला पुरते वेड लागलेले नव्हते. परंतु मरणाच्या भीतीने आपल्याभोवती रक्षक असावेत असा त्याचा आग्रह असला तरी भोवती रक्षक ठेवून आपण जगतो याचा त्याला वारंवार विषादही वाटे, यांमुळे मानसिक स्वास्थ्य लाभावे म्हणून केलेली आरक्षकांची योजनाच त्याला वेडाचार करायला भाग पाडीत असावी.

प्रेमात पडलेल्या स्वेटलानाच्या पहिल्या प्रियकराला (हा सिने-दिग्दर्शक होता) केवळ तो ज्यू आहे म्हणून तुरुंगात पाठवणारा स्टॅलिन, प्रियकराला भेटली म्हणून मुलीला मारणारा स्टॅलिन, डॉक्टरांना उपचार करू न देताच ते आपल्याला विषप्रयोग करू पाहत आहेत, असा आरोप करणारा स्टॅलिन हा जिलासने रंगवलेला स्टॅलिन किंवा क्रुश्चेव्हने विसाव्या सोविएट काँग्रेसच्या गुप्त बैठकीत २४ फेब्रुवारी १९५६ रोजी रात्री आपल्या भाषणात रंगवलेला स्टॅलिन, या दोन्ही चित्रांशी अगदी मिळता जुळता आहे.

क्रुश्चेव्हने स्टॅलिनला बदनाम केला; व त्याचे प्रेत उखडले. परंतु ज्या राज्यपद्धतीत असे राक्षस निर्माण होतात त्या राजवाड्याची खिडक्या-दारे तो जरा मोकळी करू लागताच त्याचीही उचलबांगडी झाली !

रशियन क्रान्तीला ७ नोव्हेंबर १९६७ ला ५० वर्षे पुरी झाली आहेत. या ५० वर्षांत घडलेल्या पापांचा एकच साक्षीदार तूर्त जिवंत आहे– मोलोटोव्ह ! यांतही निम्मी शिम्मी माणसे स्टॅलिनने खलास केली. काही मरण पावली· स्टॅलिनही गेला.

अशा या भयंकर गोष्टी जाहीर रीतीने सांगण्यासाठी रशियातून परागंदा झालेल्या स्वेटलानाला आश्रय देण्यास इंदिरा सरकारने नकार दिला हे बरोबरच केले नाही का ? डॉक्टर लोहिया लोकसभेत म्हणाले–

" एका आपद्ग्रस्त सुकुमार मुलाला हे सरकार संरक्षण देऊ शकले नाही ! हा मुख्यत: माणुसकीचा प्रश्न आहे. परंतु सरकारला पाझर फुटत नाही. "

विरोधकांना बोलायला काय होते ? ज्यांना ज्यांना रशियाच्या चालू मालकांच्या भीतीने घाम फुटतो त्यांना कधीही पाझर फुटला नाही म्हणून आपले काय हो बिघडणार आहे ?

## ☐ वजन

गणपा, म्हादबा, शिवाप्पा, लखबा हे धारवाडचे चार असामी पुणे पाहत फिरत होते. गणपा १५–१६ वर्षांपूर्वी यकवार पुण्यात आलेला होता. त्यामुळे या डेलिगेश-नचा तोच लीडर होता.

शनवारवाडा पाहून झाला. पर्वती झाली. शिंद्यांची छत्री झाली. अखेर मंडळी संभाजी उद्यानात आली.

बराच वेळ त्यांनी संभाजी महाराज शोधले. राम गणेश गडकऱ्यांचा पुतळा दिस-ताच महाराज सापडल्याचा आनंद त्यांना झाला. गणपा म्हणाला,

" म्हादबा, आपल्या इठूअप्पाच्या पोरागत व्हता म्हन की संभाजीमहाराज !"

म्हादबाने मान हलवली. गणपा म्हणाला—

"इठू अप्पा केवढा धिप्पाड आन त्याचं पोर का असं किरटंकुरटं झालं. काही कळना ?"

उद्यानात बाकी पाहण्यासारखे काही नव्हते. फिरता फिरता अखेर चौकडी वजन करण्याच्या यंत्राजवळ आली. त्या यंत्राच्या चारी अंगाला फिरून त्यांनी तपासणी केली. दुपारच्या वक्ताला येवढं यंत्र टाकून म्हादबाने माणूस कुठं निघून कसा काय गेला त्याचे आश्चर्य व्यक्त केले. तितक्यात एक टाय लावलेला, चौघांनी फुंकर मारली तर उडेल असा माणूस तिथे आला. यंत्रावर चढला. खिशातून १० पैशाचे नाणे काढून त्याने आत टाकले. ढेकर दिल्यागत यंत्रातून आवाज आला आणि गिळकन तिकीट बाहेर आले.

गणपाने विचारले,

" पाहुणे, हे काय हायी ?"

" वजन, वजन ! ह्यावर माझं वजन लिहून आलंय्."

तो माणूस निघून जाताच म्हादबा म्हणाला, " ह्याचं काय वजन लिहून येणार ?"

गणपतने विचारले–

" म्हादबा करूया आपुन बी वजन–"



"चार भार कमी आहे तर काय मरतुयास का तू ? उगाच आपलं पैसं नासायचं."

शिवाप्पाने खर्चावर ऑडिट काढले.

शेवटी भवती नभवती होऊन तडजोड झाली की दहाच पैसे खर्च करावे. येईल त्या वजनाचे सारखे चार भाग केले तरी भागेल.

दहा पैसे हातात घेऊन गणपा वर चढला. त्याच्या दोन्ही खांद्यांवर म्हादबा आणि शिवाप्पा चढले. गणपाच्या दोन्ही पायांत लखबा उकिडवा बसला. यंत्र एक-दोन वेळा उलटल्यागत हलले. पण गणपाने चलाखी करून घट्ट धरून ठेवले.

स्थिरावस्था होताच गणपाने दहा पैशाचे नाणे भोकात सरकवले. काट्याने गिरक्या घ्यावयास सुरुवात केली. यंत्रातून ढेकरावर ढेकर सुरू झाले. चारी बलदंड वजनाचे तिकीट कधी येते ते पाहू लागले. काटा थांबत नव्हता की, ढेकरा थांबत नव्हत्या. अखेर कंटाळून सगळ्यांनी खाली उड्या मारल्या. तोपर्यंत यंत्राचे डोळे पांढरे झालेले होते.

तिथून निघताना गणपा म्हणाला–

"म्हादबा ! शिवाप्पा म्हनाला म्हनून धाच पैसे गेले. नाहीतर चाळीस पैशाचा फटका काय चुकत नव्हता !"

– ग्यानबा

O

# फलज्योतिष :

प्राचीन कालापासून फलज्योतिष हा शब्द सर्वपरिचित आहे. गेल्या शतकापर्यंत ही एक 'दरबारकला' मानून हिचा उल्लेख विशिष्ट काली मर्यादित स्वरूपांत होत असे. मात्र गेल्या ८–१० वर्षांत नवीन पिढीतील पुष्कळसा सुशिक्षित व शात्रशुद्ध विचार करणारा वर्ग या विषयाची दखल घेत असून "फलज्योतिष हे शास्त्र आहे काय ?" येथपासून याची छाननी चालू आहे. आतापर्यंत एकंदर झालेल्या चर्चा केवळ वादात्मक होत्या. त्यांमधून विधायक असे काहीच निष्पन्न होऊ शकले नाही. प्रत्येक व्यक्ती आजकाल या विषयात थोडाबहुत रस घेते. प्रत्येकजण आपापल्या परीने या विषयावरील आपले उलट सुलट विचार स्पष्ट करीत असतो. या विषयाचा एक अभ्यासक म्हणून या विषयावरील माझे काही विचार वाचकांपुढे विवेचनासाठी मांडू इच्छितो.

ज्योतिष या शीर्षकाखाली येणारे प्रमुख दोन प्रकार–(१) **मुद्राज्योतिष** (२) **फलज्योतिष.** (१) **मुद्राज्योतिष**:– पहिल्या प्रकारात हातावरील, पायावरील रेषा, अंगप्रत्यंगावरील खाणाखुणा या विषयीचा विचार करून भविष्य वर्तविण्याचा विचार होतो. ह्यासंबंधी विचार या लेखात केलेला नाही. (२) **फलज्योतिष** : यांत प्रमुख तीन प्रकार आहेत (अ) दैवी ज्योतिष (Intuition, Inspiration, Will-power ); (आ) संख्या ज्योतिष (Numerology) (इ) कुंडली ज्योतिष–फल ज्योतिष–ग्रहजातक (Astrology)

(अ) **दैवी ज्योतिष**:– यामध्ये भविष्य सांगणारी व्यक्ती स्वत:मध्ये दैवी शक्ती आहे असे समजून आंतरिक स्फूर्तीने किंवा अंत:प्रेरणेने भविष्य सांगते. यात शास्त्राचा भाग किती आहे, हा वादग्रस्त मुद्दा आहे. त्याचप्रमाणे दैवावर ज्यांचा विश्वास नाही त्यांना दैवी शक्ती व तिचे सामर्थ्य या गोष्टी या विज्ञानाच्या युगात अनाकलनीय वाटल्यास नवल नाही. दैवी शक्तीचे अस्तित्व गृहीत धरूनही सांगणाऱ्याच्या अंगी ती आहे किंवा नाही हे अजमावता येत नाही किंवा ती किती आहे यांवर असे भविष्य मर्यादित असल्याने हे तर्कशुद्ध वाटत नाही.

(आ) **संख्या जातक**:– या प्रकारात आकडे प्रमाण मानले असून त्या आकड्यांचे गुणाकार, भागाकार, बेरीज, वजाबाकी करून येणाऱ्या बाकीवरून व्यक्तीच्या

विजय टेंबे

# एक तर्कशुद्ध विवेचन

जीवनातील घटनांची बेरीज–वजाबाकी ज्योतिषी मांडत असतो. म्हणून हाही प्रकार शास्त्रदृष्ट्या न पटणारा आहे.

(इ) कुंडली जातक:– निरनिराळ्या प्रकारांपैकी ज्योतिषाचा हाच प्रकार विशेष विचार करण्याजोगा आहे. जन्मकालीन ग्रहांच्या स्थितीवरून एखाद्या व्यक्तीच्या जीवनातील अनेक प्रश्नांचा विचार या शास्त्राद्वारे करता येतो. या विषयावर शास्त्रशुद्ध विवेचन पुढील उताऱ्यात केलेले आहे. यापुढे 'फलज्योतिष हा शब्द याच संदर्भाने वापरला आहे याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

सर्वप्रथम 'फलज्योतिष' हे शास्त्र आहे काय, याचा विचार करू. वारंवार-येणाऱ्या पडताळ्यांनुसार (Observations) मूलभूत शास्त्रावर आधारीत एखाद्या विषयाची तर्कशुद्ध व सुसूत्र मांडणी याचेच नाव शास्त्र. सुसूत्र मांडणी जितकी तर्क' शुद्ध असेल तितके ते शास्त्र अचूक व प्रगत समजले जाते. त्याचबरोबर शास्त्र म्हणजे सर्व अचूक, सर्व स्पष्ट असेही नव्हे. एखादे विधान अगर आधार चूक म्हणून सिद्ध होत नाही तोपर्यंत आधारभूत सिद्धांत खरे मानूनच शास्त्राची जोपासना सतत होत असते. मध्येच एखादा आइन्स्टाईन किंवा नारळीकर जन्मास येऊन मूलभूत अगर आधारभूत सिद्धांतातही सुधारणा होऊन शास्त्र अधिकाधिक अचूक बनत जाते. कोणतेही शास्त्र संशोधनाअभावी गूढ स्वरूपात (Occult) असते. 'रसायनशास्त्र' हे शास्त्र म्हणून संबोधण्यापूर्वी 'गूढ शास्त्र' समजले जात असे व लोक त्यावर विश्वास ठेवीत. पुढे हे गैरसमज शास्त्रज्ञांनी दूर केले. आजही भारतासारख्या प्रगत देशात 'देवीच्या लशीबद्दल' काही समाजांत गैरसमज असले तरी त्यामागील शास्त्र खोटे म्हणता येत नाही. जातकशास्त्राचा पाया म्हणजे ग्रह. ग्रह हे गोचर आहेत. (दिसू शकतात) त्यांचे निरनिराळ्या योगांचे अवलोकन करता येते व त्याची प्रचीती खगोल शास्त्रावर आधारीत आकडेमोडीने सिद्ध करता येते. ग्रहांच्या गती खगोलशास्त्राधारे तपासता येतात. आकाशमालेतील ग्रह केव्हा कसे फिरतील, त्यांची युती, प्रतियुती, काटकोनयोग, त्रिकोणयोग ह्या खऱ्या घटना आहेत. कुंडली जातक हे खगोलशास्त्रावर आधारीत एक आकडेशास्त्रच आहे. गणित व खगोलशास्त्र या दोन बहुमान्य शास्त्रांच्या जोडीला वर्षानुवर्षांचे पडताळे घेऊन ग्रहपरिभ्रमणांवर व्यक्तीच्या जीवनाच्या कालपटाची सांगड घालून या शास्त्राचा पाया रचला गेला आहे. 'ज्योतिष' शास्त्र म्हणण्यास ज्यांचा विरोध आहे त्यांच्या प्रमुख मुद्यांचा हा विचार झाला. आता इतर मुद्यांचा विचार करू.

(पृष्ठ ६२ वर)

## ☐ जपानी विवाह-पद्धतीतील क्रांती

आणखी एक जपानी विचारवंत नुकतेच भारतात येऊन गेले ते म्हणजे प्रा. कोजी हिदाका. प्रा. हिदाका हे प्रख्यात ' ओशिआनोग्राफर ' (" सागरशास्त्रज्ञ ") असून टोकियो विश्व-विद्यालयातील सागर-संशोधन संस्थेचे संस्थापक आहेत. ते म्हणतात, सागरशास्त्र पूर्वी हवामानशास्त्र इत्यादी निरनिराळया विभागांत वाटले गेले होते. सागराचा केवळ शास्त्रीय दृष्टया विचार करणारी संस्था अस्तित्वात नव्हती, म्हणून त्यांनी तशी संस्था काढली.

परंतु या विख्यात शास्त्रज्ञाची आणखी एक ख्याती आहे ती जपानी विवाह-पद्धतीत क्रांती घडवून आणणारा समाजसुधारक म्हणून. जपानी तरुण–तरुणींचे परस्परसंबंध वाढून त्यांना आपला जीवन-साथी निवडता यावा म्हणून हिदाका आपल्या घरी दर आठ–दहा दिवसांनी शे–दोनशे तरुण–तरुणींचे मेळावे भरवितात. हे मेळावे ' हिदाका पार्टीज् ' म्हणून जपानमध्ये गाजले आहेत. या मेळाव्यांचा उद्देश " जपानी विवाह–पद्धतीत सुधारणा घडवून आणणे हा आहे. पूर्वी आई-बाप लग्न लावून देत असत. पण प्रत्येकाने आपली पत्नी किंवा आपला पती स्वतःच निवडावा असे मला वाटते. "

हिदाका पार्टीज्ची कल्पना निघाली कशी ? " त्याचे असे झाले......मी तीन लग्ने केली. पहिल्या दोन बायकांशी माझे वैवाहिक जीवन सुखाचे झाले नाही. तेव्हा' माझे अपयश पुन: तरुण मंडळींच्या वाटयाला येऊ नये असा मी विचार केला. ' हे अपयश भोगावे लागू नये म्हणून पार्टीला येणाऱ्या तरुण–तरुणींना एकमेकांना नीट समजून घेण्यास सांगण्यात येते.

कोणाशीही लग्न करावयाचे असले तरी प्रथम त्या व्यक्तीला नीट समजून घेणे हितकारक असते. जपानसारख्या परंपराप्रिय समाजात ही कल्पना क्रांतिकारक नाही का ? होय, ती क्रांतिकारक असल्याचे म्हणण्यात आले आहे. ते काही असले तरी प्रयोग यशस्वी झाला आहे. " या पार्टीमुळे कित्येक हजार लग्ने जमली आहेत असे मला कळले आहे. "

## □ " व्हेजॅनिझम् "

अमेरिकेत जन्मलेले व अमेरिकेतच वाढलेले एक भारतीय श्री. दिनशा यांना जगातील सर्वांत अधिक औद्योगीकृत आणि भौतिकवादी समाजात राहूनही त्या समाजापासून अलग राहण्याची गुरुकिल्ली सापडली आहे. ती किल्ली म्हणजे 'व्हेजॅनिझम्.' ही व्हेजिटेरियॅनिझमची (शाकाहारवादाची) अत्यंत प्रगत आवृत्ती होय असे त्यांनी नुकतेच भारतभेटीत सांगितले. व्हेजॅनिझम् म्हणजे एखादी गूढ आचारसंहिता किंवा जीवन–मार्ग नसून अखिल प्राणिमात्राचे अधिकार जाणणे व त्यांच्याशी दया, ममता व न्यायाने वागणे म्हणजेच व्हेजॅनिझम् होय. व्हेजॅनिझम्चा मुख्य उद्देश सुपीक जमीन, भरपूर वृक्ष–सृष्टी आणि पृथ्वीवर अस्तित्वात असलेल्या साहित्याची योग्य विभागणी हा आहे. व्हेजॅनिझम् हा व्हेजिटेरियॅनिझम्पेक्षा खूपच कडक आहे. कारण व्हेजॅनिझम्चे अनुयायी दूध, चहा, कॉफी, चीज इत्यादी प्राणि-जन्य अन्नपदार्थ खात नाहीत; इतकेच नाही तर चामड्याचे जोडे व लोकरीचे कप-डेही घालत नाहीत. " आम्ही कृत्रिम लोकर, नायलॉन किंवा अशीच इतर कापडे वापरतो. "

## □ जपानचा शांति–पंथ

जपानची जगात ख्याती आहे ती ट्रान्झिस्टर रेडियो, कल्पकता, 'हैकू' काव्य आणि 'इकेबाना' पुष्परचना असल्या कसोटीबद्दल. सर्वसाधारण जपानी माणसाला या गोष्टींचा साहजिकच अभिमान वाटतो. पण त्याची अशी इच्छाही आहे की, आपला देश शांतीचा चाहता व शांतीसाठी झटणारा आहे अशी जगात ख्याती व्हावी. या इच्छेतून स्थापन झालेल्या " तेन्शो कोताइ जिंगू कियो " नावाच्या शांति-पंथाचे अध्वर्यू सायो कितामुरा हे नुकतेच प्रेम आणि शांतीचा संदेश घेऊन भारतात येऊन गेले. त्यांच्या मते जपानी जनतेने औद्योगीकरणाच्या व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात इतकी आघाडी मारली आहे की आता ते लोक आपले लक्ष आधिभौतिक गोष्टींकडे वळ-वीत आहेत. कितामुरांच्या शांतिपंथाची अशी श्रद्धा आहे की " शांती ही व्यक्तीच्या हृदयात निर्माण होते तेथून ती कुटुंबात, देशात व अखेर सबंध जगात पसरत जाते." मात्र हा पंथ म्हणजे एखादा संप्रदाय नाही. 'आमच्याजवळ व्यवसायानेच धर्मो-पदेशक अशी मंडळी नाहीत. देऊळही एकच आहे. इतर ठिकाणचे अनुयायी शाळेच्या सभागृहात किंवा घरात धार्मिक बैठकीसाठी एकत्र जमतात. "

○

# रा त रा णी

रुबाबदारपणे डोईला बांधलेला मालवीय फॅशनचा रुमाल; लांब कोटाच्या छातीवरून कडक इस्तरीचे तलम उपरणे रुळत असलेले; तोंडी ईश्वराचे नाम, जिभेवर ओतप्रोत माधुर्य आणि व्यवहारी चौकोनी मुद्रेच्या जिवणीवर सतत एक छद्मी स्मित. डोळ्यांत विलासी भाव. स्वर शांत आणि त्यावाटे सहजपणे पाताळयंत्री स्वभाव प्रतीत होत असलेला. हालचाली, बोलणे, हसणे सारे काही मोजके, हिशेबी. याउलट साध्या शर्टलेंग्यातला एक जरासा स्थूल, देखणा तरुण. काहीसे विस्कटलेले भुरकट केस. भावुक, काव्यात्म डोळे, गोल मुद्रा. भाबडे बोलणे, धडपड्या स्वभाव. चौपाटीवर एकट्याने 'नाजुक मैना साजुक मैना' असले काहीतरी अर्थहीन गाणे म्हणत नाचण्याएवढा नादी. 'हंस

## बा बु रा व  पें ढा र क र

पिक्चर्स 'च्या 'धर्मवीर' नावाच्या एका जुन्या – जुन्या चित्रपटातली ही दोन व्यक्तिचित्रे. पहिला दांभिक खलनायक, दुसरा उमदा नायक. पहिले बाबुराव पेंढारकर. दुसरे मास्टर विनायक या नावाने तेव्हा ओळखले जाणारे विनायकराव कर्नाटकी.

आज स्मरण करताना परस्परविरुद्ध वैशिष्ट्यांची ही पडद्यावरची दोन व्यक्तिमत्त्वे वेगळी काढणे खरोखरी कठीण जाते. 'धर्मवीर 'नंतर हंस पिक्चर्सच्या

*विजय तेंडुलकर*



# दुसऱ्या 'हंसा'चे प्रयाण

अनेक चित्रपटांतून हे दोघे एकत्र आणि आळीपाळीने पडद्यावर आले. कधी खलनायक नायक झाला तर नायकाने दाढीमिश्या लावून वृद्ध भूमिका एका हौसेने कॅमेऱ्यापुढे वठवल्या. नंतर दोघे वेगवेगळे झाले आणि स्वतंत्रपणे कुठे कुठे पडद्यावर वावरत राहिले. तरीही व्यक्तिमत्त्वांच्या परस्परविरुद्ध वैशिष्ट्यांमुळे की काही काळच्या एकत्र भूमिकांमुळे कुणास ठाऊक, पण स्मरणात एक आला की दुसरा येतो. आज हे जुळे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे काळाच्या पडद्यामागे गेले आहे. विनायकराव कर्नाटकी जाऊन आता वर्षे लोटली. बाबुराव पेंढारकर नुकते गेले.

वस्तुतः छद्मी खलनायकी भूमिकांनाच सोयीचा चेहरा लाभला असता आपल्या अभिनय कौशल्याने बाबुरावांनी 'देवता' चित्रपटातला उमदा तरुण, 'अर्धांगी'-मधला खुपमिजाज झेड. मारुतराव, 'अमृत'मधला रांगडा, सरळस्वभावी चांभार, 'जय मल्हार'मधला गरम रक्ताचा उग्र बेरड, 'पहिला पाळणा' मधला हुद्देदार मिष्किल नायक अशा एकमेकींपासून अगदी भिन्न अशा भूमिका अस्सल स्वरूपात

वठविल्या एवढे म्हटले तरी त्यांच्या अभिनयाची ताकद लक्षात येईल. विशिष्ट भूमिकेशी झालेल्या त्यांच्या तद्रूपतेने एखादे वेळी भूमिकेच्या गुणधर्माशी विसंगत असणारी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये खटकेनाशी होत. तोच चेहरा उमदा, पाताळयंत्री, रांगडा, चतुर, व्यवहारी, ध्येयवादी, बुद्धिमान, अडाणी होई-तीच ठेंगणी, ठुसठुशीत बांधेसूद कुडी जरुरीप्रमाणे कधी चपळ, कधी ताठ आडदांड, कधी दांभिकपणे नम्र तर कधी खांडेकर-युगातील नायकाला साजेशी संथ आणि बुद्धिजीवी जबाबदाऱ्यांखाली वाकलेल्या पाठीची होत असे. खांडेकरांचा नायक चित्रपटाबाहेर विनायकरावांच्या व्यक्तिमत्त्वात भिनलेला होता पण पडद्यावर तो ताकदीने आणला तो बाबुरावांनी हे खरे आहे. पडद्यावर विनायकराव गंभीर त्याहून खेळकर नायक म्हणून अधिक रमले आणि शोभले. बाबुरावांनी दोन्ही प्रकारचे नायक उत्तम वठविले. खेळकर नायकाची त्यांची ' पहिला पाळणा 'मधली खमंग भूमिका आजही स्मरणाने आल्हाद देते.

बाबुराव रंगभूमीवर उतरले ते ' ऑथेल्लो ' ऊर्फ झुंझाररावाच्या मातबर भूमिकेत; नखशिखांत काळा रंग फासून एका आडदांड रुबाबात. या नाटकाचा मुंबईतील मरीन लाईन्सवरच्या खुल्या मंडपातील पहिला प्रयोग अद्याप लक्षात राहिला आहे. त्या प्रयोगातील कमलजेच्या बापाच्या भूमिकेतल्या चिंतामणराव कोल्हाटकरांच्या वाणीचा खणखणीतपणा बाबुरावांकडे नव्हता; पण आपल्या काहीशा बसक्या, बद्द स्वरानिशी त्या रात्री त्यांनी रंगभूमीवर सरळ मनाचा, गरम माथ्याचा, उ पराक्रमी शिपाईगडी ' झुंझारराव ' मोठ्या ताकदीने उभा केला. त्याच्या मनात पेटलेल्या संशयाग्नीने तो स्वत: जळत,– करपत असतानाची त्याची व्यथावेदना त्यांनी प्रभावीपणे बोलकी केली. इतकी की पलीकडून धावणाऱ्या लोकलगाड्यांचा धडधडाट जाणवूनही नाटकाच्या रंगतीत व्यत्यय आणू शकला नाही. रंगभूमीवर बाबुराव चित्रपटाहून वेगळे वाटले. त्यांच्या या माध्यमातील मर्यादाही नंतर घनश्याम या ' भावबंधन 'मधील भूमिकेत स्पष्ट झाल्या. हा नट मुख्यत: चित्रपटांचा आणि चित्रपटांसाठीच होता.

बाबुरावांचा उत्कर्षकाल मराठी चित्रपटांच्या उत्कर्षकालाबरोबर आला आणि त्यांची नट म्हणून उताराची कारकीर्द सुरू झाली ती मराठी चित्रपटांच्या उताराबरोबरीनेच. ' जय मल्हार 'नंतर चित्रपटांसाठीही त्यांचा कुणी फार योजकतेने उपयोग करून घेतला नाही. जिवंत भूमिकांपेक्षा त्यांच्या वाट्याला येत गेल्या मेकप आणि लकबी यात अडकलेल्या कृत्रिम नाहीतर जुजबी भूमिका. हिंदी भाषेशी आणि चित्रपटांशी तर त्यांचे जमलेच नाही. (विनायकराव कर्नाटकींचेही जमले नव्हते.)

असे म्हटले जाते की नट म्हणून ते जेवढे मोठे होते त्याहून धंद्याचे सूत्रचालक म्हणून अधिक कर्तबगार आणि कुशल होते. विनायकराव कर्नाटकींच्या स्वप्नाळू कलावादाला बाबुराव पेंढारकरांच्या चोख व्यवहारवादाची जोड लाभली म्हणूनच

'हंस पिक्चर्स 'चा हंस काही काळ डौलाने चित्रसृष्टीत मिरवू शकला असे उल्लेख आढळतात. हे बाबुरावांचे पडद्याआडचे कर्तृत्व. आम्हांला मात्र त्यांचे ऋण जाणवते ते नट म्हणून त्यांनी दिलेल्या आनंदाचे. अभिनय म्हणजे काय ते कळण्याची फारशी अक्कल तेव्हा नव्हती. आज ती आली असेल तर त्याचे श्रेय ज्या गुणी महाभागांना आहे त्यात हे एक ठळक नाव बाबुराव पेंढारकर – आणि अर्थातच मास्टर विनायक कर्नाटकी.

□□

# सांस्कृतिक कार्यक्रम

गेल्या महिन्याभराच्या अवकाशात मुंबईत घडलेल्या 'सांस्कृतिक' कार्यक्रमांची नुसती यादीच करायला बसले तर कितीतरी आकडे मोजावे लागतील. पैकी काही कार्यक्रमांच्या नुसत्या आठवणीवर प्रत्येकी दहा दहा आकडे मोजून संयम देखील करावा लागेल. आणि काहींना 'आणखी एकदा' – वन्स मोअर – देण्याचा मोह होईल.

प्रथितयश बंगाली दिग्दर्शक तपन सिन्हा यांच्या वेचक जुन्याच चित्रपटांचा फिल्म फोरम या संस्थेने साजरा केलेला सप्ताह हा एक ठळक कार्यक्रम. तपन सिन्हांचा फारसा भक्त नसल्याने ऐन दिवाळी गडबडीत या सप्ताहाचा लाभ मी घेतला नाही. (आमचा आपला सत्यजित !) इंडियन नॅशनल थिएटरने केलेला आपल्या काही नाटकांचा उत्सव हा असाच मी अनुपस्थितीने 'भूषविलेला' आणखी एक कार्यक्रम. वस्तुत: या उत्सवात आणखी एकदा झालेल्या 'आने इंद्रजित' या बंगालीतून गुजरातीत आलेल्या नाटकाचा बराच बोलबाला मी ऐकतो आहे; पण याही खेपेला हे नाटक बघणे जमले नाहीच. 'नयन तुझे जादुगार,' 'माझे घरटे माझी पिले,' 'आसावरी' अशी काही मराठी नाटकेही या काळात मुंबईच्या रंगभूमीवर उतरली. झालेच तर ग्वाल्हेरकर कुमार गंधर्वांचा 'त्रिवेणी' हा मीराबाई – कबीर – सूरदास या संतांच्या भक्तिगीतांच्या गायनाचा कार्यक्रमही मुंबईत या अवधीतच प्रथम झाला. राष्ट्र सेवा दलाच्या 'गल्ली ते दिल्ली' या वगाचा मुंबईतला 'प्रीमिअर' याच काळात झाला. काही बरे-वाईट इंग्रजी चित्रपट या कालखंडात मुंबईत 'रुपेरी पडद्यावर' का काय ते झळकले. चित्रकलेची प्रदर्शने तर चालूच आहेत. (नेल्सन नामक एका तरुण चित्रकाराने तर जहांगीर आर्ट गॅलरीत जागा न मिळाल्याने गॅलरीसमोरच्या फूटपाथवर आपली चित्रे सांप्रत मांडली आहेत !) आणि या कालखंडातला सर्वश्रेष्ठ मुंबई महानगरांतर्गत सांस्कृतिक कार्यक्रम म्हणजे 'क्रॉस द मैदान अँड सी द वर्ल्ड' प्रदर्शन ! मी मैदान क्रॉस

केले आहे आणि प्रदर्शनही पाहिले आहे त्याबद्दल पुढील अंकी सविस्तर लिहीन. (क्रॉस युवर फिंगर्स अँड वेट, मॅन !) □□

# घरटे - पिले

१ 'माझे घरटे—माझी पिले' हे वांद्रयाच्या 'कलाकार' नाट्यसंस्थेने रंगभूमीवर ठेवलेले 'वग-प्रसिद्ध' वसंत सबनीस यांचे नाटक एका तेजस्विनीच्या जीवनसंग्रामाची कथा सांगणारे होते. नवरा कचेरीत अफरातफर करून संसारातून उठून गेल्यावर या कणखर बाईने आपली पिले गुन्हेगार होऊ नयेत म्हणून त्यांच्यासमोर एका काल्पनिक, धीरोदात्त बापाचा आदर्श सतत ठेवून त्यांना वाढवले आणि तिचा नवरा परत आला आणि त्या घरावर हक्क सांगू लागला, हा पेचप्रसंग या नाटकाचा कणा होता. सबनिसांनी या परिस्थितीतले नाट्य सांकेतिकपणेच पण पीळदारपणे नाट्यबद्ध केले होते. एका शेजारी-पात्राच्या निमित्ताने हा पीळ कुठे कुठे ढिला पडला असला तरी एकंदरीने नाटकाची पकड प्रेक्षकांवर अखेरपर्यंत चांगली टिकत होती—विशेषत:, स्त्रियांवर. कारण हे नाटक स्त्रीप्रधान होते. यातली स्त्री कर्तबगार होती आणि पुरुष बेजबाबदार होता. एकूण स्त्रीपात्रेच पुरुषांच्या मानाने समजूतदार आणि परिपक्व मनाची होती. अशा या नाटकाच्या प्रयोगात कर्तबगार स्त्रीच्या भूमिकेत सौ. कुसुम कुलकर्णी प्रकर्षाने चमकल्या. त्यांनी या भूमिकेत अभिनय केला असे म्हणणे त्यांना अन्यायाचे होईल. त्या ही भूमिका या नाटकात जगतात असेच म्हटले पाहिजे. अर्थात अभिनयाच्या दीर्घ पूर्वानुभवाने अवगत झालेल्या युक्त्या आणि गणिते त्यांच्या उपयोगी येतात हेही खरे. याने भूमिकेतला आपलासा केलेला आशय त्या अचूकपणे आणि घणाघाती ताकदीने अनेकदा प्रेक्षकांपर्यंत भिडवू शकतात. दुय्यम स्त्रीभूमिकांत पुष्पा बिळगी आणि सुमन आरेकर प्रेयसी आणि वहीण या दोन सांकेतिक भूमिका ठसठशीतपणे उभ्या करतात. बेजबाबदार बापाच्या भूमिकेत पुरुष प्रेक्षकांमधून येणाऱ्या हशामुळे की काय, श्री. जोगळेकर अवघडलेले वाटले. या प्रौढ माणसाच्या बेजबाबदारपणाला निव्वळ उथळ मूर्खपणा यापलीकडे कसलाही खुलासा नाटककाराने न दिल्याने प्रमुख स्त्रीभूमिकेच्या तुलनेने ती फारच हलकी राहिली आहे. आपला घरावरचा वाजवी हक्क नाटकाच्या अखेरी सांगताना यामुळेच हा माणूस एखादा मवाली वाटतो आणि त्याच्याविषयीच्या कोणत्याही अधिक समजुतीअभावी तो हास्यविषय ठरतो. परंतु गंमत म्हणजे नाट्यगृहातल्या या हशांचे आणखीही एक मानसशास्त्रीय कारण आढळले. नाटकात दाखवलेल्या कर्तुमकर्तुम मातबर स्त्रीला अखेर असहाय्य करणारा हा पुरुष पाहून पुरुष प्रेक्षकांना मनोमन एक आनंदही होत होता ! परस्पर-



**सौ. कुसुम कुलकर्णी**
**आपली भूमिका जगल्या**

विरुद्ध प्रवृत्तीच्या— एक 'घराण्याची प्रतिष्ठा'— बाज गरम माथेवाला तर दुसरा नाचरा, अवखळ, कविवृत्तीचा— दोघा भावांच्या भूमिकांत अनुक्रमे बाळ कुडतरकर आणि राजा दाणी चपखल बसले. मुळात बाप (श्री. जोगळेकर), मोठा मुलगा (बाळ कुडतरकर), धाकटा मुलगा (राजा दाणी) वेगवेगळ्या कारणांसाठी हास्यविषय होत असल्याने हास्यनिर्मितीसाठी सबनिसांनी योजलेला उपरा, लघळ आणि वातड शेजारी (भाऊ बिवलकर) हशे पिकवूनही जास्तीचा वाटला. शिवाय ज्याच्या बायकोला एकदाच आयुष्यात दिवस गेले आणि मुलाऐवजी नुसताच एक गरगरीत गोळा झाला त्याला विनोदविषयक म्हणून मोकळेपणी हसणेही समजूतदार प्रेक्षकांना जरा जडच जाईल. अपेक्षेनुसार बापाच्या पश्चात्तापदग्ध प्रयाणाने या नाटकाची अखेर झाली आहे. परंतु बापाला त्याची बाप म्हणून— घटकाभर असे धरू की नसलेलीच पण — प्रतिष्ठा पुनश्च देऊन आईने त्याची प्रतिष्ठापना घरात करणे आणि दोघांच्या आणि मुलांच्या आनंदित उपस्थितीत नाटकाचा शेवट होणे सबनिसांनी मनात घेतलेल्या 'कौटुंबिक' नाटकांच्या लोकप्रिय ज्ञातीत अधिक बसणारे होते. लोकांना हे अधिक प्रिय झाले असते असा माझा

कयास. आपल्याकडील अगदी कर्तबगार पांढरपेशा स्त्रीमवलीदेखील मनाच्या अगदी आत-आत जपली जाणारी मर्यादित पतिपरायणता किंवा हक्काच्या पुरुषाची अपेक्षा लक्षात घेतली तर हा शेवट अवास्तव ठरला असता असेही नाही. नाहीतरी नाटकातील मुलांच्या वाढत्या वयात बेजबाबदार बापाचा असा कोणता बरावाईट परिणाम त्यांच्यावर नव्याने होणार होता? नाटकातील पात्रांनी पत्करलेली एक व्यवहार्य तडजोड म्हणून हा शेवट शक्य होता.

हे अर्थात झाले या नाटकाच्या निमित्ताने थोडेसे वेगळे नाटक कल्पिणे. आहे या स्थितीत 'माझे घरटे—माझी पिले' पुष्कळ नाट्यपूर्ण आणि वेधक होते यात शंका नाही. □□

# सेवादलाचे 'गल्ली ते दिल्ली'

२ सेवादलाचा 'गल्ली ते दिल्ली' तूर्तच्या वगांच्या जमान्यात धंदेवाईक भासला तरी तो आहे हौशी. आणि प्रचारकी. मुळात शंकर पाटलांची एक कथा; तिचा हा 'वगाविष्कार.' कथेची फिकी, नर्मविनोदी वळणे वगाच्या जातीला मानवणारी नव्हेत. वगाची जात ढाली आणि खणखणीत. 'गल्ली' कमी भासते ती या अपेक्षित 'दिल्लीच्या तुलनेने; एरवी सेवादलाच्या तत्त्वनिष्ठ, धीरगंभीर, सरळ टोपी, ताठ मान, पवित्र्याला सोडून रंजक, चुरचुरीत, चुणचुणीत, वाह्यात आणि रंगेल असा मालमसाला त्यात बराच आहे. विषय (टुकार पुढारी आणि त्याची ढोंगे) जुनाच असूनही या मालमसाल्याने विषयाचा शिळेपणा फारसा जाणवत नाही. परंतु या मालमसाल्याहूनही एक खमंग चीज या वगात आहे ती राम नगरकर. हे नगरकर विच्छा 'माझी पुरी करा' कर. त्या धंदेवाईक वगात एका मूर्खाची भूमिका नगरकरांनी त्या भूमिकेच्या मर्यादेत चांगली वठवली होती. तरीही चमकले ते दादा कोंडके. या 'गल्ली'त मात्र नगरकर 'शेर' आहेत. एका शहाण्या-अडाण्याची भूमिका इथे त्यांच्या वाट्याला आली आहे. दे. भ. लबाडे नामक दहाव्याहूनही खालच्या दर्जाच्या एका होतकरू आमदाराचा (लीलाधर हेगडे) हा हस्तक. दोघांनी मिळूनच एका नाचणाऱ्या बाईकडे (सौ. सुधा वर्दे) खेटे घातलेले. लबाडचाने बाई पटकावली आणि तिच्याबरोबर घर थाटले. अडाणी मात्र अडाणीच राहिला. या वगात स्थानिक जनतेवर भाव मारून 'तिकीट' आणि 'इलेक्शन' जिंकण्याच्या काव्याने गावात ब्रॉड गेज रेल्वे आली पाहिजे अशी मागणी मंत्र्याकडे करण्याच्या मिषाने लबाडे—लबाडीण आणि त्यांचा शहाणा—अडाणी भारवाही हस्तक असे त्रिकूट गाव सोडून मुंबईत एका उंची हॉटेलात तळ टाकते; मागणी

आणि मंत्री राहतात बाजूलाच; आणि जिवाची चैन करून तीनही मंडळी समारंभपूर्वक गावी परततात, असा थोडक्यात कथाभाग; त्यात उंची हॉटेलमधल्या उंची सुखसोयी, राजकारणातली लबाडी, नाचगाणी, असे तिखटमीठ अडाण्याच्या विलक्षण चमकदार वाक्चातुर्यासमवेत टाकले आहे. उदाहरणार्थ, समोरच्या आलीशान सिनेमा थिएटरचे रसभरित वर्णन लबाडे करू लागताच हस्तक त्याला मध्येच थांबवून आपल्या कायम बावळट भाबड्या मुद्रेने, टोपी खाजवीत विचारतो, म्हंजी यामंदी आपल्या त्या... ह्या... कोन त्यो... बाळासायबाची भागी हाय का? सभेची व्याख्या तो प्रेक्षकांना उद्देशून साधारण अशी करतो– 'मंडळी, आजची सभा का बोलावली ते तुम्हांला म्हायतीच हाय. आमाला पण म्हायती हाय. या सभेमंदी कोन बोलनार हायती, तेबी तुमाला म्हायती हाय; आणिक आमाला बी ते म्हायतीच हाय. ते काय बोलनार हाएत ते बी तुमाला आणिक आमाला दोघांनाबी म्हायतीच हाय. तरीबी आपुन जिला जमतो तिलाच सभा असं म्हनत्यात !

बोला आता !...

वगात असल्या संवादांची 'वडिल'की खात्रीपूर्वक लेखकाकडे देणे कठीण असते. वगातला प्रमुख पार्टी मुळात हजरजबाबी असावा लागत असल्याने उत्स्फूर्तपणे तो बोलणार हे गृहीतच असते. नगरकरांची या वगातली किमया ही की शब्द न् शब्द 'ह्यो आत्ता डोचकीमंदी आल्या 'सारखे ते उत्स्फूर्तपणे बोलतात–मग तो शब्द कधी त्यांचा तर कधी लेखकांचा असेल. नगरकरांच्या तुलनेने बाकी मंडळी पढीक नाहीतर फिकी वाटतात.

सौ. सुधा वर्दे त्यांच्या सामाजिक दर्जाचा विचार करता पुष्कळच मोकळ्या नाचतात; तरीही तमाशाच्या अपेक्षेने त्यांचा अभिनय तीस–चाळीस टक्के भरतो. उरलेल्यातले दहापाच विंगेतून 'दाद' देऊन किंवा स्टेजवर शिट्ट्या मारून किंवा प्रत्यक्षच नृत्य–गायनाची नगरकरी 'झलक' दाखवून राम नगरकर सहजगत्या भरून काढतात. तरी उणीव राहतेच. मग तो राष्ट्र सेवा दलाचा वग असला म्हणून काय झाले ? वग तो वग असला पाहिजे. आणि हे सेवा दलाचे जे कोणी वरिष्ठ असतील त्यांनाही तत्त्वतः मान्य दिसते. एरवी स्त्रियांनी प्रेक्षकांसमोर पाठीकडून पदर वर धरून नाचावे ही वगाची रीत त्यांनी स्वीकारली नसती. वगाच्याच शोभेचा उंची हॉटेलातल्या सर्व सोयी–युक्त स्नानगृहाचा कथाभागही त्यांनी सर्वस्वी त्याज्य मानला असता इतका तो धिटाईचा आणि प्रतिष्ठित विनोदाच्या मर्यादा ओलांडणारा होता. वगाचे मुक्त माध्यम सेवादलाच्या शुचितेत मोडूनतोडून अळे–बळे बसवण्याचा फार हट्ट न धरल्याबद्दल संबंधितांचे अभिनंदन.

वगातल्या लावण्या तशा फार ठासून झाल्या नाहीत, कारण त्यां म्हटल्या गेल्या अधिक फिल्मी तमाशा पद्धतीने आणि जोडीला लागतो तो कडक ठसका नाचणारणींमध्येच नव्हता. तमाशातला ठसका अभिनय, वाटून चालत नाही, तो अंगचा

असावा लागतो आणि तसा दिसावाही लागतो. मास्तरचे एक पात्र आरंभापासून अखेरपर्यंत बायकी किरट्या स्वरात बोलले. इतके सहजपणे हे त्याला जमले की एक तर त्याचा आवाजच नैसर्गिकपणे किरटा असावा किंवा सुप्रसिद्ध दिग्दर्शक मो. ग. रांगणेकर यांनी तरी त्याला ' दिग्दर्शित ' केले असावे असे वाटले. वस्तुतः वगाचे दिग्दर्शक आहेत शाहीर लीलाधर हेगडे. दे. म. लबाडे यांची भूमिका त्यांनी इतरांना दिग्दर्शन करण्यापायी स्वतःला दिग्दर्शन करण्याला सवडच न उरावी तशी रंगहीन केली. राम नगरकरांनी या वगात भाव मारला. त्यातला काही हेगड्यांनी स्वतःला उतरवून नगरकरांना दिला असेच म्हटले पाहिजे.

काही असले तरी बऱ्यापैकी मजा आली हे मान्य केले पाहिजे. प्रचार ऐकता ऐकताच कानाबाहेर गेला आणि निखळ करमणूक आठवणीसाठी मागे राहिली.

□□

# न बरसलेला भक्तिरस

३ कुमार गंधर्वांच्या ' त्रिवेणी ' कार्यक्रमात मी मीराबाई-कबीर-सूरदास आणि संगीतातले सूरदास स्वतः कुमार यांच्या संगतीत दोन घटका भक्तिरसात मनसोक्त भिजता येईल अशी अपेक्षा होती. वस्तुतः कुमार गंधर्व गातात तसा त्या त्या संताच्या कर्मभूमीतील मातीचा धर्म आणि त्या त्या संतांच्या पिंडाचा गुणधर्म स्वरांना पाजून त्यातून उत्कट भक्तिरस गाणे दुसऱ्या कुणाचेही काम नव्हे, हे आधीच सिद्ध झाले आहे. या आधीच्या ' गीत–वर्षा ' या कार्यक्रमाने या नव्या कार्यक्रमामागे यशाचा एक मोठा दिलासाही उभा होता. ' गीत–वर्षा 'मध्ये वर्षाऋतूचे गायन या प्रतिभाशाली गायकाने लोकगीतांच्या आधारे केले होते. कुमारांच्या गायनाला जोड म्हणून संघ–गायन हा या दोन्ही कार्यक्रमांचा एक ठळक विशेष होता. ' त्रिवेणी 'मध्ये प्रकर्षाने जाणवला तो एकसुरीपणा. त्या मानाने उत्कटता आणि तिच्यामुळे लोकसंगीतात येणारा रस आणि रसरशीतपणा कमी भासला. कार्यक्रमातले कबीराचे दोन–तीन दोहे याला अपवाद. उरलेल्या कार्यक्रमात हे झळाळून गेले.

असेही वाटले की कार्यक्रमात अधिक विविधता आणण्यासाठी कुमार गंधर्वांनी या तीन संत मंडळींत एखादा मराठी संत का नाही घेतला ? केवळ भाषेची सामायिकता बिनसेल म्हणून ? आशयात तर बहिणाई मीरेची सख्खी बहीण शोभेल. नामदेव शिंपी, तुकाराम वाणी, कोष्टी कबीराशेजारी बसून त्याच स्वरात गाऊ शकतील. ज्ञानेश्वर, एकनाथ, चोखा हे सूरदासाशी वदसूर थोडेच आहेत ?

त्यांच्याही भक्तीचे गळाभर स्वर या भक्तीच्या मैफलीत उमटते तर निदान काही बिघडले नसते, नक्की. कुमार यातल्या कुणाला आपल्या स्वतंत्र शैलीत स्वरबद्ध करताना का ऐकू येत नाहीत ?

कार्यक्रमातील गीतांची सुबक 'पद्यावली' श्रोतांच्या हाती आगाऊ देण्याची पद्धत आपल्याला पटली नाही. आपण स्वरांच्या नादात शब्दाला पुरेसा न्याय देत नाही या ग्रहापोटी तर ही छापील शब्दकळा कुमार गंधर्व श्रोत्यांना आगाऊ पुरवीत नाहीत ? परिणामी संदर्भासाठी पद्यावली समोर धरून गाणे ऐकण्याचा प्रकार उद्‌भवतो. क्वचित ऐन गाण्यात चौकस श्रोत्यांमध्ये चर्चाही उद्‌भवते. मग शुक् शुक् !...स्स्...अहो जरा प्लीज...इ. इ. कार्यक्रम रंगला नाही म्हणजेच हे सारे जाणवत असेल का हो ? अशा वेळी मख्ख प्रेक्षकांचादेखील गोंगाट वाटतो, बघा !

o


आगामी प्रकाशन

# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

# कविता

## सांज

गेली टळून दुपार
ऊन तिरपते जरा
छाया पडून सावळी
जाते शहारून घरा...!
स्तनपानाला वासरे
होती अधीर अधीर
वाट पाहुनी मातेची
त्यांचे सुकती अधर...!
तेव्हा वत्सांच्या मायेने
परतती धेनु घरी
तृप्त होतात वासरे
दूध प्राशुनी अंतरी...!
घरट्याचिया ओढीने
वळे पाखरांचा थवा
पिलांसाठीच चोचीत
चारा घेऊन तेधवा...!
तप्त सूर्याच्या तपाचा
व्रतभंग सांज करी
फेकी अंधाराचे पाश
त्याला घेतसे उदरी...!!

*अ. शे. देशमुख*

## आस्वाद

निसर्गाशी समरस होऊ पाहणारी आणखी एक कविता सुधीर जोशी यांची ' दर्षा ' ही कविता एकेक फटकारा मारून वरच्याप्रमाणेच स्वर्ग-धरेचे मीलन घडवते. संध्याकाळचा लाल रंग नाहीसा झाला आणि काजवा नक्षी रेखाटतो आहे या कल्पनेची सुखद जाणीव होऊन एका धूसर अशा वातावरणात रसिकमनाने मोहरून जातो. विजेने ढगाचा गर्भ धारण केला हे सांगून एका संकेताला कवीने चांगलाच धक्का दिला आहे. आकाश कलंडणे, काळोखाचे बिंब, ओला काजवा अशा एकामागून एक शब्दसंसृती येऊन कवितेला अधिक रेखीव बनवतात. तिसऱ्या आणि चौथ्या कडव्याच्या शेवटी एकेका शब्दाची पुनरुक्ती करून कवीने लयीला एक वेगळा प्रकार साधला आहे. अर्थही त्यात थोडा स्पष्ट होतो. कवीच्या अंतर्मनाचे प्रतिबिंब यात फारसे पडलेले नाही. पण बाह्य सृष्टीच्या वर्णनात ते सूचित आहे हेच त्याचे वैशिष्ट्य.

## वर्षा

थेंबा थेंबांनी क्षरते
संध्या रातीच्या पेल्यात
गर्भ धरुन ढगाचा
वीज सळाळे नभात

ओला काजवा चितारे
नक्षी पुसट रेघांची
चित्रे अपुरी राहिली
लाल रंगाची आकाशी

दिशा अंधारुन आल्या
विरे तळ्याची निळाई
बिंब काळोखाचे झरे
खोल तळाशी तळाशी

मेघ भरली पाठ
झुल, पृथ्वीला पेलेना
गेले कलंडून नभ
पूर थांबेना थांबेना ।

*सुधीर जोशी*

## शिळी कढी उतू येता

शिळी कढी उतू येता
तुझी वाचावी कविता
शब्द पसारा आकाशी
आज कोरडी सरिता
शिळी कढी उतू येता
तुझी सांडावी फुंकर
साता जन्माचा बांधील
आज नव्याने किंकर
शिळी कढी उतू येता
ऋणा ऋणांचा पाचोळा
सप्त स्वरांच्या दि ीत
गीत झाले चोळामोळा

*मधू जामकर*

'शिळी कढी उतू येता' या कवितेत नेहमीचाच एक गोड अनुभव थोडक्यात पण उत्कट रीतीने रंगविला आहे. रोजच्या जीवनात एक तऱ्हेचा कंटाळा निर्माण होतो. जीवन हे कितीही समृद्ध असले तरी दररोजच्या वाटचालीमध्ये सुखाचे पाऊल मंदावते आणि दुखू लागते. अशा वेळी कायम आणि निश्चित असा आनंदाचा साक्षात्कार प्रिय व्यक्तीच्या सहवासाने किंवा तिच्या सहकंपाने होतो. मनुष्य पुन्हा पुन्हा आपले जीवन प्रियतम व्यक्तीला समर्पण करीत असतो. साता जन्मांचा बांधील हा पुन्हा किंकर होतो या सुंदर भावनेचा आविष्कार आहे.

त्या दृष्टीने 'सांज' ही अगदीच वेगळी कविता ठरेल. ती 'घर' या कवितेसारखी आत्मनिष्ठ नाही. एका सुंदर देखाव्याचे हे चित्र अतिशय सुबोध आहे हे मुद्दाम सांगावेसे वाटते. वर्णन पुष्कळसे सांकेतिक आहे. परन्तु ते वाचावेसे वाटते ते त्यामधील शुद्ध शब्दार्थामुळे. शेवट तर फार बहारीचा आहे. सूर्य आणि संध्या यांच्यांत पतिपत्नीचे नाते अनेक कवींनी कल्पिले आहे; पण अ. शे. देशमुख हे मोठ्या वेगळेपणाने ही गोष्ट सांगतात. सूर्याच्या व्रताचा भंग संध्या करते! एवढ्यावरसुद्धा ही उपमा रंगेल. पण अंधाराचे पाश त्याच्याभोवती टाकते हे कवीचे वर्णन नवे आहे. हे पाश पडले की प्रियतम आणि प्रियतमा दोन्ही लुप्त होतात हे सूचित केलेले सत्य फार सुंदर आहे.

# सूर्य

एवढासा सूर्य पंखात धरून जात होतो तेव्हा
किती दिशांनी अंधाराने झडप घातली होती
चहूबाजूंनी मोहफुलांचा दरवळत होता वास
त्या वासाने माझी मलाच शुद्ध उरली नव्हती
पायाखालची माती होती रेशीमजाळे विणीत
झऱ्याझऱ्यातील पाण्यामधून अमृत झिरपलेले
भुलवीत होती रानपाखरे चैत्रफांदीवरती
माथ्यावरती छत्र झाले विशाल आभाळ निळे
वाटले अवघड होते वेळ-आता जाईल तोल
अरे, सारे आयुष्यच कोसळणार होते
अदृश्य बाहूंचा आधार देऊन सावरलेस मला
तू पाठीशी आहेस म्हणून सूर्य जपावा वाटतो



*दत्ता हलसगीकर*

दत्ता हलसगीकर यांचा 'सूर्य' छोटा, पंखात मावणारा आहे. पण त्याच्या मागली प्रेरक शक्ती फार मोठी आहे. जीवनात मोहाचे क्षण येतात, पण त्याच वेळी कुणातरी अदृश्य शक्तीमुळे आपला तोल सावरला जातो. याच शक्तीमुळे–किंवा व्यक्तीमुळे म्हणा पाहिजे तर जे काही मोलाचे आहे ते टाकून द्यावेसे वाटत नाही. प्रेम आहे म्हणूनच श्रेयाला जपायचे. कारण प्रेम होते म्हणूनच मोहाच्या खड्डयात न पडता श्रेय सुरक्षित ठेवता आले. कवीने दुसऱ्या कडव्यात निर्माण केलेली सृष्टी अधिक गोजिरवाणी आहे. कवितेला एकप्रकारचा झपाटा आहे. हेच तिचे खरे सौंदर्य.

'घर' या कवितेला शिफारसपत्रक द्यावेसे वाटते, ते यासाठी की त्यातील प्रत्येक ओळ आपणांला कळते. मनुष्याच्या मनात आपल्या वास्तूबद्दल ओढ असते. अर्थात् ही वास्तू म्हणजे दगड, विटा, चुना ही खास नव्हेत. त्यामध्ये माणसांच्या भावना गुंतलेल्या असतात, परंपरा असतात, त्याचप्रमाणे काही श्रद्धाही वाढीला लागलेल्या असतात. आपल्या घरातल्या प्रत्येक दगडात अहिल्या वास करीत आहे असे माणसाला वाटते. खांब साधे लाकडी असोत, जीर्ण असोत. त्यांत नरसिंह प्रकट होईल अशी एक ओढ मनाला असते. श्रीरंग जोशी यांनी हे सारे

## घर

कितीक योजने वणवणलो आयुष्याच्या उन्हाळ्यात
मधही लाभला कधी चुकून...पण काट्यांनीच भळभळलो लाखदा
आवर्तासारखा भिरभिरलो...दिशाहीन वाळवंटात
पण नाळ तुटली नाही...घराची ओढ सुटली नाही !
प्रासादांच्या नगरीतही...आठवते माझे घर
वृद्ध खचलेल्या भिती त्याचा भंगलेला ऊर
करकरणारे दार गाते जनाईची ओवी
चिऱ्याचिऱ्यांत तटाच्या याद अहिल्येची यावी
कललेल्या स्तंभांतही तेथे नारसिंह राहे
माजघरीच्या तमाला ओढ तान्हुल्याची आहे
माजघरीच्या तमाशी नाते राहिलेले नाही
पण नाळ तुटली नाही...घराची ओढ सुटली नाही

शिणून दमून जखमी होऊन अजून कधी घरी जातो
वास्तुपुरुष घराचा मला कुरवाळू येतो
मला पाहून घराचा अंधारही गातो गीत
चंद्रमौळी कौलावरी नक्षत्रांची बरसात
बोलू लागताच भिती...सारी विरतसे खंत
तळ नकळत लागे जरी वेदना अनंत
जखमेचा हो गुलाब आणि वेदनेची ऋचा
माझ्या अहंतेची होते क्षण बोबडीच वाचा
अशा वास्तूसाठी मला लक्ष जन्म द्यावे आई
नाळ तुटणार नाही...ओढ सुटणार नाही

*श्रीरंग जोशी*

मोठ्या तन्मयतेने सांगितले आहे. पण माजघरातल्या अंधाराला तान्हुल्याची ओढ आहे हे सांगून त्यांनी विशेष बहार केली आहे. याच्यामागेही परंपरा आहे; कारण या अंधाराने अनेक अपत्यांच्या जन्माचा आनंद घराला दिला आहे. अशा घरांत जखमेचे रूपान्तर गुलाबात झाले आणि वेदनांच्या ऋच्या झाल्या तर काय नवल ! जड आणि सचेतन या दोन सृष्टींचा सुंदर यात मिलाफ साधला आहे.

**गोपीनाथ तळवलकर**



# श्री अमीरचंद्र शास्त्री

शिवाजीराव सावंत

दिल्लीतील शक्तिनगर विभागात 'अखिल भारतीय संस्कृत विद्यापीठ' ही नामवंत शिक्षणसंस्था आहे. नुकतेच तिला "लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ हे नामाभिधान देण्यात आले आहे. या विद्यापीठात साधारण वृद्धत्वाकडे झुकलेली अशी गोल चर्येची एक हसतमुख व्यक्ती लठ्ठ पुस्तकांची चवड छातीशी कवटाळीत येता-जाताना दिसते. काही न सांगताच कुणालाही चटकन ओळखता येते की ती व्यक्ती एक प्राध्यापकच असणार ! साधारण ठेंगण्या, स्थूल अशा या व्यक्तीत बुद्धिमत्तेचं असामान्य तेज एकवटलं आहे. त्या व्यक्तीचं नाव "अमीरचंद्र शास्त्री"! दिल्लीतील सर्व परिचित त्यांना आदराने 'शास्त्रीजी' म्हणतात.

*मराठी भाषेचा प्रारंभकाल निश्चितपणे सांगता येत नाही; पण ही भाषा फुलारली, फोफावली आणि अमृतमय झाली ती संत ज्ञानेश्वरांच्या अमृतात न्हालेल्या व लालित्यपूर्ण अशा शब्द-ब्रह्मामुळेच. अशा ज्ञानेश्वरीचा नादमय हिंदीत काव्यात्मक असा अनुवाद करताना मानवी स्वार्थाचे कटू अनुभव पचविणाऱ्या आणि ज्ञाने-श्वरीच्या जन्मभूमीला-प्रत्यक्ष महाराष्ट्रालाच–आजवर अपरिचित असलेल्या एका प्रतिभासंपन्न हिंदी साहित्यिकाचा हा परिचय....*

शास्त्रीजींचा जन्म सिंधू नदीकाठी वसलेल्या अहमदपूर गावी एका सिंधी ब्राह्मण टुंबात झाला. वडील दुनीचंद्र आणि आई हुकमदेवी यांच्याकडून त्यांना संस्कृतच्या अध्ययनासाठी योग्य असे प्रोत्साहन मिळाले. बालपणापासूनच शास्त्रीजींचा ओढा काव्याकडे होता. त्या वेळीच ते छोटी छोटी कवने संस्कृतमधून करीत असत. १९२३ मध्ये आपल्या वडीलबंधूंसह ते हरिद्वार येथील ऋषिकुल ब्रह्मचर्याश्रम या विख्यात आश्रमात दाखल झाले. हिमालयाच्या सान्निध्यात गंगेकाठी हरिद्वारमध्ये त्यांनी वेद वेदांग, धर्मशास्त्र दर्शन साहित्य, हिंदी आणि इंग्रजी या विषयांचे गुरूंच्या देखरेखीखाली अध्ययन केले. आलेख, तक्षण, कर्तन आदी कला शिकून घेतल्या.

जेव्हा ग्रामीण पंजाबीशिवाय अन्य कोणतीच भाषा येत नव्हती, तेव्हा " नी मेरी अम्मा, मैं कित्येसम्मा " व " मेरे कनवीच पी ,, मेरे कनवीच पीड, अम्मा निब्बूचा निपीउ " अशी बालगीतं सहजपणे स्फुरणारा हा कविवृत्तीचा माणूस हिमालयाच्या रमणीय सहवासात अधिकच फुलारला. या विद्यार्थिदशेतच त्यांनी काही संस्कृत पद्ये केली.

१९३१ साली आंदोलनामुळे हा ऋषिकुल आश्रम एकाएकी बेमुदत बंद झाला ! १९३२ साली तो पुन्हा सुरू झाला. त्या वर्षी शास्त्रीजींना हिमाचल प्रदेशातील विख्यात संत स्वामी शिवरामदास यांचा सहवास लाभला. आश्रमातील सर्वांगीण अभ्यास पूर्ण करून ते पुन्हा सिंध प्रांतातील आपल्या जन्मगावी–अहमदपुरास–आले. तेथील गुरुद्वारात त्यांनी रामायणावर प्रवचने देण्यास सुरुवात केली. काही काल हे सांस्कृतिक कार्य केल्यानंतर ज्ञानलालसेने ते कतखल येथील ' अवधूत मण्डलाश्रम ' या

संस्थेत अध्ययनासाठी गेले. तेथील अध्ययन पूर्ण होताच त्यांना संस्कृत व हिंदीवर प्रभुत्व प्राप्त झाले. पुढे १९३४ मध्ये बनारस येथील सरकारी कॉलेजची ' साहित्य शास्त्री ' ही मानाची परीक्षा ते पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. याच वर्षी अलिगढ येथील 'आयुर्वेदिक महोपाध्याय ' ही परीक्षाही त्यांनी दिली. या महत्त्वाच्या परीक्षा देत असतानासुद्धा ते आश्रमातील भांडी घासणे व भगवद्‌गीता वाचून दाखविणे ही दोन टोकाची कामे एकाच तन्मयपणे करीत होते !

' शास्त्री ' ही पदवी मिळाल्यानंतर ते ' साहित्याचार्य ' ह्या मानाच्या पदवी-साठी प्रयत्न करीत असताना दुर्दैवाचा पहिला फटका बसला. त्यांचे वडील दुनीचंद्र यांचे देहावसान झाले. आपल्या पित्याच्या अंतिम इच्छेला मान देण्यासाठी ' शास्त्री '-सारखी पदवी असतानाही त्यांनी ' अवधूत मण्डलाश्रमा'त कोठारी आणि क्लार्क यांसारख्या जागेवर राहून आश्रमाची सेवा केली !

१९३९ साली पं. आनंदशर्मा, प्राध्यापक आयुर्वेदिक कॉलेज, कतखल यांनी भर-विलेल्या कवि-संमेलनात शास्त्रीजींनी प्रथमक्रमांक पटकाविला. शर्माजींनी आपली कन्या रामदेवी हिचा शास्त्रीजींशी विवाह करून देऊन त्यांचा यथोचित सत्कार केला.

हरिद्वार (कतखल) येथून पुन्हा ते पंजाबमधील मघियाना या शहरातील ' महा-वीर संस्कृत महाविद्यालय ' या संस्थेत प्रधानाध्यापक म्हणून आले. या महाविद्या-लयात असताना त्यांनी गीतेवर प्रवचने देण्यास प्रारंभ केला. या वेळपर्यंत ज्ञानात चोहोकडून भर पडत गेल्यामुळे शास्त्रीजींची प्रतिभा उजळली गेली. रामायण, महाभारत, उपनिषदे व दर्शने यांचा सखोल अभ्यास त्यांना मघियानात करता आला. हा काळ सुमारे १९४५ ते ४६ पर्यंतचा आहे. पुढे ४७ साली देश स्वतंत्र होताना फाळणी झाली. आणि गांधीजींच्या वधानंतर ४८ साली सीमेवर भडकलेल्या जातीय उद्रेकात शास्त्रीजींचं कुटुंबही उद्‌ध्वस्त झालं ! आजवर कष्टांनी उभारलेला डोलारा उधळला गेला. त्यातच त्यांचे दोन पुत्र व बरेचसे नातेवाईक यांचा अंत झाल्यामुळे विमनस्क अशा स्थितीत शास्त्रीजी डेहराडून येथे आपल्या सासरगावी आले. काही दिवस तेथे वास्तव्य केल्यानंतर ते मथुरेजवळ वृंदावन येथे थोडे दिवस राहिले. या काळात त्यांनी काही संस्कृत पद्ये केली. पुढे थोड्याच दिवसांत ते बडोदा येथील ' भारती विद्यालय ' या संस्थेत संस्कृतचे प्राध्यापक म्हणून काम पाहण्यासाठी बडोद्याला आले. बडोद्यात ते बरीच वर्षे राहिले. दरवर्षी ज्ञानेश्वरी जयंतीच्या निमित्ताने त्यांचा बडोद्यातील ' महाराष्ट्र समाज ' या संस्थेशी संबंध येई. या काळात त्यांनी बडोद्यात ज्ञानेश्वरीवर प्रवचने दिली.

बडोदा आकाशवाणी केंद्रावरून श्री. सीताराम सहगल यांच्या दिग्दर्शनाखाली सादर झालेल्या भासकृत ' कर्णभारम् ' या नाटकात शास्त्रीजींनी ' कर्णाचा ' अभि-नय केला होता. याच वेळी म. बुद्धांच्या २५० व्या जयंतीनिमित्त ' गुजराथी 'मध्ये भरविलेल्या निबंध स्पर्धेत त्यांच्या निबंधाने प्रथम क्रमांक मिळविला होता ! बडोदा

युनिव्हर्सिटीने त्यांना संस्कृतचे प्राध्यापकपद स्वीकारण्याची विनंती केली होती. पण ही सर्व प्रमुख पदे त्यांनी नाकारली. कारण त्यांना ज्ञानेश्वरीचे वेड लागले.

ज्ञानेश्वरीच्या प्रवचनाने त्यांच्या अस्थिर मनास बडोद्यात शांती लाभली. शास्त्रीजींचा ज्ञानेश्वरीचा सखोल अभ्यास पाहून गणेशचंद्र अग्रवाल या नावाच्या त्यांच्या एका श्रीमान शिष्याने 'दोहा ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ त्यांच्याकडे पाठविला. तो 'सोरठी' भाषेत होता ! त्याचा छंदबद्ध व सुंदर अनुवाद हिंदीत करावा अशी त्यांना अग्रवालने विनंती केली. ज्ञानेश्वरीसारख्या नामवंत व लोकप्रिय ग्रंथाचा तो हिंदीतील सर्वांत पहिला अनुवाद ठरणार होता. शास्त्रीजींनी हे धार्मिक कार्य आनंदाने स्वीकारले. मूळ 'सोरठी' भाषेतील ग्रंथ हा अनेक अपभ्रंश झालेल्या व दुर्बोध शब्दांनी भरला होता. त्यात ठायी ठायी छंदभंग होता. या महान कार्यासाठी अग्रवालने शास्त्रीजींना अठराशे रुपये म्हणजे एका अध्यायासाठी एकशे रुपये मानधन ठरवून दिले ! त्याने असेही आश्वासन दिले होते की, हिंदी ग्रंथ पूर्ण होताच त्यावर अनुवादक व संपादक म्हणून शास्त्रीजींचेच नाव राहील.

हा ग्रंथ सरस व नादमय व्हावा म्हणून सिंध प्रांतात जन्म पावलेल्या शास्त्रीजींनी मूळ मराठी ज्ञानेश्वरी कशी नादमय आहे ते समजावून घेण्यासाठी मराठी भाषेचा बडोद्यात अभ्यास केला ! ज्ञानेश्वरीची पारायणे केली ! हिन्दीतील भाषांतर सुवक व्हावे म्हणून गीर्वाण ज्ञानेश्वरी व संस्कृत ज्ञानेश्वरी या क्लिष्ट ग्रंथांचा अभ्यास केला व अहोरात्र खपून मराठीतील अठरा अध्यायी ज्ञानेश्वरीच्या सोरठी भाषेतील 'दोहा ज्ञानेश्वरी' हा ग्रंथाचा हिंदीत अनुवाद केला. त्यांनी केलेली पद्यरचना मी प्रत्यक्ष पाहिली. अत्यंत भारदस्त व अर्थपूर्ण हिंदी शब्दांची ती गुंफण आहे.

शास्त्रीजींच्या या हिंदी ग्रंथाचे प्रकाशन झाले. वाचकांनी त्याचे स्वागत केले. पण एक घडू नये ते सत्य ज्ञानेश्वरीच्या संदर्भात साकारले ! एवढे अपार परिश्रम घेऊनही हिंदी ज्ञानेश्वरी साकार करणाऱ्या या महान कलावंताचं नाव त्यांच्य कलाकृतीवर नव्हतं ! लोकांना हिंदी ज्ञानेश्वरी माहीत झाली. अमीरचंद्र शास्त्री नाही ! संपादक म्हणून गणेशचंद्र अग्रवाल याने आपले नाव छापलेली प्रत्यक्ष छापील प्रतच शास्त्रीजींनी मला दाखविली. या प्रदीर्घ काव्यग्रंथात प्रस्तावनेत एका ठिकाणी अमीरचंद्र शास्त्रींचे फक्त सहकार्यासाठी 'आभार' मानले आहेत ! ते पाहताना प्रत्यक्ष ज्ञानियांच्या राण्याने म्हटलेले सत्य "ते खळांची व्यंकटी सांडो" कधी साकारणार की नाही अशी शंकाही मनाला चाटून गेली. या ग्रंथरचनेबद्दल त्यांना श्री. काकासाहेब गाडगीळ यांनी पाचारण केलं होतं यावरूनच त्यांचे स्थान कळते. सुमारे सव्वीसपेक्षाही अधिक संस्कृत व सोळापेक्षा अधिक हिंदी ग्रंथनिर्मिती करणाऱ्या या महान् हिंदी साहित्यिकाला ज्ञानेश्वरांचा महाराष्ट्र तरी विसरणार नाही अशी अपेक्षा आहे. ○

# नातं

अभय नाडकर्णी

तिचं लग्न ठरलं अन् तिच्या चेहऱ्यावर तजेला चढला. चेहऱ्यावरच्या सुरकुत्या पार पळाल्या. रडवेला चेहरा हसरा झाला व मला बरं वाटलं.

तिला मी फार पूर्वीपासून ओळखतो. तिचं बालपण, तारुण्य मी पाहिलं आहे. त्यामुळे आमच्यात एक जिव्हाळ्याचा संबंध उत्पन्न झाला. तिच्या साऱ्या सुखात व दु:खात मी सहभागी व्हावं, असं तिला वाटलं. त्या प्रमाणे अनेकदा तिच्या दु:खाच्या प्रसंगी मी तिचं सांत्वन केलं, सुखाच्या क्षणी तिच्याबरोबर हसलो. म्हणून जेव्हा तिचं वय पंचविसाहून जास्त झालं तेव्हा तिच्या लग्नाची काळजी तिच्या आईप्रमाणे मलादेखील वाटली.

माझं लग्न होईपर्यंत सर्व काही ठीक होतं, पण जेव्हा माझं लग्न झालं तेव्हा मला प्रकर्षानं शुभदाचं लग्न अजून झालं नाही ह्याची रुखरुख लागली. माझ्या लग्नात ती करवली म्हणून नटून थटून वावरली. सर्व गोष्टींत आपुलकीनं लक्ष घातलं. इतकंच काय? लग्नाच्या पहिल्या रात्री तिनं स्वत: उभं राहून पलंग सजवून घेतला. तो तिनं सजविलेला पलंग मला अजून स्पष्ट आठवतो. चारी बाजूंनी सोडलेल्या झेंडूच्या माळा व मध्ये चमेलीची जाळी. त्या चमेलीच्या जाळीतून डोकावणारे ते सुंदर लाल गुलाब! एखादं चित्र कोरून ठेवावं तसं माझ्या मनावर हे चित्र कोरलेलं आहे.

तसं पाहिलं तर आमचं नातं मानलेल्या बहीण–भावांचं! पण का कोण जाणे?



तारुण्यात पदार्पण केल्यावर माझ्या मनात तिच्याबद्दल नकळत ओढ निर्माण झाली. तिच्या स्पर्शासाठी मी आसुसलेला राहू लागलो. त्यामुळे पत्त खळताना थट्टेनं झालेला हस्तस्पर्श माझ्या मनात भावनेचं वादळ माजवू लागला.

आपल्याप्रमाणं तिला पण वाटत असेल का हे सारं? माझं मन विचार करू लागलं. पण तिच्या वागण्यातून अशा तऱ्हेचा कुठलाच हेतू अभिप्रेत होईना. ती नेहमीप्रमाणे आमच्याकडे येई. माझ्या पाठीवर हात मारून 'काय दिन्या' म्हणून ओरडे. स्वयंपाकघरात जाऊन आईला स्वयंपाकात मदत करी. तिचं हसणं, वागणं, बोलणं, चालणं ह्यातून मी काही अर्थ लागतो का हे पाहत राही.

मनाचा कोंडमारा जेव्हा असह्य झाला तेव्हा मी हे सर्व तिला विचारायचं असं ठरविलं. माझ्याकडे आपटे, खांडेकर, फडके इत्यादींच्या कादंबऱ्या आहेत. कधी कधी ह्या कादंबऱ्या शुभदा वाचावयास नेई. एके दिवशी तिला एक कादंबरी देताना मी आत एक चिठी सरकविली. त्यात लिहिलं होतं—

'शुभदा,

खूप दिवस मनात आहे तुला विचारावं. पण मनाचा निर्णय लागत नाही. हृदयातून उमटलेल्या विचारांच्या लाटा ओठांच्या किनाऱ्यावर येऊन परत फिरतात. त्यामुळे हृदयाचा प्रश्न हृदयातच राहतो. आज मात्र हे धाडस करून ही चिठी तुला लिहीत आहे. तू उत्तर देशीलच व ते उत्तर बहुवा होकारार्थी असेल अशी अपेक्षा आहे.

शुभदा, तुझ्यावर मी सर्वस्वानं प्रीती करीत आहे. ध्यानी, मनी, स्वप्नी मला

तूच दिसतेस. वाटतं, हे जीवन तुझ्याविना ओसाड आहे. माझ्या ह्या काटेरी जीव-, नात फुले फुलविण्याचा तू प्रयत्न करशील काय ?

तुझा
दिनकर.'

थरथरत्या हातानं ती कादंबरी शुभदाच्या हातांत देत मी म्हटलं, 'जपून वाच हं कादंबरी – अगदी विचारपूर्वक.'

ती माझ्याकडे मी असा विचित्र का बोलतो आहे, हे न समजल्यानं पाहतच राहिली.

तिला जास्त आश्चर्यात न ठेवता मी म्हटलं, "आत एक चिठी आहे. तुझ्या-कडून उत्तराची अपेक्षा आहे."

क्षणभरही तिथे न थांबता मी आत वळलो, ती हॉलमधून कधी गेली ते मला कळलंच नाही.

मी अगदी धडधडत्या अंत:करणानं दुसऱ्या दिवसाची वाट पाहू लागलो. नेहमी-प्रमाणे सकाळी शुभदा आली. निर्विकार चेहऱ्यानं ती कादंबरी माझ्या हातांत देत तिनं म्हटलं, "विचारपूर्वक वाचली आहे ही कादंबरी मी !"

मी हसलो. वाटलं, आज आपली तपश्चर्या फळाला आली. ती स्वयंपाकघरात गेली व मी ती कादंबरी उघडली. आतमध्ये चिठी होती. आतुरतेनं ती चिठी मी उघडली,

'दिन्या,

माझ्या दृष्टीनं तू अजून दिन्याच आहेस. कधीच दिनकरराव होऊ शकणार नाहीस. भाऊबीजेला मी तुला ओवाळते. राखी पौर्णिमेला राखी बांधते. त्यामुळे तुझं व माझं नातं माझ्या मनात कायम आहे. माझ्या ह्या सुंदर स्वप्नाला तडा जाऊ देऊ नकोस. मला भाऊ नाही. ती उणीव तू भरून काढ. नसत्या खुळचट कल्पनांनी हा आनंद नासवू नकोस.

तुझी बहीण,
शुभदा.'

तिची चिठी वाचून मी शांतपणे कादंबरी बंद केली, हलक्या हातानं ती चिठी फाडून टाकली. एवढ्यात शुभदा बाहेर आली. कालच्या रात्री एक वादळ झालं ह्याचं चिन्ह पण तिच्या चेहऱ्यावर नव्हतं.

माझ्याजवळ येत हसत ती म्हणाली, "एखादी कादंबरी वाचावयास दे. रडकी नको. हसऱ्या चेहऱ्याची असल्यास बघ."

हळू हळू मी सर्व विसरून गेलो. मी विसरण्यापूर्वी तिनंच मला ते विसरायला लावलं. त्यामुळं नकळत माझ्या मनात तिच्याबद्दल आदर निर्माण झाला. मलासुद्धा शुभदात व माझ्यात बहीण–भावाचं नातं राहणं इष्ट आहे असं वाटू लागलं.

माझं लग्न झालं. सुरेखा व मी पती–पत्नींच्या नात्यानं बांधले गेलो व शुभदाचं व माझं नातं पक्कं झालं.

त्यामुळेच शुभदा जेव्हा पंचवीस वर्षांची होऊनसुद्धा तिच्या लग्नाचं जमेना तेव्हा मी तिच्या आईप्रमाणे दुःखी झालो. तिच्या लग्नासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न मी चालू केले. पण तिच्या पत्रिकेतील मंगळ मला आडवा येऊ लागला व माझी उमेद खचली. माझ्या पायांतील बळ गेल्यासारखं मला वाटलं. मनानं तिच्या लग्नाचा ध्यास घेतला आणि शेवटी एकदा शुभदाचं लग्न जमलं. ती बातमी मला समजली व मी आनंदित झालो. वाटलं, शुभदाच्या मागची साडेसाती संपली. नाहीतरी तारुण्य असताना विवाहसौख्य मिळण्यात आनंद असतो. प्रौढपणी झालेला विवाह म्हणजे जीवनाशी केलेली तडजोड होय !

शुभदाच्या लग्नात मी काही कमी पडू दिलं नाही. जशी ती माझ्या लग्नात झटली तसाच मीही घरचं कार्य समजून शुभदाच्या लग्नात वावरलो. सासरी जाण्याआधी ती जोडीनं आमच्या घरी आली. मला नमस्कार करून तिनं माझ्याकडे आशीर्वाद मागितला.

मी म्हटले, "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव !"

तेव्हा ती मोहकपणे लाजली. खाली पाहत हळूच पुटपुटली, "ई... बाई... हा कसला मेला आशीर्वाद ?"

ती सासरी गेली व माझ्या जीवनात एक पोकळी निर्माण झाली. तिचं सासर तसं काही लांब नव्हतं, पण सासरी गेल्यानंतर ती आमच्याकडे यायची कायमची बंद झाली. ती माहेरी यायची पण आमच्या घरी यायची नाही. मला नवल वाटलं. पण मी त्याबद्दल कोणालाच काही विचारू शकत नव्हतो. आईकडे अथवा सुरेखाकडे विषय काढला तरी त्या दोघी गप्प बसत. त्यामुळे नंतर हा विषय काढण्याचा मी बंद केला व मनाची समजूत घालून गप्प बसू लागलो.

पण कधी कधी एकांतात हटकून शुभदाची आठवण यायची व मन गलबलून उठायचं. त्यानंतर एके दिवशी शुभदा आमच्या घरी आली. ती गरोदर असल्याची बातमी सुरेखाला लागली होती व सुरेखानं तिला केळवणासाठी बोलावून आणलं होतं.

गर्भारपणामुळं शुभदाच्या अंगावर एकप्रकारची सुस्ती चढली होती, त्यामुळे तिची नाजूक काया निराळीच भासत होती. तिच्या चालण्यात एकप्रकारचा संथपणा आला होता. थोडयाशा हालचालीमुळे होणारे श्रम तिच्या चेहऱ्यावर दिसून येत होते. तरी पण तिचा चेहरा जास्त म्लान दिसत होता. काळजीत डुबून गेलेला असा तो तिचा चेहरा पाहून मला दुःख झालं.

हॉलमध्ये ती एकटीच आहे असं पाहून मी तिला विचारलं, "तू अशी दुःखी का दिसत आहेस ? सासरची माणसं चांगली नाहीत का वागत तुझ्याशी ?"

ती चेहऱ्यावर ओढून ताणून हसू आणून हसली व म्हणाली, "छे ! तुला असं का वाटतं ? मी सुखी आहे, अगदी पूर्णपणे सुखी ! " हे सांगताना तिच्या डोळ्यांतून ओघळलेले दोन अश्रू मला खूपसं काही सांगून गेले.

तिच्या नकळत मी पण डोळे टिपले. तिच्या नजरेतून हे काही सुटलं नाही. ती म्हणाली, " तुझ्या डोळ्यांत पाणी का ? "

" डोळ्यांत येणारं पाणी नेहमी दुःखानंच येतं असं नाही. " विषय बदलावा म्हणून मी म्हटलं, " लग्न झाल्यपासून तू आमचेकडे का येत नाहीस ?"

ती हसली व म्हणाली, " लग्न झाल्यावर मुलगी सर्वस्वी दुसऱ्या घरची होते. कित्येकदा त्या बंधनात तिला इच्छा नसतानासुद्धा गुरफटून राहावं लागतं. तुझ्याकडे मी यावं अशी त्यांची इच्छा नव्हती व त्यांची इच्छा मोडण्याचं धाडस माझ्यात नाही."

तिचं उत्तर खोचक तसंच सूचक पण होतं. तिच्या सासरच्या माणसांबद्दल — तिच्या नवऱ्याबद्दल — माझ्या मनात नकळत द्वेष उत्पन्न झाला. माझं व शुभदाच बहीण—भावाचं नातं माहीत असूनसुद्धा शुभदाच्या नवऱ्यानं असं वागावं म्हणजे काय ? क्षणभर मला तिच्या नवऱ्याचा राग आला. पण माझं चडफडणं एकतर्फी होतं; मी फक्त माझ्यावर रागवू शकत होतो. त्याशिवाय जास्त काही करण सर्वस्वी माझ्या आवाक्याबाहेरचं होतं. त्यामुळं मी जास्त काही शुभदाला विचारू शकलो नाही. न विचारणं माझ्या दृष्टीनं श्रेयस्कर होतं.

त्या दिवशी शुभदा जरा फुलली, हसून खेळून वागली. जेवणाच्या आधी तिनं एक उखाणा घेतला. सकाळी तिच्या चेहऱ्यावर असलेलं मळभ संध्याकाळपर्यंत साफ पळालं. संध्याकाळी टॅक्सीतून मी तिला तिच्या घरी नेऊन सोडलं. बाळाला घेऊन यायचं तिनं कबूल केलं. त्या दिवशी मीदेखील मोकळेपणानं हसलो, बोललो.

रात्री सुरेखा म्हणाली, " आज तुम्ही विशेषसे खुशीत आहात. का शुभदा भेटली म्हणन ? " तिच्या ओठावर बोट ठेवीत मी तिला घट्ट मिठीत ओढले.

" शुभदा बाळंत झाली. तिला मुलगा झाला. " मी घरात आल्याबरोबर सुरेखानं पेढ्याची बशी पुढे करीत म्हटलं.

तोंडात पेढा टाकून मी आल्या पावलीच मागे फिरलो. कधी एकदा शुभदाला जाऊन भेटतो असं मला झालं होतं.

हॉस्पिटलमधल्या कॉटवर शुभदा शांतपणे पहुडली होती. माझी चाहूल लागल्यावर तिनं किलकिल्या डोळ्यांनी माझ्याकडे पाहिलं व नंतर डोळे उघडले.

मी तिच्याकडे पाहत म्हटलं, " ठीक आहेस ना तू ? "

" हो. पण तू मात्र एक क्षणभरही येथे थांबू नकोस. हे इतक्यात येथे येतील."

" पण का ? मी तुला बघावयास आलो आहे. "

" पण मला, तुला भेटायचं नाही. "

" का ? "

"कारण, तुला ह्यापुढे न भेटण्याचं मी ह्यांना वचन दिलंय." ती संथपणे म्हणाली.

"का दिलंस तू असलं वचन त्यांना ?"

"मानलेल्या बहीण–भावाचं आपलं नातं ह्यांना पसंत नाही. आपण आपल्या दृष्टीनं कितीही पवित्र असलो तरी ह्यांच्या दृष्टीनं आपण पापी आहोत. माझं पुढील आयुष्य जर सुखात जावं असं तुला वाटत असेल तर जा तू आता येथून."

एवढयाशा बोलण्यानं शुभदाला ग्लानी आली. ती निपचीत पडून राहिली. मी बाहेर पडलो. वाटलं, नातं निर्माण करण्याचं आपल्या हातांत नसतं, समाजाच्या हातांत असतं; किंबहुना समाजाचा ठेका घेतलेल्या शुभदाच्या पतीच्या हातात असतं. ते नातं पवित्र का अपवित्र ठरविणारे आपण कोण ?

हॉस्पिटलच्या पायऱ्या उतरून मी जोरजोरात धावण्यास सुरुवात केली. माझ्यात व शुभदांत अंतर वाढू लागलं–कुठेतरी तुटण्यासाठी !

O

## दोन विचार

दिल्लीत नुकत्याच साजऱ्या झालेल्या मोझांबिक मुक्तिदिनानिमित्त ऐकू आलेले दोन विचार.

नायजेरियाचे भारतातील वकील जॉर्ज डव्ह–एड्विन :

आशिया व आफ्रिकेतील पुष्कळ पददलित देशांना भारतापासून स्फूर्ती मिळाली आहे. आफ्रिकेच्या स्वातंत्र्य-संग्रामाचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा राजा राममोहन रॉय आणि गांधीजी यांची नावे विसरली जाणार नाहीत यात शंका नाही.

अल्जीरियन इताकासाचे प्रथम सचिव बकीर ओल्ड राउल्स :

अल्जेरिया आता साम्राज्यशाही-विरोधी, वसाहतवाद-विरोधी लढयाच्या अग्रभागी आहे व अल्जेरियाने एक–दोन नव्हे तर आठ क्रांतिकारक चळवळींना पाठिंबा दिला आहे.

पुस्तके

निशिकांत मिरजकर

# गाणे

चांगला लेखक आपल्या कथेतल्या पात्रांशी अगदी एकरूप होऊन गेलेला असतो; त्यांच्याशी तन्मय होऊन त्यांच्या विचारभावना प्रत्यक्ष अनुभवतो, जगतो, आणि मग त्या त्याच्या लेखणीतून सजीव रूपे घेऊन बाहेर पडतात असे म्हटले जाते. पण हे पूर्णांशाने खरे नाही. हे अर्धसत्य आहे. 'सविकल्प समाधी' अथवा 'सहानुभूतिपूर्वक ताटस्थ्य' अशासारखे साहित्यसम्राटांचे विद्वज्जड शब्द आपण सोडून देऊ. पण एवढे निश्चित, की या एकरूपतेमध्ये, या तन्मयतेमध्ये खरा अभिजात लेखक विरघळून जात नाही. तो त्यात बुडालेला असतो, पण मुरून गेलेला नसतो. त्याचे व्यक्तिमत्त्व अभंग असते. जगातले दुःख, वेदना त्याला हादरून टाकते, गदगदा हलवते, पण उन्मळून टाकीत नाही. अशा लेखकाची संवेदनाशक्ती कितीही तरल असली, त्याचे मन कितीही कोमल असले, तरी तो आपल्या साहित्यातील वेदनेने ओक्साबोक्शी रडत नाही. सवंग भाबड्या भावुकतेच्या डोहात विरघळत नाही. त्याचा सूर कमालीचा शांत असतो. पण त्यामागे एक खूप भोगलेला पिळवटलेपणा असतो. आपल्याच वेदनेकडे एक पाऊल मागे टाकून पाहून तो त्यातले कंगोरे न् कंगोरे अगदी स्पष्टपणे कोरीत असतो. वरवर

# भारावून टाकणाऱ्या कथा

निर्विकारपणे; पण खरे म्हणजे मनाला हलवून सोडणाऱ्या जिव्हाळ्याने.

विजय तेंडुलकरांचे लेखन हे मला बऱ्याच वेळा या प्रकारचे वाटते. नव्हे, तो त्यांच्या लेखनाचा स्थायीभाव आहे अशी माझी समजूत आहे. एक तऱ्हेच्या मारलेल्या अलिप्तपणाने ते कथा लिहितात. कथानिवेदन प्रथमपुरुषी असले तरी हा अलिप्तपणा ते सहसा सोडीत नाहीत. म्हणजे कथेत ज्या काही अनुभूतींचा आविष्कार त्यांनी केला असेल, ज्याने त्यांच्या मनावर खोलखोल ठसा उमटवला असेल ते सगळे ते सांगतातच. पण शक्यतो ते सारे मूळच्या स्वरूपात जसेच्या तसे यावे असा त्यांचा प्रयत्न असतो. त्यांच्या स्वतःच्या मनावरचे ठसे दाखवून वाचकांना व्याकुळ करण्यापेक्षा त्या साऱ्यामुळे वाचकांच्याच मनावर स्वतःप्रमाणे कोरीव ठसे उमटावेत इतकी ती अनुभूती करकरीत करण्याचे ते पत्करतात. अगदी मनाची मुळे हलविणारे असे काही सांगतानासुद्धा ते रोखठोकपणाचा, केवळ वस्तुनिष्ठ दर्शनाचा आव आणतात. वास्तविक त्यांच्या मनाची मुळेही त्याने पुरेपूर भिजलेली असतात. हे कळते, जाणवते. म्हणून तर त्यांचा हा अलिप्तपणा लडबडलेल्या भावुकतेपेक्षा जास्त बोलका ठरतो. परिणाम करून जातो. 'गाणे' या कथासंग्रहातली प्रत्येक गोष्ट या प्रकाराने भारलेली आहे. कथेबरोबर लेखकाला जास्त जास्त उंच नेणारी, विशाल करणारी आहे.

हा गहिरा अलिप्तपणा हेच कित्येक ठिकाणी पाझरणाऱ्या काव्यात्मकतेचे मूळ आहे. साधासुध्या मनातल्या साध्याच भावना, पण लेखकाने त्या अशा नेमकेपणाने आणि उत्कटतेने दाखविल्या आहेत की जागोजाग त्यांची काव्यचित्रे निर्माण झालेली आहेत. एका प्रौढ, विवाहित कारकून स्त्रीच्या मनाची ही स्थिती पाहा : " ...म्हणजे झोप अशी लागली नव्हती. ती लागतच नव्हती आणि विचारही धड करवत नव्हता. डोके दुखत होते. त्रास होत होता आणि सुखदेखील होत होते. आणि हे कसले, कशाकरता ते काही केल्या कळत नव्हते. म्हणजे गोंधळच होता." गोंधळ अजून कायम होता. कचेरीत ती एकसारखी कसल्याशा विचारहीन पोकळीत पाहता पाहता बुडत होती, खोल खोल हरवत होती. बाकी तिला काही कळत नव्हते. हे का ? कशाकरता ? काही उलगडत नव्हते. उलगडावेसे वाटत नव्हते. ती नुसतीच मरकटत होती. आणि तो आला नि कसे शांत वाटले. तापल्या भुईवर थंडगार पाणी टपटपा शिपडावे तसे वाटले. त्याने पाहिले, तेव्हा चक्क ती डोळ्यांत प्राण आणून त्यालाच पाहत होती !" मनातल्या एका अनाकलनीय, पण तरीही उत्कट

अशा भावनेचे एकेक पदर तेंडुलकरांनी किती हळुवारपणे उलगडले आहेत ! जणू एवढ्याशाही धक्क्याने सारे विस्कटून जाईल! त्या भावनेचे सुस्पष्ट चित्र त्यांनी काढले आहे. त्या लेखनिकेला आलेली अनुभूती जशीच्या तशी व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्यामुळेच त्यात तरल काव्यात्मता आपोआप अवतरली आहे. हेच अन्यत्र. या काव्यात्मतेतूनच तेंडुलकर कमालीची उत्कटता साधतात. सिद्धांतवजा विमनस्कता प्रगटवितात. जीवनाचे दार्शनिक मूल्य शोधण्याचा प्रयत्न करतात.

## मनसिक ताण

सामान्यांच्या क्षुद्र मनात निर्माण होणारी वादळेही क्षुद्र प्रसंगांतून निर्माण झालेली, अतएव क्षुद्रच, सामान्यच म्हणावी लागतात. त्यांच्या कक्षेबाहेरून त्यांच्याकडे बघताना आपल्याला ती कळतच नाहीत. जाणवली तरी हास्यास्पद वाटतात. पण त्या त्या सामान्यांच्या चौकटीत ती वादळे भलतीच प्रक्षोभक ठरतात. सबंध जीवन अथवा व्यक्तिमत्त्व हादरवून टाकतात. ' ज्याची त्याला प्यार कोठडी ' या कथेतील कारकुनाच्या मनात उद्‌भवलेले वादळ अशाच प्रकारचे आहे. बिचारा आपल्याच मनाला घाबरतो आहे. मनात नकळत उगवलेले रोपटे पाहून गांगरतो आहे. ' तिच्या ' एकटक कटाक्षानेही हादरतो आहे. "पाहिले तर बभ्रा होईल ऑफिसभर ! मग अर्थात गावभर ! शेवटी घरी ! आणि मग काय कॉम्प्लिकेशन्स होतील काय गोंवळ होतील याची कल्पना तरी आहे ? गाढव कुठली ! नॉन्सेन्स !" वगैरे वगैरे वल्गना करीत गोंधळून जातो आहे. त्या एवढ्याशा प्रसंगातून त्याच्या मनात झालेल्या भयंकर खळबळाटाचे वर्णन तेंडुलकरांनी कमालीच्या संवेदनाग्राही लेखणीने केले आहे. 'थोटूक' या कथेतील सिन्नरकरही असेच. अंगी फारशी कर्तबगारी नसताना केवळ नशीबाच्या जोरावर वर चढलेला हा ' थर्ड रेट आर्टिस्ट ' भेटायला आलेल्या पोंक्षेपुढे त्याचे फुसके व्यक्तिमत्त्व जास्त जास्त खाली जात राहते. अगदी साध्या साध्या क्षुद्र गोष्टींचे त्यांना केवढ महत्त्व वाटत राहते. सिगारेट तोंडात ठेवून अस्खलित बोलण्याच्या आपल्या कौशल्यावर ते खूष असतात. टेबलाच्या ग्लासस्टॉपमध्ये चमकलेला अंगठीचा खडा पाहूनच त्यांना हलकं वाटतं. पोंक्षेच्या सिगारेटची राखेची वाढणारी, लांबोडकी, फुसकी सुरळी पाहून ते अस्वस्थ होतात. त्यांच्या उपहसनीय व्यक्तित्वाचे दरवाजे म्हणून या क्षुद्र गोष्टी प्रतीकात्मक ठरतात.

या कथासंग्रहातील बहुतेक सर्व कथांमध्ये एक मानसिक ताण निर्माण झालेला आहे. किंबहुना हा मानसिक ताण हाच बहुतेक कथांचा विषय आहे. कथेच्या मध्यावर हा ताण अगदी अगदी तीव्र झालेल्या स्वरूपात आपल्याला दिसतो. साबणाचा फुगा फुलविताना तो मोठा मोठा होत जावा, त्याचा पृष्ठभाग आणखी आणखी तणावत जावा आणि अगदी तो फुटणार की काय अशी हुरहूर मनाला वाटत राहावी तितकी व्याकुळ करणारी तीव्रता तेंडुलकर निर्माण करतात. एखाद्या वाक्यातून, प्रतिमेतून या अवस्थेचे टोक जाणवत राहते. अपेक्षा उंचवतात. खूप

उंचावतात आणि तशा उंचीवरच गोष्ट संपते. सगळे ताण अबाधित राहून. अचानकपणे नव्हे, पण उत्कटपणे. हवी तिथेच. हवी तशीच हुरहूर लावून. साबणाचा फुगा फुटत नाही; उलट जास्तीत जास्त फुलारून तसाच तरंगत राहतो, आणि मग त्याच्या ताणलेल्या वक्र पृष्ठभागात काय काय इंद्रधनुष्ये दिसतात ! मध्यमवर्गीय कारकुनाची क्षुद्रजंतुता आणि कोंडमारा होणाऱ्या असमर्थ मनाची अगतिकता, जीवन उधळून टाकणारी बेदरकारी आणि त्यामागे लपलेले सीमान्त कारुण्य, अनुभवाने पचवलेले विदारक तत्त्वज्ञान आणि त्यातून निर्माण होणारा चीड आणणारा निर्विकारपणा, काळजाचे ठोके चुकविणारी वास्तवनिष्ठता आणि सोज्वळतेच्या तलम बुरख्याखालील हिडीस व्यवहारीपणा या अनेक भिन्नभिन्न छटांची विचित्रे त्यात आकारून येतात.

## विविध व्यक्ती

व्यक्तींच्या भावनांचा गुंता उलगडून दाखविताना जो नेमकेपणा तेंडुलकर दाखवितात, तोच साध्या साध्या दृश्यवर्णनातही आढळतो. त्यामुळे कोणत्याही दृश्याचे संवेदनाप्रमुख आकार तेवढे उजळून निघतात आणि वातावरणनिर्मितीलाही त्रिमितिपरिमाण प्राप्त होते. " त्याचा सारा तपशील धूसरपणाने घासला जाऊन फक्त त्याचे स्थिर बसणेच प्रकाशात कोरून निघाले होते. "... " बेफिकिरीने उभ्या राहिलेल्या शरीरात मोडकळीला आलेल्या खिळखिळ्या इमारतीचा केविलवाणेपणा होता–कंप होता. "... " तू मुकाट्याने बसून राहिलीस; खेळायला जायला बापाने नकार दिलेल्या छोट्या मुलीसारखी. " यांसारख्या मोजक्या वाक्यांतून दृश्य अथवा व्यक्ती पूर्णत्वाने चितारण्याची अद्‌भुत किमया तेंडुलकरांनी प्रत्येक कथेत केली आहे.

तेंडुलकरांनी या कथांमधून रंगविलेल्या व्यक्ती साध्या नाहीत. विलक्षण आहेत. त्यांतल्या काही व्यक्ती साध्यासुध्या भासल्या तरी त्या साधेपणातच त्यांचे काहीतरी स्वतःचे वेगळे असे नाट्य आहे. जीवनाची एक विशिष्ट बाजू प्रत्येक व्यक्तीने अगदी मनस्वीपणाने अनुभवली आहे. भोगली आहे. त्यात सहा मवाल्यांनी बलात्कार केलेल्या भग्न उद्‌ध्वस्त तरुणीचा " आता तू मला खोलीवर ठेवून घेतोस; माझ्याकडनं काही बदल्यात मागायचा हक्क आहे तुला. न मागता घेण्याचादेखील ! तुझ्या मित्रांनाही त्यात भाग घ्यायला बोलवू शकतोस तू. ओ यस ! आयुष्य म्हणजे अखेर एक देवाणघेवाण आहे " असला दचकवून टाकणारा काटेकोरपणा आहे. अंजू आणि तिच्या व्यवहारी भावांसारखी करपवणारी व्यक्तिचित्रे आहेत. मित्राच्या बायकोविषयी वेगळाच जिव्हाळा निर्माण झाल्यामुळे फुलारलेली पण तरीही शेवटी वास्तवाला उदार मान्यता देणारी हृद्य कोवळिकीची मुलायम काव्यात्मता आहे. बरेच काही आहे. या गोष्टी आहेत अपवादात्मक. क्वचित् घडणाऱ्या. ( किंवा सर्वत्र घडत असून या परिमितीने क्वचितच जाणवणाऱ्या. ) पण वास्तवावर

असणाऱ्या अढळ श्रद्धेनं, सूक्ष्म निरीक्षणानं, अनुभवी अलिप्तपणानं आणि रोखठोक वर्णनानं त्या अगदी नेहमीच्या वाटतात. खऱ्या खऱ्या भासतात, हे त्यांचं वैशिष्टच. त्यातही जुगुप्सेनं विरोधी प्रियता वाटणारी वास्तवता, विदारक व्यक्तिचित्र इत्यादी सारीच्या सारी वैशिष्टचे 'बेडूक'सारख्या कथेत एकत्र साचलेली दिसतात तेव्हा हे विशेषच जाणवते. तेंडुलकर जेव्हा उद्ध्वस्तपणा रंगवितात तेव्हा तो अगदी कमालीचा आणि खरोखरीचा रंगवितात आणि जेव्हा थंडपणा रंगवितात तेव्हा तोही तिडीक येण्याइतका पराकोटीचा रंगवितात. ('तमाशा' व 'आम्ही सात भाऊ आणि अंबू'). 'बॅकसीट'सारख्या कथेत तर हलवून सोडणारे निराश उद्ध्वस्त जीवन आणि तिरीमिरी आणणारा व्यवहारी थंडपणा यांचे अंतःकरणाला भिडणारे मिश्रण आढळते.

## फक्त कलाकृती नाहीत...

तेंडुलकरांच्या शैलीची प्रकृती कथेच्या धारेप्रमाणे आपोआप रंगत जाते. त्रयस्थ, तुटक, खिन्न, उपरोधिक, मख्ख, थंड–अशा नाना तऱ्हा ती धारण करते. त्यामुळे पात्रांच्या मनोभावना निवेदनातून उलगडून, स्पष्ट करून वेगळ्या सांगाव्याच लागत नाहीत. कथा त्यात आपोआप भिजून निघते. मुरते. अकस्मात नवरा गेल्याने सैरभैर झालेल्या, आपलं दुःखही विसरलेल्या बायकोला "सगळंच काही विचित्र, संदर्भ नसलेलं, विनोदी आणि वेडसर" भासतं. म्हाताऱ्याची गलथान काळी रखेली "माशीसारखी आपल्याच नादात, आपल्याच बहुधा केसाळ जिभेने तंबाखू चोखीत असते." विधवा बहिणीचं सांत्वन करणाऱ्या दादाचा स्वर "पूजा सांगितल्या-सारखा" संथ नि कंटाळवाणा असतो, तर मेंडाळलेला सेक्रेटरी "चारी तंगड्या वर केलेला दृष्टिक्षेप टाकून उभा राहतो" अशी अनेक उदाहरणे. तेंडुलकरांना जी जी अनुभूती साकारायची असेल ती ती प्रत्येक कथेच्या प्रारंभापासून अखेरपर्यंत जास्त जास्त निश्चित पटणारा, स्तंभित करणारा आकार घेत जाते. अक्षरशः भारावून टाकते. कलापूर्ण साहित्यापेक्षा जीवनदर्शी साहित्य श्रेष्ठ वगैरे वादात न शिरताही एवढं निश्चित म्हणता येईल की 'गाणे' या तेंडुलकरांच्या कथा-संग्रहातल्या कथा म्हणजे नुसत्या कलाकृती नाहीत, तर कलाभिव्यक्त जीवनाकृती आहेत. रिझविणाऱ्या नाहीत. विचार करावयास लावणाऱ्या, सुन्न करणाऱ्या, भारावून टाकणाऱ्या आहेत.

O

('गाणे'–विजय तेंडुलकर–मौज प्रकाशन–किंमत पाच रुपये–पृष्ठे १४७)



# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

## २२

जुलैमधला उठाव फसल्यानंतर लेनिनला पेट्रोग्राडमध्ये उजळ माथ्याने वावरणे अशक्य झाले होते. केवळ लष्करच त्याच्यावर खवळले होते असे नव्हे तर सर्वसामान्य नागरिकही म्हणत होता, 'कुठाय तो देशद्रोही लेनिन ! पकडा त्याला आणि टाका तुरुंगात'. कामगार-वर्गही गोंधळून गेला होता. सारा देशच अराजकाच्या काठावर उभा होता. चिघळणाऱ्या परिस्थितीला आवर घालण्यासाठी नेमके काय केले पाहिजे हे कोणालाच सुचत नव्हते. अशा परि-स्थितीत आणखी काही काळ थांबण्या-विना लेनिनला गत्यंतर उरले नव्हते. तो आपल्या सहकाऱ्यांना सांगत होता— 'अद्यापही आपण अल्पमतात आहोत. जनता आपल्यासंबंधी संशय व्यक्त करीत आहे. यास्तव आपल्याला आणखी काही काळ थांबले पाहिजे.'

एकीकडे लेनिन आपल्या सहकाऱ्यांना 'थांबण्याचे' तत्त्वज्ञान सांगत असला तरी आहे ती परिस्थिती फार काळ टिकणार नाही याबद्दल तो निश्चित होता. सध्याच्या गोंधळलेल्या परिस्थितीवर कणखर नेतृत्व हाच एक तोडगा आहे हे त्याला माहीत होते आणि असे नेतृत्व करण्याचे सामर्थ्य आपल्याखेरीज इतर कोणाच्याही बाहूंत नाही हेही त्याला पक्के ठाऊक होते. या कालखंडात तो अक्षरशः मृत्यूच्या छायेत वावरत होता. १७ जुलैच्या रात्री तो 'प्रावदा'च्या कचेरीत काम करीत बसला होता. हे काम आटोपून तो बाहेर पडल्यानंतर अर्ध्या तासाच्या आतच सैनिकांनी या

कचेरीवर हल्ला चढवून तेथील सामानाची नासधूस करून टाकली. या वेळी जर लेनिन तेथे असता तर या प्रक्षुब्ध सैनिकांनी त्याचे काय केले असते हे 'प्रावदा'च्या उद्ध्वस्त कचेरीवरून समजण्यासारखे होते.

ती सारी रात्र आणि दुसरा संपूर्ण दिवस लेनिन कार्पोव्हका रस्त्यावरील एका खोलीत लपून राहिला होता. येथूनच त्याचे अज्ञातवासाचे पर्व सुरू झाले. परंतु या काळातही त्याचे लेखन नियमित चालू असे. १८ जुलै रोजी त्याने एका दिवसात पाच लेख लिहून काढले. नुकत्याच झालेल्या उठावामागे बोल्शेव्हिकांचा हात असल्याच्या आरोपांचा त्याने या लेखांमध्ये साफ इन्कार केला होता. त्याचप्रमाणे आपण जर्मन हस्तक नसल्याचा त्याने निर्वाळा दिला होता. लोकक्षोभ नाहीसा करण्यासाठी लेनिन आपल्याकडून परोपरीने प्रयत्न करीत असतानाही लोकांचा त्याच्यावर विश्वास बसत नव्हता. लोकमत एकदा बिथरले की ते सावरायला किती अपार कष्ट पडतात याचा या वेळी लेनिन अनुभव घेत होता. प्रक्षुब्ध लोकमतामुळे आपण केव्हाही मारले जाण्याची शक्यता आहे हे ओळखून लेनिनने एका लेखात म्हटले होते—' मी जर मारला गेलो तरी ' मार्क्सवाद आणि शासनसंस्था 'ही माझी पुस्तिका अवश्य प्रसिद्ध केली जावी. तिळया मुखपृष्ठाची ही पुस्तिका स्टॉकहोममध्ये आहे. या पुस्तिकेत मी प्रामुख्याने मार्क्स आणि एंगल्स यांचे उतारेच दिले आहेत. ही पुस्तिका शक्य तितक्या लवकर प्रसिद्ध होणे महत्त्वाचे आहे. अर्थात् हे कार्य पार पाडताना कमालीची गुप्तता पाळली गेली पाहिजे.'

एका अर्थाने लेनिन आपले हे राजकीय मृत्युपत्रच लिहीत होता. सध्याच्या अशांत परिस्थितीत आपण जर मारले गेलो तर आपल्या मागाहून का होईना पण रशियात क्रांती झालीच पाहिजे हाच त्याचा एकमेव ध्यास होता.

अज्ञातवासाच्या काळात एकाच ठिकाणी राहून चालण्यासारखे नव्हते. गुप्त पोलिसांना टाळीत लेनिन दररोज आपली निवासस्थाने बदलू लागला. कार्पोव्हका भागातून तो व्हायबर्ग येथे राहावयास गेला. मुख्यतः कामगारवस्ती असलेला हा भाग लपून राहण्याच्या दृष्टीने सोयीचा होता. परंतु तरीही तो एका जागी काही तासांपेक्षा अधिक वेळ राहत नसे. या अशा धावपळीच्या कालखंडातही बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांना भेटून त्यांना आपले विचार समजावून देण्याचे त्याचे कार्य अविरत चालू होते. पेट्रोग्राड सोव्हिएटवरचा लेनिनचा विश्वास उडाला होता. सध्या अस्तित्वात असलेले सोव्हिएट क्रांतीला पाठिंबा देईल असे तो मुळीच मानीत नव्हता. म्हणून त्याने आपल्या सहकाऱ्यांना सांगितले, ' आता ' आपण आपले घोषवाक्य बदलले पाहिजे. ' सारी सत्ता सोव्हिएटच्या हाती ' या जुन्या घोषवाक्याऐवजी ' सर्व सत्ता क्रांती करू इच्छिणाऱ्या बोल्शेव्हिक पक्षाच्या हाती ' असा आता पुकारा व्हायला हवा, विद्यमान पेट्रोग्राड सोव्हिएटने बोल्शेव्हिक क्रांतीला विरोध केला असल्यामुळे

हे सोव्हिएट नष्ट करून त्या जागी ' विशुद्ध ' सोव्हिएटस् निर्माण करावयास हवीत, असे त्याचे प्रतिपादन होते. विशुद्ध सोव्हिएटची लेनिनची कल्पनाही स्पष्ट होती. ज्या सोव्हिएटमध्ये केवळ बोल्शेव्हिक प्रतिनिधी आहेत ते विशुद्ध समजायला हरकत नाही असे तो मानत असे. त्याचा मुख्य राग होता तो मेन्शेव्हिक आणि सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी या दोन पक्षांवर. त्यामुळे या दोन पक्षांना विशुद्ध सोव्हिएटमध्ये थारा मिळता कामा नये हे तो अट्टाहासाने सांगत असे.

लेनिनचा अज्ञातवास सुरू असताना सर्वसामान्य बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांची मात्र खूपच पंचाईत झाली होती. कारण लोक त्यांच्या तोंडावर शिव्या मोजत होते आणि या लोकांना गप्प कसे करावे हे या कार्यकर्त्यांना उमगत नव्हते. त्यांना असे वाटे की लेनिनने अज्ञातवासातून बाहेर येऊन या आरोपांचा समाचार घ्यावा. मग त्यापायी त्यास शिक्षा भोगावी लागली तरी हरकत नाही. जरी लेनिनवर हंगामी सरकारने खटला भरला तरी ते त्याला कोणत्याही परिस्थितीत फाशीची शिक्षा सुनावू शकत नाही याबद्दल या कार्यकर्त्यांची खात्री होती. त्यामुळेच ते म्हणत, ' लेनिनने कारावासाला न घाबरता बाहेर यावे आणि आमची नामुष्की थांबवावी.'

कार्यकर्त्यांचे मनोगत लेनिनपर्यंत येऊन पोचत होते. अलील्युएव्ह नावाच्या कामगाराच्या घरी तो राहत असताना क्रपस्काया आणि मारिआ इलिनिचना या दोघी त्याला भेटावयास आल्या होत्या. या वेळी झिनोव्हेवही लेनिनबरोबरच राहत होता. बोल्शेव्हिक कार्यकर्ते आपल्यासंबंधी काय बोलत आहेत हे क्रपस्कायाने सांगितल्यानंतर लेनिन तत्काळ म्हणाला, ' ठीक आहे. मी न्यायालयात हजर व्हायला तयार आहे. '

लेनिनने आपण होऊन पोलिसांच्या स्वाधीन व्हावे की नाही या प्रश्नावर चर्चा सुरू झाली. तसे करणे धोक्याचे ठरेल असे कोणीतरी म्हणताच लेनिन खवळून उठला आणि म्हणाला, ' आता तसं करण्यावाचून अन्य पर्याय नाही. '

एवढे बोलूनच तो थांबला नाही. आपण कोणत्या अटींवर पेट्रोग्राड सोव्हिएटच्या स्वाधीन व्हायला तयार आहोत यासंबंधीचा निरोपही त्याने आपल्या दोन दूतांकरवी सोव्हिएटकडे धाडला. क्रपस्काया घरी जाण्यासाठी उठू लागली तेव्हा लेनिन तिला म्हणाला, ' जाताना कामेनेव्हला माझा हा निर्णय कळव. '

लेनिनच्या निर्धारात बदल होणे शक्य नाही हे माहीत असल्यामुळे क्रपस्काया त्याच्याशी वादविवाद करण्याच्या भानगडीत पडली नाही. काहीच न बोलता ती तेथून बाहेर जाऊ लागताच लेनिनने भावनावेगाने तिचे दोन्ही दंड धरीत म्हटले, ' कदाचित आपली ही शेवटचीच भेट ठरण्याचा संभव आहे.'

चटकन भावनाविवश होणे लेनिनच्या स्वभावात नव्हते. परंतु या वेळी क्रपस्कायाचा निरोप घेताना मात्र त्याचा आवाज कातर झाला होता, डोळे पाणावलेले

होते. कारण आपल्या या निर्णयापायी आपल्याला कोणती किंमत द्यावी लागणार आहे हे त्याला माहीत होते. जर आपण शत्रूच्या हाती स्वाधीन झालो तर त्याच्याकडून दयेची अपेक्षा करण्याचा आपल्याला अधिकार नाही हे तो जाणून होता. आतापर्यंत त्यानेही कोणास दया दाखविली नव्हती आणि स्वत:साठी दयेची भीक मागणेही त्याला मंजूर नव्हते.

लेनिनने क्रुपस्कायाला किती तरी वेळ आपल्या बाहुपाशात धरले होते. शेवटी क्रुपस्कायाच भानावर आली. लेनिनची मिठी सोडवीत जड अंत:करणाने ती तेथून बाहेर पडली. क्रुपस्काया गेल्यानंतर पुन्हा लेनिनचा निर्णयासंबंधी विचारविनिमय सुरू झाला. लेनिनच्या संपूर्ण सुरक्षिततेची हमी मिळाल्याशिवाय त्याने सोव्हिएतच्या स्वाधीन होऊ नये असेच बहुतेक कार्यकर्त्यांचे मत होते. एवढ्यात सोव्हिएटकडे गेलेले ते दोघे दूत परतले. ते म्हणाले, ' कॉमरेड, तुमच्या संपूर्ण सुरक्षिततेची हमी देणे आपल्याला अशक्य आहे असे आम्हांला सांगण्यात आले. सोव्हिएटने एवढेच आश्वासन दिले आहे की तुमच्यावर रीतसर खटला भरण्याची व्यवस्था केली जाईल. तडकाफडकी कोणताही निर्णय केला जाणार नाही.'

या दोघा दूतांपैकी ओर्दोनिकिड्झ, ॲनिसिकोव्ह या पेट्रोग्राड सोव्हिएतच्या प्रमुख सदस्यांशी चांगलाच भांडला होता. ओर्दोनिकिड्झ त्याला म्हणाला होता, 'तुम्ही जर लेनिनच्या जिवाला अपाय केलात तर काय परिणाम होतील हे माहीत आहे ना ? आम्ही तुम्हा सर्वांना ठार करू.'

ॲनिसिकोव्हबरोबर झालेले सारे बोलणे ओर्दोनिकिड्झ याने सांगितल्यानंतर लेनिनने सोव्हिएटच्या स्वाधीन होणे पक्षहिताच्या दृष्टीने घातक ठरेल असे सर्वांचे मत पडले व त्यामुळे त्याने लेनिनला या निर्णयापासून परावृत्त केले. त्याने तूर्त अज्ञातवासातच राहणे इष्ट आहे असे सर्वानुमते ठरले. परंतु पेट्रोग्राडमध्ये राहणे धोक्याचे ठरणार असल्यामुळे लेनिनने एखाद्या खेड्यात जाऊन राहावे असे ओर्दोनिकिड्झ याने सुचविले. लेनिनला लपवून ठेवण्याची जबाबदारी रँझलिव्ह खेड्यात राहणाऱ्या एमेलिआनोव्हवर सोपविण्यात आली. त्यानुसार लेनिन आणि झिनोव्हेव रात्रीच्या वेळी पेट्रोग्राडजवळच्या सेस्ट्रोरेट्स्क स्टेशनावर येऊन पोचले. एमेलिआनोव्ह अगोदरच तेथे आला होता. रात्री दोन वाजता सेस्ट्रोरेट्स्क स्टेशनवरून गाडी हलताच त्या तिघांनी शेवटच्या मालडब्यात उडी मारली. लेनिन तर डब्याच्या पायरीवरच पाय पसरून बसला होता.

एमेलिआनोव्ह म्हणाला, ' तुम्ही कदाचित पडाल बरं.'

त्याच्या खांद्यावर हात ठेवत लेनिन उत्तरला, ' मित्रा, ते मला माहीत आहे. पडलो तर धावत्या आगगाडीतून उडी मारण्यासही मी कमी करणार नाही.'

परंतु तशी उडी मारण्याची वेळ आली नाही. पहाटे चारच्या सुमारास ते तिघे रँझलिव्ह स्टेशनावर उतरून सुखरूपपणे एमेलिआनोव्हच्या घरी जाऊन पोचले. येथे येताच पोलिसांनी आपल्याला ओळखू नये म्हणून लेनिनने आपली दाढी काढून टाकली आणि टक्कल झाकण्यासाठी डोक्यावर टोपी चढविली. एमेलिआनोव्हच्या झोपडीवजा घराच्या पहिल्या मजल्यावर लेनिन आणि झिनोव्हेव राहू लागले. दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रांत पहिल्या पानावर एक बातमी ठळक रीतीने प्रसिद्ध झाली होती– ' लेनिन आणि झिनोव्हेव यांचे जर्मनीत गुप्त पलायन. '

एमेलिआनोव्हने या दोघांच्या राहण्याची व्यवस्था चांगली केली असली तरी त्याच्याकडे गावकऱ्यांची सारखी वर्दळ असावयाची. त्यामुळे या लहानशा घरात फार काळ लपून राहता येणे लेनिनला अशक्य वाटू लागले. म्हणून त्याने रँझलिव्ह-लगतच्या जंगलात आपल्यासाठी झोपडी बांधण्याची एमेलिआनोव्हला सूचना दिली. दोन दिवसांनी लेनिन आणि झिनोव्हेव त्या झोपडीत राहावयास गेले. पेट्रोग्राडमधून येणारे बोल्शेव्हिक कार्यकर्ते प्रथम एमेलिआनोव्हच्या घरी येत आणि अंधार पडला की ते एमेलिआनोव्हबरोबर लेनिनच्या भेटीसाठी जंगलात जात. अज्ञातवासाच्या दृष्टीने लेनिनला ही जागा फारच सोयीची वाटली. जंगलात फारशी वर्दळ नसल्या-मुळे त्याला लिखाणासाठी निवांतपणा मिळे. लेनिनचे वैशिष्टय असे, की त्याने या छोटया खोपटातही आपली वेगळी अभ्यासिका उभारली होती. पेट्रोग्राडहून येणारी वृत्तपत्रे वाचण्यासाठी आणि 'प्रावदा'चे लिखाण करण्यासाठी लेनिनचा बराचसा वेळ या अभ्यासिकेतच जाई. अभ्यासिकेत तो वाचत वा लिहीत असला की तेथे जाण्याची कोणालाही परवानगी नसे. लेनिन जर्मन पाणबुडीत बसून रशिया-बाहेर कसा पळाला, याची सुरस वर्णने पेट्रोग्राडमधल्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत होती. ती वाचताना लेनिन खळखळून हसे आणि म्हणे, ' काय मूर्खांचा बाजार आहे हा ! दररोज बिचारे नवा शोध लावत आहेत.'

लेनिन आणि झिनोव्हेव या झोपडीत तीन आठवडे राहिले. एकदा सकाळी काही काम नव्हते म्हणून झिनोव्हेव खांद्यावर बंदूक टाकून शिकारीसाठी जंगलात हिंडत असताना तेथील अधिकाऱ्याने त्याला हटकले. पळून जाण्याइतकीही झिनो-व्हेवला सवड राहिली नव्हती. त्यामुळे तो तेथेच थांबला. अधिकाऱ्याने प्रश्नांची सरबत्ती सुरू केली– ' तू कुठला राहणारा ? इथं आलास कशासाठी ? ' आपण प्रश्नांना उत्तरे देण्याच्या भानगडीत पडलो तर नसतीच आफत यायची या विचा-राने झिनोव्हेवने मुक्याचे सोंग घेतले. अधिकारी दरडावून विचारीत होता आणि हा हातवारे करून काहीतरी सांगत होता. या मूर्खाच्या नादी लागण्यात अर्थ नाही असे म्हणून त्या अधिकाऱ्याने झिनोव्हेवच्या हातातील बंदूक हिसकावून घेतली आणि पुन्हा येथे येऊ नकोस असे बजावले. झिनोव्हेवने हा सारा प्रकार सांगितल्या-

नंतर त्या अधिकाऱ्याला काही संशय आलेला नाही ना याची खात्री करू घेण्यासाठी एमेलिआनोव्हला लेनिनने त्या अधिकाऱ्याकडे पिटाळले. परंतु मघाचा मुका गृहस्थ त्या अधिकाऱ्याच्या स्मरणातही राहिलेला नाही हे पाहून एमेलिआनोव्हला हायसे वाटले.

एकदा ओर्दोनिकिड्झ् लेनिनला भेटण्यासाठी जंगलात आला होता. थोडे अंतर चालून गेल्यानंतर आपल्या पाठीमागून कोणीतरी येत असल्याची त्याला चाहूल लागली. ओर्दोनिकिड्झ्ने त्या बुटक्या जाडसर माणसाकडे एकवार पाहिले आणि त्याच्या अस्तित्वाची दखल न घेताच तो झपाझप पावले टाकू लागला. तेवढ्यात त्या व्यक्तीने विचारले, ' ओर्दोनिकडिझ्, अरे मला ओळखलं नाहीस का ? '

तो लेनिन होता. दाढी काढल्यामुळे लेनिनचा चेहरा इतका बदलला होता की ओर्दोनिकिडझ्सारखे निकटवर्ती सहकारीही त्याला चटकन ओळखू शकत नव्हते. तरीही या जंगलात फार काळ राहणे लेनिनला आता धोकादायक वाटू लागले होते. फिनलंडमध्ये पोचल्याशिवाय आपल्याला बिनघोर राहता येणार नाही हे ओळखून फिनलंडला जाण्याचे विचार त्याच्या डोक्यात घोळू लागले. परंतु त्यासाठी प्रथम पासपोर्ट पैदा करणे आवश्यक होते. लेनिनने कोन्स्टॅन्टीन पेट्रोव्हिच इव्हानोव्ह या नावाने पासपोर्टसाठी अर्ज केला. या अर्जासोबत धाडण्यासाठी त्याने आपला नव्या वेशातील फोटोही काढून घेतला. त्यासाठी त्याने डोक्यावर केसांचा टोप चढवून त्यावर कामगार वापरतात तशी टोपीही चढविली होती. त्याची ती प्रसिद्ध दाढी यापूर्वीच अंतर्धान पावली होती. दाढी ठेवण्याची लेनिनची तऱ्हाही एकाच पद्धतीची नव्हती. गेल्या काही वर्षांमध्ये त्याने आपल्या दाढीला निरनिराळ्या प्रकारची वीस वळणे दिली होती. या दाढीमुळेच त्याच्या व्यक्तित्वाला एक प्रकारचे वेगळेपण लाभले होते. लेनिन हा आपल्यापैकी एक नव्हे, आपल्यापेक्षा तो वरच्या वर्गातला आहे अशी जी लेनिनसंबंधी कामगारांची प्रारंभापासून भावना झाली होती, त्याला ही दाढीही काही अंशी कारणीभूत होती. स्वत: लेनिनही वेगळेपणाची भावना सदैव काळजीपूर्वक जपत असे. सर्वसामान्य कामगारांची वा पक्ष-कार्यकर्त्यांची गोष्ट तर सोडाच पण झिनोव्हेवसारख्या विश्वासू सहकाऱ्यालादेखील तो आपल्या फार जवळ येऊ देत नसे. आपल्यामध्ये आणि इतरांमध्ये बरेच अंतर आहे असे तो मानीत असे आणि त्याप्रमाणेच वागत असे. रॅझलिव्हलगतच्या जंगलातील खोपटातही त्याने आपली स्वतंत्र अभ्यासिका उभारून झिनोव्हेवलाही तेथे पाऊल ठेवायला मना केली होती.

नव्या रूपातला लेनिन थेट एखाद्या कामगारासारखा दिसत असे. त्यामुळे हे नवे रूप आपल्याला फिनलंडमध्ये सुखरूप घेऊन जाईल यासंबंधी त्याला खात्री होती. तरीदेखील शक्य तेवढी दक्षता बाळगणे आवश्यक होते. लेनिनला फिनलंडला पोचविण्याची जबाबदारी ओर्दोनिकिडझ् याने स्वीकारली होती.

ही सारी गडबड चालू असतानाही लेनिनचे सारे लक्ष पेट्रोग्राडमधल्या घडामोडींवर खिळलेले असावयाचे. अशाच एकदा गप्पा चालू असताना तो झिनोव्हेवला म्हणाला, ' मेन्शेव्हिक पक्ष गेल्या काही दिवसांत बराच बदनाम झाला आहे. दोन आठवड्यांपूर्वी अशी परिस्थिती होती की त्यांनी मनात आणले असते तर ते सत्ता सहज हस्तगत करू शकले असते. परंतु त्यांनी ती संधी घालविली आहे. सत्ता आता त्यांच्यापासून कायमची दूर गेली आहे. आता आपण पुन्हा सशस्त्र उठाव केला तर हमखास यशस्वी होऊ. आणि हा काळही काही फार दूर नाही. येत्या सप्टेंबर-ऑक्टोबरमध्येच आपण क्रांती घडवून आणू शकू असा माझा विश्वास आहे. '

**अतिशय विपरीत परिस्थितीत जीवन कंठावे लागत असतानाही लेनिनचा आत्मविश्वास अबाधित आहे हे पाहून झिनोव्हेव आश्चर्याने थक्क झाला. एक महिन्यापूर्वीच लेनिनच्या पदरी जबरदस्त अपयश आले होते. त्या अपयशापायीच त्याच्या नशिबी अज्ञातवास आला होता आणि अशा परिस्थितीत लेनिन शांतपणाने पण तितक्याच विश्वासाने सांगत होता, ' मित्रांनो, मी सांगतो तसेच घडणार आहे. येत्या एक–दोन महिन्यांच्या आतच मी रशियाचा सर्वसत्ताधीश होणार आहे. '**

फिनलंडमध्ये जाण्यासाठी आणि तेथून क्रांतीचे मार्गदर्शन करण्यासाठी लेनिन इतका उत्सुक झाला होता की एके दिवशी तो पायीच प्रवासासाठी निघाला रँझलिव्हपासून फिनिश प्रदेश काही फारसा दूर नव्हता. परंतु सीमारेषेवर पासपोर्टची कसून चौकशी करण्यात येत आहे हे कळल्यानंतर तो अर्ध्या वाटेवरून मागे फिरला. शेवटी फायरमनचा वेश करून लेनिनने आगगाडीच्या एंजिनमध्ये बसावे म्हणजे त्याला विनासायास फिनलंडला जाता येईल असे सुचविण्यात आले. या कामी ह्युगो यालावा या फिनिश रेल्वेमध्ये काम करणाऱ्या इंजिनियरने मदत करण्यास मान्यता दिली. २२ ऑगस्टच्या रात्री पेट्रोग्राडहून सुटणारी गाडी लेनिनने लेवाशोवो स्टेशनवर गाठावी असे यालावाने सांगितले. रँझलिव्हपासून लेवाशोवो आठ मैल दूर होते. संध्याकाळ होताच लेनिन, झिनोव्हेव, एमेलिआनोव्ह व शॉटमन हे चौघेजण लेवाशोवोला जाण्यासाठी पायी निघाले. त्यांनी जंगलातून जाणारी जवळची वाट पकडली. परंतु थोडे अंतर चालून गेल्यानंतर आपण लेवाशोवोचा रस्ता चुकलो असल्याचे त्यांच्या ध्यानी आले. परंतु वेळ थोडा असल्यामुळे मागे येऊन दुसऱ्या वाटेने जाणेही शक्य नव्हते. अखेरीस जंगलातून कसाबसा मार्ग काढीत ते चौघेजण रात्री एक वाजता लेवाशोवो येथे येऊन पोचले. पेट्रोग्राडहून येणारी गाडी लेवाशोवो येथे पोचावयास फारसा अवकाश नव्हता. तरीही सावधगिरी बाळगण्यासाठी स्टेशनवर लष्करी पहारा आहे की नाही याचा अंदाज घेण्यासाठी लेनिनने शॉटमन व एमेलिआनोव्ह यांना पुढे धाडले व तो स्वतः आणि झिनोव्हेव स्टेशनलगतच्या आडोशापाशी थांबले.

एमेलिआनोव्ह व शॉटमन स्टेशनच्या आवारातून आत जाताच तेथल्या अधिकाऱ्याने त्यांना हटकले. पहिल्यांदा शॉटमनची झडती घेण्यात आली. त्याच्याजवळ आक्षेपार्ह असे काहीच न सापडल्यामुळे त्याला प्लॅटफॉर्मवर जाण्याची परवानगी देण्यात आली. यानंतर एमेलिआनोव्हची तपासणी सुरू झाली. सेस्ट्रोरेट्स्क येथील एका कारखान्यात आपण नोकरी करीत असल्याची एमेलिआनोव्हने बतावणी केली.

तपासणी अधिकाऱ्याने विचारले, ' तू तिथं किती वर्षं काम करतो आहेस ?'

' गेली तीस वर्षं. '

' तिथं फोरमन कोण आहे ?'

एमेलिआनोव्हने बरोबर नाव सांगितले.

' बरं, तेथल्या डॉक्टरचं नाव सांग पाहू. '

' ग्रेच. तो एक महामूर्ख डॉक्टर आहे, ' एमेलिआनोव्हने अधिकाऱ्याचा विश्वास संपादन करण्यासाठी खास माहिती पुरविली.

' असं होय ? ते माझे काका आहेत. '

एमेलिआनोव्ह दिलगिरीच्या स्वरांत म्हणाला, ' ते मला माहीत नव्हतं. '

या अधिकाऱ्याशी गप्पा मारताना जास्तीत जास्त वेळ काढण्याचा एमेलिआनोव्हचा प्रयत्न होता. त्याची अशी इच्छा होती की या अधिकाऱ्याशी आपण गप्पा मारीत बसत असल्याची संधी साधून लेनिन आणि झिनोव्हेव यांनी लपत छपत प्लॅटफॉर्मवर जाऊन बसावे. लेनिनला एवढी सवड मिळावी म्हणून एमेलिआनोव्ह त्या लष्करी अधिकाऱ्याशी मुद्दामच राजकारणासंबंधी बोलू लागला. गप्पांच्या ओघात त्या अधिकाऱ्याने विचारले, ' बोल्शेव्हिक पक्षाविषयी तुझं काय मत आहे ? '

' त्या पक्षात बरेच चांगले कार्यकर्ते आहेत असं मी ऐकलं आहे. '

' तू त्या पक्षाचं काम करतोस काय ?'

' नाही. '

' तू बोल्शेव्हिक आहेस असं जर आम्हांला आढळून आलं असतं तर आम्ही काय केलं असतं हे तुला माहीत आहे का ? तुला गोळ्या घालून ठार केलं असतं. '

पेट्रोग्राडहून आलेली गाडी सुटण्याची वेळ झाली तेव्हा कोठे एमेलिआनोव्हची सुटका झाली. घाईघाईने त्याने शेवटचा डबा पकडला. लेनिन आणि झिनोव्हेव तेथे अगोदरच येऊन बसल्याचे दिसताच एमेलिआनोव्हने सुटकेचा नि:श्वास टाकला. गाडी पुढच्या स्टेशनवर थांबताच लेनिन एंजिनमध्ये जाऊन फायरमनचे काम करू लागला. ' हा एक शिकाऊ कामगार आहे. याला कामाची नीट माहिती द्या, ' असे यालावाने फायरमनना अगोदरच सांगून ठेवले असल्यामुळे सारे काम बिनबोभाट पार पडले. बेलोओस्ट्रोव्ह या रशिया आणि फिनलंड यांच्या सीमेवरील स्टेशनमध्ये गाडी पोचताच प्रवाशांप्रमाणे रेल्वे कर्मचाऱ्यांजवळच्या कागदपत्रांचीही तपासणी

केली जात असे. या तपासणीतून लेनिनची कशी काय सुटका करायची याचाच यालावा विचार करीत होता. गाडी बेलोओस्ट्रोव्ह स्टेशनात थांबताच यालावाने एंजिन गाडीपासून दूर करून पाणी भरण्यासाठी पुढे नेलें व तो गाडी सुटण्याची वेळ होईपर्यंत वाट पाहत बसला. गाडी सुटण्याची घंटा होताच त्याने घाईघाईने एंजिन मागे आणून गाडीला जोडले व पुढचा प्रवास ताबडतोब सुरू केला. एंजिनमधील कर्मचाऱ्यांच्या कागदपत्रांची तपासणी करण्याइतका सैनिकांना वेळ मिळू नये यासाठी यालावाने ही युक्ती योजिली होती.

अखेर लेनिन सुखरूपपणे फिनलंडमध्ये येऊन पोचला होता.

ठरल्याप्रमाणे लेनिन यालकाला या खेड्यात राहावयास गेला. किनारपट्टीवर एका बाजूला असलेले हे खेडे राहण्याच्या दृष्टीने सुरक्षित असले तरी तेथे पेट्रोग्राड-मधील बातम्या कळत नव्हत्या. त्यामुळे लेनिन पुन्हा अस्वस्थ झाला आणि आठवडा-भरातच तो यालकाला येथून होलिंसगफोर्स या राजधानीच्या शहरी येऊन दाखल झाला. पेट्रोग्राडची वृत्तपत्रे तेथे संध्याकाळपर्यंत येऊन पोचत असत. ही वर्तमानपत्रे हाती येईपर्यंत, सकाळ–दुपारच्या वेळात लेनिनने ' दि स्टेट अँड रेव्होल्युशन ' या आपल्या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे लेखन चालू ठेवले. शासनसंस्थेच्या विनाशाचे आपले लाडके स्वप्न लेनिनने या ग्रंथात विस्ताराने रंगविले आहे. समाजवादी क्रांती झाल्यानंतर प्रथम काही काळ कामगारांची हुकूमशाही निर्माण व्हायला हवी आणि कालांतराने शासन-यंत्रणेचा लोप होऊन शासनरहित समाजव्यवस्था अवतरली पाहिजे असे या ग्रंथाचे मुख्य सूत्र आहे. परंतु या सूत्राचा विस्तार करताना लेनिनने शासनविरहित समाज-व्यवस्थेपेक्षा शासनयंत्रणेच्या विनाशावरच अधिक भर दिलेला आहे. शासनविरहित विमुक्त समाजव्यवस्था कधी काळी अवतरेल की नाही यासंबंधी लेनिनची खात्री नव्हती. परंतु विद्यमान शासनयंत्रणा नष्ट झालीच पाहिजे याबद्दल मात्र तो कमालीचा आग्रही होता. हा आग्रह व्यक्त करताना जणू काही त्याच्या अंगात नेचॅयेव्हच संचारलेला दिसतो. एके ठिकाणी लेनिन लिहितो : ' प्रथम सर्व काही नष्ट केले पाहिजे. त्यानंतर काय निर्माण करायचे याची जबाबदारी आपण भविष्य-काळावरच सोपवू या. '

' दि स्टेट अँड रेव्होल्युशन ' या ग्रंथात लेनिनने वारंवार असे प्रतिपादन केले आहे की शासनयंत्रणा हस्तगत करणे हेच केवळ समाजवादी कामगार–क्रांतीचे मुख्य उद्दिष्ट नसून ती शासनयंत्रणा मुळासकट उपटून टाकण्यावरच क्रांतिकारकांनी आपले लक्ष केंद्रित केले पाहिजे. शासनसंस्थेचा लोप ही कल्पना लेनिनने एंगल्सच्या ' अँटी–ड्यूरिंग ' या ग्रंथातून घेतली आहे. साम्यवादी अर्थव्यवस्थेत कोणाचीही पिळवणूक होणार नसल्यामुळे साम्यवादी समाजरचनेत शासनसंस्थेची गरजच उर-णार नाही अशी यामागची कारणमीमांसा आहे.

लेनिन हेल्सिंगफोर्स येथे राहत असताना पेट्रोग्राडमधील परिस्थिती झपाट्याने बिघडत चालली होती. युद्ध, चलनफुगवटा आणि आर्थिक उलाढालींना बसलेली खीळ या तीन कारणांमुळे साऱ्या देशाला वैफल्याची धग जाणवू लागली होती. सप्टेंबरच्या प्रारंभी जनरल कोर्निलोव्ह याने लष्करी उठावाचा प्रयत्न केल्यापासून तर मूळ गोंधळात आणखी भर पडली होती. केरेन्स्कीने सारी सत्ता आपल्या हाती घेऊन एकतंत्री राज्यकारभार करण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु झारशाही उडवून लावणारी जनता आता केरेन्स्कीपुढे नमण्यास तयार नव्हती. केरेन्स्कीचे हुकूम कधी पाळले जात तर कधी त्यांची उघड उपेक्षा केली जाई. कोणत्याच क्षेत्रात शिस्त नावाची चीज उरलीच नव्हती. रशियात कोणाची सत्ता आहे हेच कळत नव्हते.

जुलैमधल्या उठावानंतर अटक करण्यात आलेल्या ट्रॉटस्कीची सप्टेंबरमध्ये सुटका करण्यात आली. तेव्हापासून केरेन्स्कीचा जबरदस्त प्रतिस्पर्धी म्हणून ट्रॉटस्कीचा उल्लेख होत होता. हळूहळू कामगार वर्ग बोल्शेव्हिक पक्षाकडे आशेने पाहू लागला. हे मुख्य हंगामी सरकार उलथून पाडण्यासाठी बोल्शेव्हिकांनी आता पुन्हा उठाव केला पाहिजे असे लोक म्हणू लागले. लेनिन तर याच घटनेची वाट पाहत होता. त्यामुळे त्याने 'प्रावदा'मधून हंगामी सरकारवर जोरदार हल्ले चढविण्याचा तडाखाच सुरू केला. हेल्सिंगफोर्स येथून आपल्या सहकाऱ्यांना धाडलेल्या पत्रात लेनिनचे एकच सांगणे असे– 'मित्रांनो, आता थांबू नका. गेल्या काही वर्षांतील हादऱ्यामुळे सारा देश थकला आहे. केरेन्स्कीचीही पुरी दमछाक झालेली आहे. केरेन्स्की आणि कोर्निलोव्ह यांनी एकजूट केली असती तर कदाचित या वर्षअखेरपर्यंत हे सरकार कसेबसे टिकले असते. परंतु आता राज्ययंत्र इतके खिळखिळे झाले आहे की ते खाली पाडण्यासाठी केवळ आपल्या एका धक्क्याचीच गरज आहे.'

**२५ सप्टेंबर रोजी धाडलेल्या एका पत्रात लेनिन लिहितो– 'आता जर आपण सत्ता हस्तगत केली नाही तर इतिहास आपल्याला क्षमा करणार नाही. ताबडतोब मॉस्को आणि पेट्रोग्राड येथील सत्ताकेंद्रे ताब्यात घ्या. या वेळी आपण विजयी होणार याबद्दल मला शंभर टक्के खात्री आहे. आता विजय आपलाच आहे. केवळ आपलाच आहे.**

क्रांती आता काही दिवसावर येऊन ठेपली आहे याबद्दल लेनिनला मुळीच शंका उरलेली नव्हती. अशा वेळी आपण पेट्रोग्राडपासून दूर राहणे इष्ट होणार नाही हे त्याला ठाऊक होते. परंतु त्याबरोबरच पेट्रोग्राडमध्ये आपण आताच प्रवेश करणे धोक्याचे ठरेल याचेही त्याला भान होते. क्रांतीसाठी आसुसलेला लेनिन ३० सप्टेंबर रोजी व्हायबर्ग येथे येऊन पोचला.

लेनिनच्या अज्ञातवासाचे अखेरचे पर्व सुरू झाले होते. (क्रमशः)




# भारतीय संघाची परदेशी निर्यात ?

भारतीय बॅडमिंटन संस्थेची एक बैठक गेल्या महिन्यात मुंबईत भरली होती. त्या वेळी बॅडमिंटन संस्थेच्या कार्यकारिणीने भारतीय ऑलिंपिक संस्थेच्या कारभारावर एक चांगलाच प्रकाशझोत टाकला. गेल्या डिसेंबर महिन्यात बँकॉकला ज्या आशियाई क्रीडा स्पर्धा भरल्या होत्या त्या वेळी भारताचा बॅडमिंटन संघ कुआलालंपूर येथे ' थॉमस कप 'चे सामने खेळून बँकॉकला उपस्थित राहिला होता. अशा वेळी भारतीय बॅडमिंटनच्या प्रथम श्रेणी संघाला आशियाई स्पर्धेत भाग घ्यायला न सांगता ऑलिंपिक संस्थेने दुय्यम दर्जाचा भारतीय टेनिस संघ तिकडे पाठवून दिला. भारताच्या चीफ्–डी–मिशन यांच्या अहवालानुसार टेनिस संघाने फारच निकृष्ट दर्जाचा खेळ केला.

भारतीय ऑलिंपिक संस्थेने प्रथम असा निर्णय घेतला होता की कुआलालंपूरहून भारतीय बॅडमिंटन संघ जेव्हा परतला तेव्हा त्या संघाने बँकॉकला थांबावयाचे आणि आशियाई स्पर्धांत भाग घ्यावयाचा. आणि ज्या वेळी बॅडमिंटन संघ प्रत्यक्ष कुआलालंपूर येथे खेळत होता तेव्हा ऑलिंपिक संस्थेने आपण पहिला निर्णय फिरविला आणि टेनिसचा दुसरा संघ बँकॉकला जाण्यास मुभा दिली.

भारतीय ऑलिंपिक संस्थेस बॅडमिंटन संघाचा कार्यक्रम जर निश्चित माहीत होता तर त्यांनी घाईने असा निर्णय का घेतला ? वस्तुत: ऑलिंपिक संस्थेला परदेशी चलनाच्या चणचणीची पूर्ण कल्पना होती. बँकॉकला भारतीय पथक पाठवावयाचे की नाही येथपासून सुरुवात होऊन १०५ ऐवजी ८१ खेळाडूंना भारत सरकारने प्रथम परदेशी हुंडणावळ मान्य केली. तेव्हा ऑलिंपिक संस्थेचे अध्यक्ष श्री. भालिंदर सिंग यांनी प्रतिष्ठेचा प्रश्न करून आमचा संघ आशियाई स्पर्धांत भाग घेणारच नाही असे फर्मान काढले. मग पंतप्रधानांनी या सर्व प्रकारात लक्ष घालून १०५ खेळाडूंना परदेशी चलन उपलब्ध करून देण्यास स्वतःचे वजन खर्ची घातले. अशी विकट परिस्थिती असताना ऑलिंपिक संस्थेने निदान तीन–चार टेनिसपटूंचा खर्च वाचवून बॅडमिंटन संघाला बँकॉकला खेळण्यास परवानगी दिली असती तर ते अधिक शहाणपणाचे ठरले असते. ' इंडियन एक्सप्रेस 'चे क्रीडा–संपादक श्री.

सी. एस्. ए. स्वामी यांनी एका भाषणात नुकतेच सांगितले की आंतरराष्ट्रीय क्रीडा-स्पर्धांत भाग घेण्याची हौस भारताने कमी केली पाहिजे. ऊठसूट संघ परदेशी पाठविताना त्याचा दर्जा काय, त्याची खरोखरीच तेथे जाऊन खेळण्याची लायकी आणि गरज आहे काय याचा आपले क्रीडा-संचालक मुळीच विचार करीत नाहीत. म्हणूनच बँकॉकला हजर असूनही बॅडमिंटन संघाला हात हालवीत भारताला माघारी यावे लागले. भारतीय बॅडमिंटन संस्थेने भारतीय ऑलिंपिक संस्थेचा केलेला निषेध म्हणूनच योग्य आणि प्रसंगानुकूल वाटतो. सरकार आणि खाजगी क्रीडा-संस्थांनी एकत्र येऊन आणि पूर्ण विचार करूनच यापुढे तडजोडीचे मार्ग शोधून काढले पाहिजेत. नाहीतर आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खाते. असलेच गैरप्रकार नेहमी आढळून यावयाचे आणि मग प्रसंग घडून गेला की त्याची उत्तरक्रिया करीत बसावयाची वेळ येते.

## ' मी आता संपत आलो '

गेल्या महिन्याच्या सुरुवातीला नव्या दिल्लीत ' डेव्हिस कप ' टेनिसची विभागीय अंतिम फेरी पार पडली आणि त्यात भारताने जपानवर ४-१ सामन्यांचा अभूतपूर्व विजय संपादन केला. भारतातील श्रेष्ठ दर्जाचे टेनिसपटु आणि कर्णधार रामनाथन् कृष्णन् यांनी एकेरी स्पर्धेतून अंग काढून घेतले आणि तसा शेवटपर्यंत पत्ता लागून दिला नाही. ' आधी केले आणि मग सांगितले ' अशी कृष्णन् यांची वृत्ती आहे. वक्तृत्वापेक्षा कर्तृत्व ते अधिक मानतात. " मी आता संपत आलो. आता नवोदित खेळाडूने माझी जागा घ्यावी " अशी सूचित पावले कृष्णन् टाकीत आहेत. भारतीय प्लॉन टेनिस संस्था यापासून काही बोध घेईल अशी अपेक्षा आहे.

अमेरिकेच्या मि. इ डीयरफिल्ड यांनी मद्रासला एक मोठ्या समारंभात कृष्णन्ना हेम्लचे जागतिक विजय-चिन्ह अर्पण केले. आशियातील उत्कृष्ट खेळाडूला ते बहाल करण्यात येते. १९४९ पासून ही ट्रॉफी देण्याची पद्धत सुरू झाली. आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, युरोप, दक्षिण व उत्तर अमेरिकेतील सर्वोत्कृष्ट हौशी खेळाडूंना ती देण्यात येते.

कृष्णन्नी १९४९ सालातील स्टॅन्ले कपपासून १९६७ मधील हेम्ल ट्रॉफीपर्यंत जी अतुलनीय मजल मारली ती केवळ अद्‌भुत आणि प्रत्येक भारतीयाला अभिमानस्पद वाटणारी आहे. एका खेळात सुमारे वीस वर्षे टिकून राहणे यासाठी शरीर आणि मनाची किती उत्तम तयारी ठेवावयास लागत असेल याची कल्पनाच केलेली बरी. त्यांच्याइतका हुशार, लायक आणि अनुभवी असा खेळाडू भारतात सध्यातरी सापडणे दुर्मिळच. त्यातून पुन्हा विनम्र स्वभाव. कृष्णन् यांच्या आज ना उद्या होणाऱ्या निवृत्तीनंतर भारतीय लॉन टेनिस संस्थेने त्यांचा पुरेपूर उपयोग करून घेतला पाहिजे. दुर्दैवाने नव्या राष्ट्रीय खेळाडूंची होणारी ससेहोलपट पाहिली

म्हणजे भारतीय क्रीडा संस्थात आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे असे रामनाथन् कृष्णन् यांच्या निमित्तान नाइलाजाने म्हणावेसे वाटते.

## फुटबॉलची स्थिती

गेल्या महिन्यात कुआलालंपूर येथील मेरडेका फुटबॉल स्पर्धेत भारताचा अकरा आशियाई संघात आठवा क्रमांक लागला. आघाडी फळीतील इंदर सिंग आणि अशोक चतर्जी या दोघा फुटबॉलपटूंखेरीज इतर कुणीही आपल्या सामर्थ्याचे किंवा चपळाईने गोलाभोवती कौशल्याचे चेंडू पिटाळण्याचे कार्य उत्तम प्रकारे बजावले नाही. गतिमान धाव, चेंडूवर चाल करण्याची घडाडी, तो विद्युत्‌वेगाने आणि अचूक लाथाडून प्रतिस्पर्ध्याला प्रतिडाव करण्यास क्षणाचीही उसंत न देणारे खेळावरील प्रभुत्व आणि नव्वद मिनिटे तग धरण्याची तयारी आपल्या खेळाडूंत् कमी पडली. नाही म्हणायला आमच्या फळीचे कार्य उत्तम होते. मलेशिया संघाचे जर्मन शिक्षक मि. डेट्मर क्रॅमर त्यावर इतके खूष झाले की ते स्वयंस्फूर्तीने उद्‌गारले, " तुमचा बचाव मला द्या त्यात माझी आघाडी फळी मिसळून मी आशियात मलेशियाचा संघ सर्वश्रेष्ठ बनवितो. "

शास्त्रशुद्धतेने फुटबॉल खेळण्यात भारतीय खेळाडू तरबेज आहेत. पण कोणत्याही खेळाला केवळ प्राथमिक घडणी उपयोगी ठरत नाही. सतत सराव, शारीरिक तंदुरुस्ती आणि बौद्धिक क्लृप्त्या यांचा जाणीवपूर्वक उपयोग वेळेनुसार करून घ्यावयास लागतो. कलकत्त्यात भारताचा फुटबॉल केंद्रित झाला आहे तेथे आठवड्याला सहा दिवस सामने खेळले जातात. त्या ऐवजी दोन–तीनच खेळले गेले तर भारताच्या उष्ण प्रदेशात खेळाडूंवर शारीरिक ताण न पडता त्यांची प्रकृति उत्तम राहू शकेल. आणि त्यांना आवश्यक ती विश्रांतीही मिळवून देता येईल. त्याचप्रमाणे सामन्यांव्यतिरिक्त वेळ फुटबॉलचा सराव करण्यात आणि शारीरिक सामर्थ्य वाढविण्यासाठी इतर व्यायाम करण्यात घालविता येईल. त्यामुळे सामन्यात जो मानसिक ताण पडत राहतो तो कमी होईल आणि सततच्या सरावाने सामन्याला योग्य ठरणारी शारीरिक कुवत आणि मन:स्थिती तयार होत जाईल.

फुटबॉलचे सामनेसुद्धा वर्षाचे आखून ठेवले पाहिजेत. कारण त्यामुळे खेळाडूला आपल्याला केव्हा खेळावयाचे याची जाणीव असते व त्यच्या पूर्वतयारीला वेळ मिळतो. इतर देश कसे खेळतात यापेक्षा भारतीय खेळाडूंच्या शारीरिक रचनेवरच अधिक अवलंबून राहावयास पाहिजे.

भारतीय फुटबॉल फेडरेशनने आपल्याला संलग्न असलेल्या सर्व राज्य संस्थांचे सहकार्य घेऊन शिक्षण-शिबिरे सुरू करणे आणि त्यांच्याकरवी जिल्हा पातळीवरील फुटबॉल स्पर्धा कार्यक्षमतेने भरविणे हा कार्यक्रम त्वरित हाती घेणे जरूर आहे.

— मनोहर रेगे

# गंमतीच्या टेंबुड्या

सुधाकर राजे

## □ ऋषी-मुनींसाठी चहाचे दुकान

कधी कधी ऑफिसात साहेबाने फारच छळले की मला वाटते यापेक्षा नोकरीवर लाथ मारून हिमालयात निघून जावे. तणतणत घरी येऊन हा विचार आमच्या हिच्यासमोर बोलून दाखविला की अनार्य स्त्रीप्रमाणे प्रत्यक्ष पतिदेवासमोर फिदी-फिदी हसून ती म्हणते, " खरंच, हिमालयात म्हणे बरेच ऋषि-मुनी राहतात, त्यांच्यासाठी चहाचे दुकान काढा ! " काय हा पाखंडीपणा ! हिमालयात ईश्वर-चिंतनासाठी किंवा मोक्षप्राप्तीसाठी जायचे की, चहाचे दुकान चालवायला जायचे? आता हेच पाहा, दिवसाला लाखो रुपये मिळविणारे बीटल्स ईश्वरचिंतनासाठी हिमालयात येऊन राहणार आहेत, ही बातमी एव्हाना जगभर गाजली आहे. त्यांच्या जोडीला सुप्रसिद्ध अमेरिकन नट फ्रँक सिनाट्रा यांची तरुण बायकोदेखील चिंतन-मनन करण्यासाठी हिमालयात राहायला येणार आहे म्हणे ! म्हणजे हिमालय आता जरा निराळ्या अर्थाने टूरिस्ट अ‍ॅट्रॅक्शन होऊ लागला आहे म्हणायचा. पाश्चिमात्य प्रवाशांना आवडणारी बरीच ठिकाणे हिंदुस्थानात आहेत, त्यांत आता पाश्चिमात्य परलोक-प्रवाशांना आवडणाऱ्या हिमालयाची भर पडली.

दिल्लीला अशोक हॉटेलात उतरलेले बीटल्स हिमालयात एका आश्रमात राहणार आहेत असे कळते, पण सौ. सिनाट्रा ही अमेरिकन चित्र-चंद्रिका कोठे उतरणार आहे हे मात्र अजून कळलेले नाही. पण हिंदुस्थानात येऊन ईश्वरप्राप्ती करून घेण्याची फॅशन पाश्चिमात्य मंडळींत मास स्केलवर बोकाळली तर भारत सरकारच्या टूरिस्ट ब्यूरोला स्वतःचे आश्रम बांधायची पाळी यायची. अर्थात् प्रत्येक उन्हाळ्याच्या सुटीत मोक्षप्राप्तीत आरामशीर वेळ घालवावा असे श्रीमंत पाश्चिमात्य प्रवाशांना करायला लावण्याइतक्या आधुनिक सुखसोयी या आश्रमातून ठेवाव्या लागतील हे सांगायला नकोच. उदाहरणार्थ, इम्पोर्टेड व्याघ्राजिन, प्लास्टिकचा कमंडलू, कल्चर्ड मोत्यांच्या रुद्राक्षमाळा, पर्फ्युम्ड भस्म, टेरिलिनची कफनी, फोम रबरच्या खडावा इत्यादी सोयी तर ठेवाव्या लागतीलच, पण फावल्या वेळच्या वाचनासाठी जेम्स बाँडबरोबरच " मोक्षप्राप्तीचा शॉर्टकट, " " ए टूरिस्ट गाइड टु हेवन, " " सॉल्व्हेशन विदाउट टिअर्स " इत्यादी पुस्तकांचा संग्रह, श्रवणभक्तीसाठी भगवद्गीतेची स्वतः अर्जुनाने घेतलेली टेपरेकॉर्ड, करमणुकीसाठी भरतमिलाप,

सीतास्वयंवर, कृष्णार्जुनयुद्ध इत्यादी हिंदी चित्रपट, आणि मुख्य म्हणजे या चित्र-पटांतून नेहमी देवतेचे काम करणाऱ्या पण एरव्ही जीन घालणाऱ्या निरुपा रॉयशी देवादिकांच्या गप्पागोष्टी करण्याची स्पेशल संधी, या गोष्टीही सामील कराव्या लागतील. एवढ्या सोयी झाल्यावर मात्र 'व्हाया' हिमालय स्वर्गाला जाणाऱ्या टूरिस्टांची ही झुंबड लागेल—अन् मग हिमालयात चहाचे दुकान घातले तर खरोखरीच फायदा होऊ शकेल.

## □ राष्ट्रीय दात

एका ऑस्ट्रेलियन पत्रकाराने आपल्या देशबांधवांना अशी सूचना केली आहे की ऑस्ट्रेलियन पंतप्रधान हॅरोल्ड होल्ट यांचे दात राष्ट्रीय स्मारक असल्याचे जाहीर करण्यात यावे. या पत्रकाराचा आपल्या पंतप्रधानांवर विशेष दात आहे की काय हे सांगता येत नाही, पण सीलोनमध्ये बुद्धाच्या दाताचे देऊळ आहे, तेव्हा ऑस्ट्रेलियात होल्टच्या दातांचे स्मारक असायला तशी हरकत नाही. मला वाटते हा पत्रकार हिंदुस्थानात आला तर असल्या अनेक गोष्टी येथली राष्ट्रीय स्मारके व्हायला योग्य असल्याचे त्याला आढळून येईल. उदाहरणार्थ, अर्थमंत्र्यांचा भिक्षेकऱ्याचा वाडगा, दिवसाकाठी पक्ष बदलणाऱ्या राजकारणी मंडळींनी जमा केलेल्या रंगी—बेरंगी टोप्या, अखिल भारतीय दुकानदार संघाने कोठल्या खाण्याच्या वस्तूंत कोठल्या दगड-मातीची बेमालूम भेसळ होऊ शकते याच्या शास्त्रीय संशोधनासाठी बांधलेली संशोधनशाळा, समय म्हणजे टाईम आणि दया म्हणजे रहम असे शिकविणारे हिंदी क्रमिक पुस्तक, नेहरूंच्या नावाने सातव्या एडवर्डचा शिक्का छापलेले पन्नास पैशांचे नाणे, ऊठसूट आमरण उपोषण करण्याची धमकी देणाऱ्या पुढाऱ्याचे गरगरीत तोंड आणि स्वतंत्र गिरगाव राज्याची मागणी करणारा जाहीरनामा आणि असल्या गोष्टी या आपल्या इंडिया दॅट इज भारतात जतन करून ठेवण्यासारख्या नाहीत का ?

## □ विकाऊ इतिहास

लंडनला टेम्स नदीवर नवीन पूल बांधण्यात येणार आहे म्हणून लंडन नगरपालिकेने इतिहासप्रसिद्ध लंडनब्रिज विकायला काढला आहे. कल्पना चांगली आहे. दिल्लीतही आता स्कायस्क्रेपर इमारती होणार आहेत असे कळते; तेव्हा कुतुबमिनार विकून टाकायला हरकत नाही. आणि परकीय चलनाच्या आजच्या दुष्काळात भरपूर डॉलर मिळविण्याची एक साधी युक्ती सांगू ?—ताजमहाल पाहायला येणाऱ्या एखाद्या अमेरिकन प्रवाशाला ताजमहाल विकूनच टाकावा.

○

## फलज्योतिष

(पृष्ठ १५ वरून)

अनंत अंतरावरील ग्रहांचा, माणसांचा व त्यांच्या आयुष्यातील बऱ्यावाईट घटनांचा संबंध काय ? यावर एक खुलासा असा की, ग्रहांचा व घटनांचा अर्थाअर्थी संबंध आहे हा ग्रहच गैर आहे. जन्मकालीन ग्रहांचा नकाशा म्हणजे व्यक्तीची जन्मकुंडली. हे ग्रह माणसाच्या जन्मकालीन स्थितीचे **द्योतक** असतात हा सिद्धांत आहे. हजारो कुंडल्यांच्या वाचनांतून या विषयाची सत्यता पटते. या ठिकाणी ग्रह वाईट पडला म्हणून मनुष्य गरीबीत जन्मास येत नाही, किंवा मनुष्य सुखात जन्मला म्हणून ग्रह सुखस्थानी पडत नाही. म्हणून ग्रह हे माणसाच्या जन्मकालीन परिस्थितीचे **द्योतक** आहेत, **कारक** नव्हेत. त्यांची भूमिका अगर अस्तित्व **दर्शक** (Indicating) स्वरूपाचे आहे. कृती (Active) स्वरूपाचे नव्हे. ग्रह घटना घडवितात का नाही हा मुद्दाच येथे उपस्थित होत नाही. जातक वर्तविण्याचे एक माध्यम म्हणूनच त्यांचा विचार केला जातो. थोडक्यात ग्रह म्हणजे मानवी आयुष्यातील घटनांचे विचार, अंदाज अचूक देणारे एक आकाशातील घडयाळ आहे.

तसा सूक्ष्म विचार केला तर सूर्याचा नाही म्हटले तरी आपल्या शरीरयष्टीवर, रंगावर, आयुष्यावर परिणाम होतच असतो. कुंडलीशास्त्रात यासाठीच ग्रहांच्या अंशांचाही विचार होतो. विषुववृत्तावर व ध्रुवावर राहणाऱ्या माणसांचे रंग, आयुष्य, खाण्यापिण्याच्या सवयी यांचे वर्णन भूगोलात वाचताना ते शास्त्रीय समजावे व ग्रहाआधारे ज्योतिषशास्त्रात केले की, मात्र अशास्त्रीय का ठरते याचा वाचकांनीच विचार करावा. मंगळाची, गुरूची, रवीची व्यक्ती असे वर्गीकरण शास्त्रीय का ठरू नये ? **या पाठीशी शास्त्राचा सबळ आधार आता जरी देता येत नाही तरी हे पडताळे वारंवार व अपवादात्मक स्वरूपात प्रत्ययास येतात ही विचार करण्याजोगी गोष्ट आहे.** ज्यांनी हजारो कुंडल्यांचे वाचन केलेले आहे त्यांना याची प्रचीती आलेली आहे. जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ सर आयझॅक न्यूटन याची एक आख्यायिका या संबंधाने येथे उद्धृत करावीशी वाटते.

हे न्यूटन महाशय एकदा गावाबाहेर शांत अशा मैदानात खडकावर वाचन करीत बसले असता तेथे एक धनगराचा पोर आला व म्हणाला, ' साहेब, घरला निघा; पाऊस लई जोराचा येनार हाय." न्यूटनला आश्चर्य वाटले. सूर्य चांगला स्पष्ट, उन्ह कडक असताना हा पावसाचे नाव कसले घेतो ? म्हणून अविश्वासाने तो तेथेच थांबला. पंधराएक मिनिटांत जोराच्या सरी आल्या व शास्त्र व शास्त्रज्ञ दोघेही भिजून चिंब झाले ! नंतर त्यांनी धनगरास बोलावून विचारले, " पोरा, किती बुकं शिकलास ? तुला पाऊस येणार हे कसे कळले ?" त्यावर धनगराचे उत्तर मजेशीर तितकेच विचारार्ह आहे. तो म्हणाला, " चिमण्या मातीत न्हात

होत्या. त्यावरून पाऊस येणार, हे सांगायला बुकं कशास वाचावयास हवीत ?" विचारा शास्त्रज्ञ ! पडताळघाच्या शास्त्रावर पुस्तकी शास्त्राचा बळी गेलेला पाहून त्याला विचार पडला, " मी वाचतो हे शास्त्र की धनगर सांगतो हे शास्त्र !"

धनगरासारख्या अडाणी माणसाने अनुभवाच्या जोरावर एक शास्त्रीय सिद्धांत कथन केला. चिमण्या लोळणे व पाऊस येणे यांचा कार्यकारण संबंध असो किंवा नसो; पाऊस येण्याचे मार्गदर्शन म्हणून ते मानावे लागते. घड्याळात बारा वाजले म्हणून भूक लागत नाही तरी बारा वाजून गेले जेवायला चला असे आपण म्हणतोच की नाही ? रात्रीचे १० वाजून गेले झोपले पाहिजे असे आपण म्हणतो. पाऊस येणे, भूक लागणे, झोप येणे या नैसर्गिक क्रिया आहेत. पण त्यांच्या आगमनाची सूचना देणाऱ्या चिमण्या–घड्याळे ही मार्गदर्शक होत. हाच नियम कुंडली जातकास लागू आहे. ग्रहामुळे घटना घडतात असे नाही; परंतु घटना घडू शकतील असे ग्रहयोग दर्शवितात. ग्रह विशिष्ट ठिकाणी आले म्हणून ग्रहामुळे असे घडले असे शास्त्र म्हणत नाही. ज्योतिषी म्हणतो. शास्त्र फक्त म्हणते की, ग्रहाचे विशिष्ट योगात येणे हे विशिष्ट घटनांचे मार्गदर्शन आहे. म्हणजेच अवकाशातील ग्रह हे माणसाच्या आयुष्यातील घटना वाचणारे घड्याळ आहे.

फक्त नऊच ग्रहांवरून अनेक बारीकसारीक घटनांचे मार्गदर्शन इतक्या व्यक्तींच्या बाबत कसे होऊ शकते हा या शास्त्रावरील आणखी एक आक्षेप. परंतु यात विशेष अर्थ नाही. आकडे नऊच असले तरी त्यावरून कितीही मोठी संख्या लिहिता येते. तसेच ग्रह जरी नऊच असले तरी त्यांची स्थाने, अंश, एकमेकांतील योग, या व अशा अनेक संयुक्त बाबींचा विचार होतो.

फलज्योतिषावरून काहीही अचूक सांगता येते. हा फलज्योतिषाचा ज्यांनी शास्त्र म्हणून अभ्यास केलेला नाही; त्यांनी गांजलेल्या लोकांच्या दुर्बल मनाचा गरफायदा घेऊन करून दिलेला गैरसमज आहे. प्रत्येक शास्त्र हे पूर्णत्वाअभावी मर्यादित असते. या शास्त्राच्या पूर्ण संशोधनाअभावी हेही पूर्णत्वास गेलेले नाही. अजूनही हे शास्त्र बऱ्याच प्रमाणात गूढ स्वरूपातच आहे. म्हणून यावरून ज्या गोष्टी वर्तविल्या जाव्यात त्या तितक्या अचूक वर्तविल्या जात नाहीत. या शास्त्राला पडणाऱ्या मर्यादांचा विचार करू.

या विश्वातील सर्व वस्तूंप्रमाणेच मनुष्यासही 'उत्पत्ती', स्थिती व लय ह्या तिन्हींतून जावे लागते. उत्पत्ती किंवा जन्म हा पूर्णत्वाने विधिलिखित म्हणावा लागेल. लय किंवा मृत्यू हाही विधिलिखित मानला तरी उत्पत्ती व मृत्यू यांमधील काल म्हणजे स्थिती अथवा मानवाचे आयुष्य हे विधिलिखित मानणे योग्य होणार नाही. हा काल शास्त्राद्वारे जास्तीत जास्त सुखावह करण्यासाठीच मानवाची धडपड चालू आहे. म्हणून कवी गोविंदाग्रज म्हणतात– " जन्मा येणे दैवाहाती। करणी जग हासवी. " आयुष्याचा हा काल कसा जाईल हे फार थोड्या प्रमाणात निश्चित व

अगदी मोठ्या प्रमाणात अनिश्चित असते. स्थितीमधील ज्या घटना निश्चित स्वरूपाच्या किंवा अटळ असतात त्या गोष्टींबद्दल जातक शास्त्राद्वारे अचूक निदान करता येते. परंतु ज्या घटना सापेक्ष असतात त्यांबद्दल फक्त अंदाजच व्यक्त करता येतो. मनुष्य सुखी होईल काय ? पैसा कसा मिळेल ? नातेवाईक सुख देतील काय ? मित्र कसे भेटतील ? या गोष्टी सापेक्ष असल्याने त्यांची उत्तरे जातकशास्त्राद्वारे अचूक मागणे म्हणजे ती शास्त्राची एक क्रूर चेष्टा आहे. थोडेसे विष पोटात जाऊन मनुष्य मरेल काय याचे अचूक उत्तर डॉक्टरांना मागणे; नाहीतर शास्त्र खोटे म्हणणे हा केवळ अविचारीपणा होय.

वर कथन केल्याप्रमाणे आयुष्यातील महत्त्वाच्या अटळ गोष्टींचे निदान कुंडलीशास्त्राधारे अचूक करता येते. सापेक्ष घटनांचे त्याच सापेक्षतेने निदान करता येते. शास्त्र कितीही अचूक असले तरी सापेक्ष प्रश्नांची उत्तरे सापेक्षच मिळतील म्हणून घडलेल्या घटना जितक्या अचूक सांगता येतात, तितक्या भविष्यातील. सर्व घटना सांगता येत नाहीत. ही या शास्त्राची पहिली मर्यादा होय.

ज्या प्रमाणे अमूक बी पेरून पीक किती येईल हे सांगण्यासाठी जमीन कशी आहे, मशागत किती केली, खतपाणी कसे केले याचा पण विचार करावा लागतो. या सर्व गोष्टी माहीत असूनही पीक किती येऊ शकेल याचा फक्त अंदाजच करता येतो. गव्हाचे बी पेरून गहू येईल हे शंभर टक्के जसे सांगता येईल तसे एक पोते गहू पेरला तर त्यापासून नक्की किती मण गहू येईल हे शास्त्र कितीही प्रगत झाले तरी शेतकी तज्ज्ञ सांगू शकेल काय ? म्हणून ज्योतिषाच्या बाबतही उत्तराची सापेक्षता कमी करून अचूक भविष्य सांगताना खालील गोष्टींचा विचार व्हावा लागतो :

१) अनुवंशिकता (Heredity) २) प्रसंगजन्य परिस्थिती
३) प्रयत्नाचा भाग ४) नशीबाचा भाग

यांपैकी प्रयत्नाचा भाग मोठा असल्याने त्या दृष्टीने कृतियोग्य मार्गदर्शन हेच या शास्त्राचे उद्दिष्ट असावयास हवे.

भविष्यातील घटना जाणून घेण्याचे औत्सुक्य सर्वांनाच असते. अशा सर्व घटना विधिलिखित किंवा अटळ असत्या तर जगात मानव कृतिशून्यच बनता. भविष्य हे शंभर टक्के अटळ नसते. त्यातील काही भाग अटळ व काही प्रयत्नाने टाळता येतो. अटळ भागाचे शास्त्राद्वारे अचूक वाचन करून त्यावर जास्त विचार न करता जो भाग प्रयत्नांनी सुधारता येईल त्याची दिशा या शास्त्राद्वारे निश्चित करता येईल. हाच जातकाचा विधायक उपयोग होय. अचूक ज्योतिष जाणून घेण्यापेक्षा अचूक सिद्धांताद्वारे संभाव्य अडचणींवर प्रयत्नांची मात करून मानवी आयुष्य आहे यापेक्षा अधिक सुखावह व सुसह्य करता येईल असा विश्वास वाटतो.

माणसाचा भविष्यकाल हा अंधारातील रस्त्याप्रमाणे असून जातकशास्त्र म्हणजे

मानवास मिळालेली (प्राचीन) विजेरी होय. हिचा उपयोग करून भविष्यातील टाळता येण्याजोग्या गोष्टी टाळून व अटळ गोष्टी सहन करण्याची मानसिक तयारी होऊ शकली तरी या शास्त्राचा बराच उपयोग झाला असे म्हणता येईल. निसर्गाने पावसाची व मातीची सोय करून ठेवली आहे. परंतु बी पेरणे व मशागत करणे हा भाग मानवाचा आहे निसर्गाचा नाही. ज्या प्रमाणे बॅटरीचा उपयोग रस्त्यातील दगड दाखविण्याकडे होतो आणि त्याला टाळून गेल्यास होणारी इजा टळते म्हणजे जातकशास्त्रावरून अनुमाने काढूनही त्यांचा योग्य उपयोग करून घेणे मानवाच्या हाती आहे. उदाहरणच सांगावयाचे झाले तर दोन वर्षांनी पाण्याचा दुष्काळ पडणार असे भविष्य असेल तर कृत्रिम ढग निर्माण करणे ही कल्पना झाली. पण जोतिषाचा विचार करून नवीन विहिरी खणणे, धरणे घालून पाणी अडवणे, असलेले पाणी काटकसरीने वापरणे या गोष्टी आपण करू शकू.

ज्या व्यक्तींना आयुष्यभर कोणत्याही व्यवसायात स्थिर होता येत नाही, त्यांना व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना जे भोग भोगावे लागतात ते या शास्त्राने सुरुवातीस व्यक्तीस योग्य मार्गदर्शन देता आल्याने कमी करता येतील, शाळाकॉलेजांतून विद्यार्थ्याचा स्वाभाविक कल न पाहता त्याला चुकीची बाजू दिल्याने विद्यार्थ्यांचा व संबंधित शिक्षकांचा कालापव्यय, तदनुषंगाने पालकांना होणारी आर्थिक व मानसिक अडचण बऱ्याच प्रमाणात दूर करून राष्ट्राचे मोठ्या प्रमाणावर होणारे नुकसान थांबवता येईल.

व्यक्तीच्या स्वभाववैशिष्ट्याची जाणीव झाल्याने त्याची योग्य कामासाठी निवड करणे सोपे होईल. एखाद्या व्यक्तीस होणाऱ्या संभाव्य रोगाची अगर दुखण्याची कल्पना पूर्वीपासून देता आल्यास योग्य ती प्रतिबंधक योजना आखून त्याची भावी आयुष्यातील तीव्रता कमी करता येईल. या व अशा अनेक विधायक योजना आखता येतील.

डॉक्टर ज्या प्रमाणे रोगाचे निदान (Diagnosis) करतात परंतु रोग बरा होणे हे औषध नियमित घेण्यावर व रोग्याचे पथ्य सांभाळण्यावरच अवलंबून असते. नुसते निदान अचूक करून भागत नाही. तसेच ज्योतिषी हा भविष्यातील घटनांचे फक्त निदान करतो. त्याचा मानवाने विधायक उपयोग करून घेण्यावरच या शास्त्राची शास्त्रशुद्धता अवलंबून आहे. मग हे शास्त्र आहे हे कोणालाही पटवून देण्याची गरज भासणार नाही.

या विषयाची सुसूत्र व शास्त्रशुद्ध रचना करून त्यात आवश्यक ते संशोधन करण्याचा महत्वाचा भाग प्राचीन विद्यांबद्दल आस्था बाळगणाऱ्या आमच्या विद्यापीठांनी उचलून या बहुमोल शास्त्राच्या प्रगतीचा विडा उचलावा ही या शास्त्राबद्दल आजची खरी गरज आहे.

o

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649

## "सारे जग श्वास रोखून बसेल"

असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या

झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त

राजहंस प्रकाशन संस्थच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग.
माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ. पुणे २, येथे छापून, ४१९